ऑगस्ट २०२३/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## मदतीसाठी तत्पर!



**नरेंद्र मोदी**
प्रधानमंत्री

# वस्तू व सेवा कर विभाग

**महाराष्ट्र शासन**

## आता भय नाही, अभय...!

# एक पाऊल थकबाकी मुक्तीकडे



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

# अभय योजना २०२३

व्हॅट, बीएसटी, सीएसटी इत्यादी कायद्यांतर्गत असलेल्या थकबाकीतून मुक्त होण्याची सुवर्ण संधी

- ३० जून २०१७ पर्यंतच्या कालावधीच्या थकबाकीकरिता अभय योजना.
- वैधानिक आदेशानुसार रु. २ लाख किंवा कमी असलेली थकबाकी निर्लेखित करण्यात येईल.
- रु. २ लाख पेक्षा जास्त थकबाकीसाठी विवादित करात ५० ते ७० टक्के तसेच व्याजात ८५ ते ९० टक्के व शास्तीच्या ९५ टक्के सवलत.
- रु. ५० लाखापर्यंत थकबाकी असणाऱ्या व्यापाऱ्यांना एकत्रित २०% रक्कम भरुन थकबाकीतून मुक्त होण्याचा पर्याय.
- रु. ५० लाखांपेक्षा जास्त थकबाकीदारांसाठी हप्ते सवलतीचा पर्याय उपलब्ध.
- अभय योजनेचा कालावधी:-
  9 मे २०२३ ते ३१ ऑक्टोबर २०२३.
- आवश्यक रक्कम व अर्ज विहित मुदतीच्या आत सादर करावा.

## अभय योजना थोडक्यात

**करमाफीची गणना खालील तक्त्याप्रमाणे**

(दिनांक १ एप्रिल २००५ रोजी व त्यानंतर सुरु होणाऱ्या व दिनांक ३० जून २०१७ रोजी संपणाऱ्या कालावधीकरिता)

| अनु. क्र. | रक्कम | एक रकमी प्रदानाचा पर्याय | | हप्त्याने प्रदानाचा पर्याय (रुपये पन्नास लाखां वरील थकबाकीसाठी) | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रदान करावयाची रक्कम | माफीची रक्कम | प्रदान करावयाची रक्कम | माफीची रक्कम |
| (१) | अविवादित कर | १००% | निरंक | १००% | निरंक |
| (२) | विवादित कर | ५०% | ५०% | ५६% | ४४% |
| (३) | व्याज | १५% | ८५% | १५% | ८५% |
| (४) | शास्ती | ५% | ९५% | ५% | ९५% |
| (५) | निर्धारणोत्तर व्याज | ०% | १००% | ०% | १००% |
| (६) | विलंब शुल्क | ५% | ९५% | ५% | ९५% |
| | किंवा | | | | |
| (७) | पन्नास लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी थकबाकीची रक्कम असेल तर एकरकमी प्रदानाचा पर्याय | २०% | ८०% | लागू नाही | लागू नाही |

(दिनांक ३१ मार्च २००५ रोजी व त्यापूर्वी संपणाऱ्या कालावधीकरिता)

| अनु. क्र. | रक्कम | एक रकमी प्रदानाचा पर्याय | | हप्त्याने प्रदानाचा पर्याय (रुपये पन्नास लाखां वरील थकबाकीसाठी) | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रदान करावयाची रक्कम | माफीची रक्कम | प्रदान करावयाची रक्कम | माफीची रक्कम |
| (१) | अविवादित कर | १००% | निरंक | १००% | निरंक |
| (२) | विवादित कर | ३०% | ७०% | ३४% | ६६ % |
| (३) | व्याज | १०% | ९०% | १०% | ९०% |
| (४) | शास्ती | ५% | ९५% | ५% | ९५% |
| (५) | निर्धारणोत्तर व्याज | ०% | १००% | ०% | १००% |
| | किंवा | | | | |
| (६) | पन्नास लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी थकबाकीची रक्कम असेल तर एकरकमी प्रदानाचा पर्याय | २०% | ८०% | लागू नाही | लागू नाही |



**देवेंद्र फडणवीस** उपमुख्यमंत्री | **एकनाथ शिंदे** मुख्यमंत्री | **अजित पवार** उपमुख्यमंत्री

योजनेच्या अधिक माहितीसाठी आपण संपर्क करु शकता :-

संकेतस्थळ : www.mahagst.gov.in | मदत कक्ष फोन नं. : 022-23760188 | ई मेल आयडी : amnestyscheme2023@gmail.com

# अंतरंग

## ६ शासनातर्फे सुरक्षित आश्रय

पावसाळ्यामध्ये कोकण विभागात सर्वाधिक पावसाची नोंद होते. त्यामुळे येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा सामनाही करावा लागतो. कोकण विभागात एकूण ७ जिल्हे असून, ५० तालुके आणि ६ हजार ३५३ गावे आहेत. महाराष्ट्र राज्यातील सर्वाधिक म्हणजे सरासरी २ हजार ते ३ हजार ३६८ मि.मी. पाऊस हा कोकणात पडतो. विभागात एकूण ३७१ पूरप्रवण व २२३ दरडग्रस्त गावे आहेत.

## २३ सुरक्षिततेसाठी कटिबद्ध

अनपेक्षित नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींचा सामना करत खंबीरपणे वाटचाल करत राहणाऱ्या मुंबईत नागरी सेवा-सुविधा पुरवण्याचे पालकत्व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे आहे. तसेच या महानगरावर येणाऱ्या आपत्तींमध्ये उपाययोजना करण्याची अत्यंत मोठी जबाबदारीदेखील मुख्य समन्वय यंत्रणा (नोडल एजन्सी) म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका सांभाळत आहे.

## २८ आदिवासी संस्कृतीचे संवर्धन

आदिवासी बांधव निसर्गदेवतेचे पूजक आहेत. आदिवासी बांधव डोंगराळ भागात राहतात हे सर्वश्रुत आहेच; पण तेथे राहून ते जमिनीचे संरक्षण करतात, त्यांच्या परंपरा, चालीरीती यातून ते निसर्ग जपतात. काळाच्या ओघात शहरी भागात व्यवसाय, रोजगार, शिक्षण या दृष्टीने आदिवासी बांधव स्थायिक झालेले दिसतात.

## १४ पुनर्वसनासाठी प्रयत्न

इर्शाळवाडी दुर्घटनेत बचावलेल्या लोकांच्या पाठीशी शासन ताकदीने उभे आहे. तेथील लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी तत्काळ कार्यवाही करण्यात येत आहे. कुटुंबांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी सिडकोकडून जागा निश्चित करून त्या जागेचा सर्वांगीण विकास करण्यात येईल.



## ३५ ऑगस्ट क्रांती चळवळ

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासामध्ये ऑगस्ट क्रांतीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. ऑगस्ट क्रांती म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली नऊ ऑगस्ट १९४२ रोजी सुरू केलेली 'भारत छोडो' ही चळवळ होय. या चळवळीमध्ये लाखो लोक सामील झाले. हजारो लोक तुरुंगात गेले आणि शेकडो लोकांना आपले प्राण गमवावे लागले.

## २० मदतीसाठी सदैव तत्पर...

राज्यात वातावरण बदलामुळे अचानक वादळे, पूर, गारपीट, भूस्खलन यांसारख्या घटना घडत आहेत. अचानक आलेल्या पावसामुळे जीवित व वित्तहानी तसेच शेतीचेही मोठे नुकसान होत असते. नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना तत्काळ मदत करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे.

## २६ एक रुपयात पीक विमा

शेती करताना पिकांचे विविध कारणांमुळे होणारे नुकसान काही प्रमाणात भरून काढण्यासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू केली. राज्य शासनही ही योजना राबवत आहे.

## ४९ सत्यशोधक अण्णा भाऊ साठे

सामाजिकदृष्ट्या उपेक्षित, बहुजन, पीडितांच्या व्यथा वेदनांना मराठी साहित्यात प्रभावीपणे मांडण्याचे काम अण्णा भाऊ साठे यांनी केले आहे. सामान्य दलित माणूस हा त्यांच्या साहित्याचा विषय होता.


| | |
|---|---|
| शासनातर्फे सुरक्षित आश्रय | ६ |
| होय मी 'कार्यकर्ता' मुख्यमंत्री आहे ! | ११ |
| आपत्तीनंतरचे व्यवस्थापन | १२ |
| पुनर्वसनासाठी प्रयत्न | १४ |
| मदतीसाठी सदैव तत्पर... | २० |
| सुरक्षिततेसाठी कटिबद्ध | २३ |
| एक रुपयात पीक विमा | २६ |
| आदिवासी संस्कृतीचे संवर्धन | २८ |
| विकासात्मक योजना | ३० |
| क्रीडा व युवक कल्याण | ३३ |
| ऑगस्ट क्रांती चळवळ | ३५ |
| नवे मंत्री | ३८ |
| अभय योजना २०२३ | ४३ |
| लोकनाट्य चळवळीची प्रेरणा | ४६ |
| सत्यशोधक अण्णा भाऊ साठे | ४९ |
| प्रबोधनाची दिशा | ५१ |
| मानवतावादी लेखक | ५४ |
| आधार योजनांचा ! | ५६ |
| कल्याणकारी निर्णय | ५८ |

वर्ष ७४ वे | अंक १० | ऑगस्ट २०२३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

| | |
|---|---|
| मुख्य संपादक | जयश्री भोज |
| प्रबंध संपादक | हेमराज बागुल<br>डॉ. राहुल तिडके |
| संपादक | दयानंद कांबळे |
| सहसंपादक | अश्विनी पुजारी<br>गजानन पाटील |
| मुखपृष्ठ | सीमा रनाळकर<br>सुशिम कांबळे |
| मांडणी, सजावट | शैलेश कदम |
| मुद्रितशोधन | भाग्यश्री पेठकर |
| मुद्रण | मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई. |

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.


# निर्यातसज्जता निर्देशांकात महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर

निर्यात क्षेत्रात विविध मानकांवर सरस कामगिरी नोंदवत महाराष्ट्राने नीती आयोगाच्या 'निर्यातसज्जता निर्देशांक-२०२२' अहवालात ७८.२० गुणांसह देशात दुसरे स्थान मिळविले आहे, तर तामिळनाडू राज्याने पहिले स्थान मिळवले आहे. देशाच्या निर्यात क्षेत्रात झालेल्या प्रगतीच्या आधारावर, नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी यांनी 'निर्यातसज्जता निर्देशांक २०२२' अहवाल जारी केला.

'निर्यातसज्जता निर्देशांक २०२२'च्या तिसऱ्या आवृत्तीत चार प्रमुख व ११ उपमानकांच्या आधारे महाराष्ट्र राज्य ७८.२० गुण मिळवत दुसऱ्या स्थानावर आहे, कर्नाटक राज्य तिसऱ्या क्रमांकावर राहिले आहे.

## निर्यातविषयक सज्जता निर्देशांकाविषयी अधिक माहिती

हा अहवाल म्हणजे भारताच्या निर्यातविषयक कामगिरीचे समावेशक विश्लेषण आहे. देशातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना त्यांच्या सहकारी राज्यांच्या तुलनेत स्वतःच्या कामगिरीचे मूल्यमापन करणे आणि उपराष्ट्रीय स्तरावरील निर्यातीवर आधारित विकासाला चालना देण्यासाठी उत्तम धोरणात्मक यंत्रणा विकसित करण्याच्या संभाव्य आव्हानांचे विश्लेषण करणे, यासाठी या निर्देशांकाचा वापर करण्यात येतो. निर्यातविषयक सज्जता निर्देशांक पुढील चार मुख्य घटकांच्या संदर्भात राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची क्रमवारी निश्चित करतो. धोरण, व्यवसाय परिसंस्था, निर्यात परिसंस्था आणि निर्यातविषयक कामगिरी तसेच या क्रमवारीसाठी निर्यात प्रोत्साहन धोरण, संस्थात्मक चौकट, व्यवसायाचे वातावरण, पायाभूत सुविधा, वाहतुकीची सुविधा, अर्थसाहाय्य मिळण्याची सोय, निर्यातविषयक पायाभूत सुविधा, व्यापारविषयक मदत, संशोधन आणि विकासविषयक पायाभूत सुविधा, निर्यातीचे वैविध्यीकरण आणि विकासाभिमुखता हे ११ उपनिर्देशक विचारात घेतले जातात.



ईपीआय २०२२ च्या अहवालात महाराष्ट्र राज्याने सर्व श्रेणींमध्ये निर्यातसज्जता निर्देशांकात उत्तम कामगिरी बजावली आहे. तसेच बहुतांश तटवर्ती राज्यांनी चांगली कामगिरी केली असून, तामिळनाडू (८०.८९), कर्नाटक (७६.३६) आणि गुजरात (७३.२२) गुणांसह ही राज्येदेखील सर्व श्रेणींमध्ये निर्यातसज्जता निर्देशांकात अग्रगण्य स्थानावर आहेत. अहवालाचा उद्देश देशातील सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशांमध्ये निरोगी स्पर्धेची भावना निर्माण करणे आणि राज्यांमध्ये समतुल्य शिक्षणाला प्रोत्साहन देणे हा आहे.

# सुरक्षिततेसाठी सज्ज !

चक्रिवादळ, महापूर, दुष्काळ, अतिवृष्टी, वादळवारे, त्सुनामी, दरड कोसळणे, कोरोना महामारी यांसारख्या आपत्ती मानवाला पुरत्या हतबल करून टाकतात. अशा प्रसंगी आपत्ती निवारणासाठी व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे ठरते. अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी आपत्तीपूर्व व्यवस्थापन, आपत्तीप्रसंगी व्यवस्थापन व आपत्तीनंतरचे व्यवस्थापन असे तीन प्रमुख टप्पे महत्त्वाचे ठरतात.

भूकंप, महापूर, चक्रिवादळ, अतिवृष्टी यासर्व घटना नैसर्गिक आपत्तीमध्येच मोडणाऱ्या आहेत. अशा आपत्तींमध्ये होणारी जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी महाराष्ट्र आपत्ती जोखीम व्यवस्थापनांतर्गत विभागीय व जिल्हास्तरावर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. इतकेच नव्हे, तर केंद्र शासनाने २००५ मध्ये आपत्ती व्यवस्थापन कायदा पारित केला आहे. याचा मूळ उद्देश नैसर्गिक आपत्तीमध्ये होणारे नुकसान टाळणे व सर्वांना सुरक्षितता प्रदान करणे हा आहे.



आपत्तीच्या काळात नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना रुजावी, बाधित लोकांना त्वरित आर्थिक, वैद्यकीय मदत मिळावी, या काळात नीट व्यवस्थापन व्हावे, ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून नियोजन करावे लागते. आपत्ती व्यवस्थापन म्हणजे अत्यंत मोठा आणि व्यापक विषय आहे. असेच नैसर्गिक संकट रायगडच्या इर्शाळवाडी गावावर १९ जुलै २०२३ रोजी आले. त्या रात्री या गावावर दरड कोसळली. ही दुर्घटना समजताच राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, मंत्री गिरीश महाजन आणि मंत्री दादाजी भुसे हे तातडीने मुंबईहून घटनास्थळी दाखल झाले. दुर्घटनेची माहिती मिळताच बचाव पथक अवघ्या तासाभरातच घटनास्थळी दाखल झाले. यावेळी घटनास्थळाची आपत्कालीन पाहणी करत मंत्र्यांनी तातडीने मदत व बचावकार्य सुरू करण्याच्या सूचना केल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घटनास्थळी दाखल झाले, तेथील सर्व भूस्खलनाच्या घटनेची माहिती घेतली. मुख्यमंत्र्यांनी पालकत्वाच्या भूमिकेतून सर्व परिस्थिती हाताळली. स्थानिक प्रशासनाशी चर्चा करून तत्काळ बचावकार्याला गती मिळावी, यासाठी अतिरिक्त मनुष्यबळाचे नियोजन करण्याचे प्रशासनाला निर्देश दिले. मंत्रालय आपत्ती निवारण कक्षातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील मदतकार्याविषयी आवश्यक त्या सूचना केल्या. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बचावकार्यावर विशेष लक्ष दिले. अशा आपत्ती व्यवस्थापनामध्ये स्थानिक पातळीवरील यंत्रणा महत्त्वाची ठरली. पावसामुळे माती निसरडी झाल्याने वाडीपर्यंत पोहोचण्यास बचाव पथकाला खूप कष्ट घ्यावे लागले. अत्यंत दुर्गम अशा ठिकाणी ही वाडी असल्याने मदतीसाठी कोणतीही यांत्रिकी साधने तिथे पोहोचवणे शक्य नव्हते. त्यामुळे फक्त शक्य तेवढ्या माणसांच्या मदतीने मदत पोहोचवणे शक्य झाले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या वतीने जिल्हास्तरावर आराखडा तयार केला जातो. त्यानुसार व्यवस्थापनाचे नियोजन केले जाते. अशा आराखड्यानुसार नियोजन केल्यास होणारी वित्त व जीवितहानी टाळता येऊ शकते. प्रत्येक गावात गाव आपत्ती व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना, स्वयंसेवी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना याबाबतचे प्रशिक्षण प्रशासनाच्या वतीने वेळोवेळी देण्यात येते.

आपत्कालीन परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणेसोबतच महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी, होमगार्ड्स, पोलीस प्रशासन, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांचा सहभाग महत्त्वाचा ठरतो. अशा नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी योग्य नियोजन आणि त्याची पूर्वतयारी महत्त्वाची ठरते. विशेषतः लहान मुले, वृद्ध महिला; तसेच दिव्यांग नागरिकांना त्रास होऊ नये, याशिवाय या काळात पाणीपुरवठा, जनावरांना चारा, खानपान व्यवस्था, वैद्यकीय सेवा, औषध सामग्री, सांडपाण्याची व्यवस्था इ. सुरळीत चालेल याची खबरदारी शासन घेत असते.

या विशेषांकात पूरग्रस्त जिल्ह्यांच्या व्यवस्थापनाच्या आढाव्याची माहिती घेण्यात आली आहे. यासोबतच अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या साहित्यावर व जीवनकार्यावर प्रकाश टाकणाऱ्या विशेष लेखांचा समावेश करण्यात आला आहे. हा अंक आपणास उपयुक्त ठरेल, असा विश्वास आहे.

**जयश्री भोज**
(मुख्य संपादक)

पावसाळ्यामध्ये कोकण विभागात सर्वाधिक पावसाची नोंद होते. त्यामुळे येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा सामनाही करावा लागतो. कोकण विभागात एकूण ७ जिल्हे असून, ५० तालुके आणि ६ हजार ३५३ गावे आहेत. महाराष्ट्र राज्यातील सर्वाधिक म्हणजे सरासरी २ हजार ते ३ हजार ३६८ मि.मी. पाऊस हा कोकणात पडतो. विशेषत: कोकण विभागात गेल्या सहा वर्षांत सरासरी २,७०१.४० मि.मी. इतक्या पावसाची नोंद झाली आहे. विभागात एकूण ३७१ पूरप्रवण व २२३ दरडग्रस्त गावे आहेत.

# शासनातर्फे सुरक्षित आश्रय

**डॉ. गणेश मुळे**

रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी येथे १९ जुलै २०२३ रोजी रात्री १०.३० च्या सुमारास इर्शाळवाडीवर दरड कोसळली. ही वाडी दरडप्रणव क्षेत्रात नव्हती. याठिकाणी जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही. मौजे चौक, मानिवली या गावातून पायी चालत जावे लागते. रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडीत ४३ कुटुंब राहतात. २२९ लोकसंख्या येथे आहे. या दुर्घटनेत ४८ पैकी १७ घरे गाडली गेली. या दुर्घटनेत २७ व्यक्ती मृत्यू पावल्या. ७८ लोक अंदाजे बेपत्ता आहेत, तर १४५ लोक हयात आहेत. २१ जखमी व्यक्तींवर उपचार करून घरी सोडण्यात आले. २ व्यक्ती एमजीएम हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत. हयात असणाऱ्या व्यक्तींना तात्पुरते पोर्टेबल ३२ आणि २० शौचालये, २० बाथरूम्स उभे करण्यात आले आहेत. कंटेनरगृहात राहण्याची सोय करण्यात आली आहे. या ठिकाणी वीज, पाणी, शौचालय आदी या मूलभूत सुविधांसह दैनंदिन लागणाऱ्या वस्तुंचे किटही शासनातर्फे पुरवण्यात आले आहेत.

दुर्घटनेची माहिती मिळताच बचाव पथक तासाभरातच घटनास्थळी दाखल झाले. पावसामुळे माती निसरडी झाल्याने वाडीपर्यंत पोहोचण्यास बचाव पथकाला खूप कष्ट घ्यावे लागले. अत्यंत दुर्गम अशा ठिकाणी ही वाडी असल्याने मदतीसाठी कोणतीही यांत्रिकी साधने तिथे पोहोचवणे शक्य नव्हते. त्यामुळे फक्त माणसाच्या मदतीने येथे मदत पोहोचवणे शक्य होते.

## बचाव कार्य

नॅशनल डिझास्टर रिसोर्स फोर्स (एनडीआरएफ), स्टेट डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स (एसडीआरएफ), टार्गेट डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स (टिडीआरएफ) आणि



स्थानिक नागरिकांच्या मदतीने प्रत्यक्ष मदतकार्यास सुरुवात झाली. याशिवाय स्थानिक ट्रेकर्स ग्रुप, स्वयंसेवी संस्थादेखील मदतीसाठी सरसावल्या. रात्री ११ च्या सुमारास ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन आणि स्थानिक आमदार महेश बालदी तत्काळ पोहोचले. विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी घटनास्थळी रात्रीपासूनच मदतकार्य सुरू केले.

२० जुलै २०२३ रोजी पहाटे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घटनास्थळी दाखल झाले. प्रशासनाशी चर्चा केली. तत्काळ बचावकार्याला गती मिळावी म्हणून अतिरिक्त मनुष्यबळाचे नियोजन केले आणि अतिशय कठीण वाट पायाखाली तुडवत दरड दुर्घटनास्थळी जाण्याचा निर्णय घेतला. तब्बल दीड ते दोन तास पायी दगडधोंड्यांचा निसरडा चिखलमय निसरडा रस्ता तुडवत प्रसंगी प्रतिकूल परिस्थितीत मुख्यमंत्री श्री. शिंदे इर्शाळवाडीवर पोहोचले. वाटेत दुर्घटनाग्रस्त कुटुंबीयांशी आस्थेवाईकपणे चौकशी केली. त्यांच्या उपस्थितीमुळे मदतकार्य करणाऱ्यांना ऊर्जा मिळाली.

मंत्रालय आपत्ती निवारण कक्षातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मदतकार्याविषयी आवश्यक त्या सूचना केल्या. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बचावकार्यावर विशेष लक्ष ठेवून होते. आपत्तीग्रस्तांना आवश्यक ती मदत मिळावी, यासाठी मंत्री गिरीश महाजन यांना सूचना केल्या.

महसूल, जिल्हापरिषद व पोलीस विभागाचे अधिकारी कर्मचारींसह मदतकार्यासाठी नागरी संरक्षण दल मुंबई येथून दोन पथके, एनडीआरएफची चार पथके याचबरोबर इतर विभागाच्या अधिकारी व कर्मचारी, ट्रेकर्स, मंडळे जवळपास १,१०० पेक्षा जास्त लोक, नवीमुंबई महानगरपालिका अग्निशमन दलाच्या पथकात ४४ अधिकारी कर्मचारी मदतकार्यात सहभागी होते. दुर्घटनाग्रस्त आदिवासी पाड्यावर बचाव व मदत कार्यात अनेक स्वयंसेवी संस्थांचा सहभाग होता.

## समुपदेशन

जिल्हा रुग्णालयाच्यावतीने अपघातातून वाचलेल्या नागरिकांचे समुपदेशन करण्यात आले. त्यांच्या मनातील भीती दूर करण्यासाठी त्यांच्यावर समुपदेशन करण्यात आले.

## पालक अधिकाऱ्यांची नेमणूक

रायगड जिल्ह्यातील १०३ गावे धोकादायक क्षेत्रात आहेत. ९ गावे अतिधोकादायक, ११ गावे धोकादायक तर ८३ गावे अल्प धोकादायक क्षेत्रामध्ये मोडतात. यासाठी तहसीलदार, गट विकास अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांची पालक अधिकारी



**सर्वांनी एकत्रित येऊन १०-१० लोकांचा समूह करून त्यातील एकाने आपद्ग्रस्त लोकांची जबाबदारी घ्यावी. त्यासाठी काय वस्तू लागणार आहेत, त्याची यादी करावी. ती शासनाला कळवावी. जेणेकरून आपण एक कुटुंब असल्यासारखे एकमेकांच्या संपर्कात राहू शकतो. कोणत्याही व्यक्तीसोबत गैरकृत होणार नाही, याची काळजी घेण्यात येईल.**

**- निलम गोऱ्हे, उपसभापती**



**दुर्घटनाग्रस्त इर्शाळवाडीत बचाव यंत्रणेने कठीण आणि प्रतिकूल परिस्थितीत उत्तम काम केले. प्रचंड पाऊस, अवघड निसरडा मातीचा रस्ता यामुळे बचावकार्यात अडथळे येत होते. एनडीआयएफचे मदतकार्य सुरू असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घटनेची माहिती घेतली. मृतांच्या नातेवाईकांना पाच लाख रुपये, तर जखमींवरील उपचाराचा सर्व खर्च शासनातर्फे केला जाईल.**

**- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**



**दरड कोसळण्याच्या घटनेत काही लोकांचा मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. मी मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. प्रशासकीय यंत्रणा घटनास्थळी पोहोचली. एनडीआरएफच्या देखरेखीखाली स्थानिक ट्रेकर्स, जवान आणि सिडकोने पाठवलेले मजूर यांच्यामार्फत बचावकार्य सुरू झाले. अशा घटना पुढे होऊ नये, यासाठी शासनकडून नियोजनबद्ध आराखडा तयार केला जाईल.**

**- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**



**मंत्रालय नियंत्रण कक्षातून उपमुख्यमंत्री अजित पवारांनी इर्शाळवाडी दुर्घटनेचे संनियंत्रण केले. इर्शाळवाडीवर दरड कोसळून झालेली दुर्घटना मन पिळवून टाकणारी आहे. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. रायगड जिल्ह्यात दरडप्रणव क्षेत्रात ही वाडी नव्हती. तरी दुर्घटना घडली ही गंभीर घटना आहे.**

**- अजित पवार, उपमुख्यमंत्री**



**इर्शाळगड येथे झालेल्या दुर्घटनेतील व्यक्तींसाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्यावतीने जवळच्या शिवभोजन केंद्राकडून शिवभोजन थाळी पॅकेट देण्यात येईल. याशिवाय ५ लिटर रॉकेल, १० किलो तांदूळ, १० किलो गहू किंवा त्याचे पीठ देण्यात येईल.**

**- छगन भुजबळ, मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण**



म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

### दाखल्यांचे जागेवर वाटप

४८ पैकी २९ कुटुंब व त्यांची घरे मातीच्या ढिगाऱ्यात गेली. त्यांच्या अस्तित्वाचा शासकीय पुरावाच नष्ट झाला. त्यांचे नाव हीच केवळ ओळख होती. म्हणून विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याण यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी जिल्हा प्रशासनाच्यावतीने विविध प्रकारची कागदपत्रे व संजय गांधी योजनेंतर्गत अनाथ १६, विधवा ५, श्रावणबाळ १ असे लाभ संबंधितांना देण्यात आले. त्याचप्रमाणे ४२ व्यक्तींना रेशनकार्ड व ५७७ जणांना आधारकार्डचे वाटप करण्यात आले. याबरोबरच ४१ कुटुंबांना सानुग्रह अनुदानाचे देखील वाटप करण्यात आले. प्रत्येक कुटुंबास ५ हजार याप्रमाणे २ लाख १५ हजार रुपयांचे वाटप करण्यात आले. तसेच जीवनावश्यक वस्तूंचेदेखील वाटप करण्यात आले.

### पशुधनाची काळजी

या दुर्घटनेत मदतकार्यात पशुधनाची काळजी घेण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत दोन पथके तैनात करण्यात आली होती. पथकांमार्फत ११ शेळ्या व १० गोवर्गीय जनांवरावर उपचार करण्यात आले. या ठिकाणी एकूण ३ बैल व एक शेळी मृत आढळून आली, त्यांचे पंचनामे करण्यात आले. या पथकांमार्फत जखमी पशुधनास उपचार करणे, मृत पशुधनाचे छायाचित्र व पंचनामे करणे, शास्त्रोक्त पद्धतीने मृत जनावरांची विल्हेवाट लावणे व जखमी पशुधनास खाद्याचे नियोजन करणे इत्यादी कामे करण्यात आली.

**आमचे १५ लोकांचे कुटुंब या पाड्यात राहत होते. आमच्या शेजारी असणारे पिल्या पारधी यांच्या कुटुंबातील व्यक्ती अजून दिसत नाहीत. त्या सापडतील अशी अपेक्षा आहे. सरकारने मोठ्या प्रमाणावर शोध घेण्याचे काम चालू केले आहे. आम्ही जे वाचलो त्यांची काळजी शासन घेत आहे. पावसाची पर्वा न करता मुख्यमंत्री स्वतः थांबून सर्वांना सूचना देत होते.**

**- लक्ष्मी परशुराम बांगरे (दुर्घटनेतून वाचलेले)**

### दुर्दैवी मृत्यू

आपत्ती व्यवस्थापनासाठी गेलेल्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे साहाय्यक केंद्र अधिकारी शिवराम ढुमणे यांचे इर्शाळगड चढत असताना हृदयविकाराने दुर्दैवी निधन झाले, याबद्दल मुख्यमंत्र्यांनी शोक व्यक्त केला.

### कोकणासाठी निधी

कोकणात वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने ३ हजार २०० कोटी रुपये विविध आपत्ती निवारण कामे करण्यासाठी मंजूर केले आहेत. यामध्ये भूमिगत वाहिन्या, धूप प्रतिबंधक बंधारे, बांध घालणे, बहुउद्देशीय चक्रिवादळात आसरे बांधणे, दरडीप्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाय, वीज अटकाव यंत्रणा यांचा समावेश आहे. राज्यभरातील २० पूरप्रवण जिल्ह्यांमध्ये एकूण ७,९०० आपदा मित्रांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

## अनाथ मुलांचे पालकत्व

डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेने इर्शाळवाडी दुर्घटनेतील अनाथ मुलांचे पालकत्व स्वीकारले. ही मुले १८ वर्षांचे पूर्ण होईपर्यंत त्यांच्या शिक्षण व पालनपोषणाची जबाबदारी संस्थेने घेतली आहे. त्यांच्या आवश्यक त्या सर्व गरजा पूर्ण करण्यात येणार आहे. १०० टक्के पुनर्वसन होईपर्यंत मदतकार्य सुरू राहील. तसेच मदत साहित्याचे वितरण करण्यात आले. इर्शाळवाडीचे सिडकोच्या माध्यमातून विविध मुदतीत कायमस्वरूपी पुनर्वसन केले जाणार आहे.

## मदतीचे आवाहन

इर्शाळवाडी येथे दरड कोसळून मोठ्या प्रमाणात जनजीवन विस्कळीत होऊन पशुधन व खासगी मालमत्तांचे नुकसान झाले आहे. अशावेळी त्यांना आधार देऊन आयुष्यात पुन्हा उभारी घेण्यासाठी समाजातील सामाजिक संस्था / ट्रस्ट / फाऊंडेशन्स / सीएसआर / दानशूर व्यक्ती यांच्याकडून आर्थिक मदत व साहित्याच्या स्वरूपात मदत करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून आर्थिक व जीवनावश्यक साहित्यासाठी मदतीचे आवाहन करण्यात आले आहे. ज्यांना आर्थिक स्वरूपात मदत करावयाची आहे त्यांनी जिल्हा आपत्ती प्रतिसाद निधी (District Disaster Response Fund), बँकेचे नाव :- स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, अलिबाग (State Bank of India, Alibag), बँक खात्याचा नंबर:-38222872300, IFSC Code :- SBIN0000308 या बँक खात्यामध्ये निधी जमा करावा. ज्यांना साहित्य स्वरूपात मदत करावयाची आहे, त्यांनी उपविभागीय अधिकारी, कर्जत अजित नैराळे, मो. ८३९००९००४०, खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी, मो. ९९७५७५१०७६ यांच्याशी संपर्क करून त्या ठिकाणी मदत पोहोचती करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शोध समन्वय समिती

इर्शाळवाडी गावांतील नागरिकांचा शोध घेण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्ह्यातील इतर नागरिकांनी व त्यांच्या नातेवाईकांनी इर्शाळवाडी येथील नागरिकांची काही माहिती असल्यास दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा अथवा पोलीस स्टेशन चौक, ता. खालापूर प्रत्यक्ष भेटावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी केले. संपर्कासाठी दीक्षांत देशपांडे तहसीलदार माथेरान मो. क्र. ८६६९०५६४९२, शीतल राऊत, पोलीस अधिकारी मो. क्र. ९८५०७५६५९५, सतीश शेरमकर, सहा.प्रकल्प अधिकारी मो. क्र. ९४०३०६०२७३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

उपसंचालक (माहिती) कोकण विभाग, नवी मुंबई.



**आपदग्रस्त आदिवासी बांधवांना केंद्र शासनाकडून आवश्यक ती मदत केली जाईल. केंद्र शासन आपल्या पाठीशी आहे. राज्य शासनाने दुर्घटनेत चांगले मदतकार्य केले आहे.**

**- रामदास आठवले, मंत्री, केंद्रीय सामाजिक न्याय**



**पहाटे मी स्थानिक आमदारांसोबत गेलो. ३.३० वाजता प्रत्यक्ष घटनास्थळी पोहोचलो. जाताना अंदाज आला की, येथे यांत्रिक व्यवस्था चढवणे अशक्य आहे. केवळ मनुष्यबळाच्या मदतीनेच मातीचा ढिगारा उपसावा लागेल. अधिकचे मनुष्यबळ मिळवण्यासाठी यंत्रणेला सूचना केल्या. तत्काळ बचावकार्य सुरू झाले.**

**- गिरीश महाजन, मंत्री, ग्रामविकास**



**दुर्घटनाग्रस्त इर्शाळवाडीत ४३ कुटुंब असून, २२९ च्या आसपास लोकवस्ती होती. त्यापैकी २५ ते २८ कुटुंबे बाधित झाली आहेत. रात्री अंधारामुळे बचावकार्यात अडचणी आल्या. मात्र प्रशासनाने आणि एनडीआरएफ पथकाने चांगले काम केले.**

**- उदय सामंत, पालकमंत्री**



**इर्शाळवाडीत रात्री घटना घडल्यानंतर जिल्हाधिकारी व स्थानिक प्रशासनाशी दूरध्वनीवरून चर्चा केली. रात्री एनडीआरएफचे पथक घटनास्थळी पोहोचले. वैद्यकीय उपाययोजनांच्या दृष्टीनेही मी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या. शासनाकडून मदत करण्यात आली. कायमस्वरूपी पुनर्वसनाचे काम केले जाईल.**

**- अनिल पाटील, मंत्री, मदत व पुनर्वसन**



**आदिवासी वस्तीला कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याबाबत शासन पुढाकार घेईल, अशा घटना निसर्गनिर्मित आहेत. शासन आपत्तिग्रस्तांच्या पाठीशी आहे.**

**- दादाजी भुसे, मंत्री, बंदरे विकास**



**इर्शाळवाडीच्या पायथ्याशी जखमींना तत्काळ उपचार मिळावी यासाठी शासनाने आरोग्य यंत्रणेला सज्ज ठेवले. डॉ.विजयकुमार गावित, आदिवासी विकासमंत्री आपदग्रस्त ठिकाणी मी स्वत: पोहोचले. परिस्थितीची माहिती घेतली. दुर्घटनास्थळाच्या जवळच्या यंत्रणा व साहित्य मिळविण्यासाठी संबंधितांना दूरध्वनीवरून सूचना केल्या. मदतकार्याबरोबरच मदत करणाऱ्यांना पिण्याचे पाणी आणि जेवणाची व्यवस्था जागेवर करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने उभी कररण्यात आली. जिल्ह्यात अशी दुदैवी घटना घडली. याचे खूप मोठे दु:ख आहे.**

**- कु. आदिती तटकरे, मंत्री, महिला व बालविकास**

## घटनाक्रम

### १९ जुलै २०२३

**रात्री १०.३० वाजता :** मासेमारी करून या गावातील काही लोक घरी जात होते.
**११.०० वाजता :** डोंगराचा काही भाग खचत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. काही वेळाने घरे मातीखाली गेली असल्याचे त्यांच्या निर्दशनास आले आणि सुरक्षित ठिकाणी खाली पोहोचले.
**११.३० वाजता :** गावातील सरपंच आणि काही गावकरी घटनास्थळी पोहोचले.
**१२.०० वाजता :** त्यांनी स्थानिक पोलीस आणि तहसील कार्यालयाला याबाबत कळवले.
**१२.३० वाजता :** स्थानिक पोलीस व रुग्णवाहिका इतर प्रशासन कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. अंधारामुळे मदतकार्यात अडथळा.

### २० जुलै २०२३

**१ ते १.३० वा :** दरम्यान स्थानिक आमदार महेश बालदी कार्यकर्त्यांसह दाखल झाले. प्रचंड पाऊस सुरू होता.
**२.०० वाजता :** घटनास्थळी ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन आले आणि पाहणी केली. तत्काळ मदतकार्य सुरू झाले.
**२.३० वाजता :** मंत्री दादाजी भुसे दाखल झाले आणि पाहणी केली. प्रशासनाला सूचना केल्या. विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर आणि जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे पोहोचले.
**२.४५ वाजता :** एनडीआरएफची पथके दाखल झाली.
**४.०० वाजेपर्यंत** घटना घडली तेव्हापासून स्थानिक लोक आणि उपस्थित असलेले प्रशासनाचे काही कर्मचारी लोकांना बाहेर काढत होते. शोधकार्य करत होते. पाऊस आणि चिखल यामुळे अडथळा येत होता.
**४.३० वाजता :** शोधकार्य मोहिमेसाठी पनवेल महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाचे कर्मचारीदेखील दाखल झाले.
**५.०० वाजता :** बचावकार्य पथक वर जात असताना एका अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्याचा मृत्यू.
**५.३० वाजता :** २५ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले, तर चार जणांचा मृत्यू झाला होता.
**सकाळी ६.३० वाजता :** एनडीआरएफसह इतर पथकांचे शोध कार्य सुरू झाले.
**७.३० वाजता :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घटनास्थळी दाखल झाले.
**७.४५ वाजता :** हेलिकॉप्टरद्वारे रेस्क्यु ऑपरेशन केले जाणार, त्यासाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्याकडे दूरध्वनीद्वारे निर्देश देण्यात आले. परंतु खराब हवामानामुळे ती व्यवस्था झाली नाही.
**८.४५ वाजता :** मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील घटनास्थळी दाखल झाले.
**९.०० वाजता :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून माहिती घेतली.
**९.१६ वाजता :** ८० लोकांना बाहेर काढण्यात रेस्क्यू टीमला यश. पाच जणांचा मृत्यू.
**९.४५ वाजता :** दुर्घटनास्थळी उपस्थित मुख्यमंत्र्यांशी संवाद साधून त्यांनाही नियंत्रण कक्षास प्राप्त झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिली.
**१०.०० वाजेपासून संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत** एनडीआरएफ व अन्य स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने काम सुरू होते.
**२४ जुलै २०२३** रोजी मदतीचे कार्य थांबवण्याचे आदेश शासनाच्या वतीने पालकमंत्री उदय सामंत यांनी दिले.



# होय मी 'कार्यकर्ता मुख्यमंत्री' आहे !

गुरुवार २० जुलै २०२३ ची सकाळ उजाडली ती एक दुर्दैवी घटना घेऊनच! १९ जुलैची रात्र इर्शाळवाडीवरील ठाकूर जमातीतील आदिवासींसाठी काळरात्र ठरली. लोक झोपेत असतानाच निसर्गाने जणू घालाच घातला. खालापूर येथील इर्शाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या इर्शाळवाडीवर दरड कोसळून अनेक कुटुंबे ढिगाऱ्याखाली गाढले गेले. हे वृत्तच भयंकर होते, साऱ्या महाराष्ट्रासाठी!

हे वृत्त कळताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पहाटे सहा वाजता शासकीय वर्षा निवासस्थानावरून निघाले आणि घटनास्थळी आठ वाजता पोहोचले. परिस्थितीची माहिती प्रशासनाकडून घेतली. घटना दुर्दैवी होती. जीवितहानी कमी व्हावी, जखमींना त्वरित मदत मिळावी म्हणून त्यांनी लगेच शासकीय आणि निमशासकीय यंत्रणेला मदतीसाठी निर्देश दिले. काही क्षणात मदतीचे हजारो हात उभे राहिले. मदतकार्य सुरू झाले. दुर्घटनाग्रस्तांना प्रत्यक्ष भेटून त्यांचे सात्वन मुख्यमंत्री करत होते. मदतकार्याने एव्हाना वेग घेतला होता. दुपारी ११.३०च्या सुमारास मुख्यमंत्र्यांचा ताफा तेथून बाहेर पडला. उपस्थितांना वाटले, मुख्यमंत्री मुंबईला परतले म्हणून; परंतु असे सहज परत जातील ते मुख्यमंत्री थोडेच होते. त्यांच्यातला मदतीला धावून जाणारा 'कार्यकर्ता' या मोठ्या घटनेतही जागा होता.



रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे यांच्या गाडीतून ते पुन्हा घटनास्थळी रेनकोट घालून आले. पाऊस वाढला होता. गडाच्या खाली उपस्थितांना म्हणूनच त्याची कल्पना आली नाही. कारण मुख्यमंत्र्यांचा ताफा नव्हता आणि अचानक मुख्यमंत्री घटनास्थळाकडे चालू लागले. इर्शाळवाडीपर्यंत पोहोचण्यासाठी पायवाट होती. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे केवळ दुर्घटनाग्रस्तांच्या मदतीसाठी चालत होते. सतत पाऊस सुरू होता, वाराही जोरात होता. सर्वत्र धुक्याचे साम्राज्य होते. मुसळधार पाऊस आणि दुर्गम भागामुळे अडचणी येत होत्या. घनदाट झाडाझुडपातून वाट काढत दर १५ ते २० मिनिटांनी क्षणभर विश्रांतीसाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे थांबत होते. तब्बल दीड तास पायपीट केल्यानंतर मुख्यमंत्री इर्शाळवाडीवर पोहोचले. त्यांनी सकाळपासून केवळ चहा घेतला होता. मुख्यमंत्र्यांनी प्रत्यक्ष उद्ध्वस्त झालेल्या वस्तीवर येऊन बचावकार्याचे नेतृत्त्व केले. तेथे मदतकार्य करत असणाऱ्या जवानांशी चर्चा केली. त्यांना अतिरिक्त मुनष्यबळ, यंत्रसामग्री काय हवी याची विचारपूस केली. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीने जवानांचे मनोधैर्य वाढले.

कोसळणारा धो-धो पाऊस, खाली निसरडी गाळाने भरलेल्या दगडगोट्यांची पायवाट, पाय घसरल्यास काय होईल, याची कल्पना असूनदेखील न डगमगता मुख्यमंत्री श्री. शिंदे सर्वसामान्यांच्या दु:खात सहभागी झाले. तब्बल दीड तासाचे अंतर चालून गेल्यावर मुख्यमंत्री श्री. शिंदे पुन्हा डोंगरमाथ्यावरून खाली उतरू लागले. तेवढाच वेळ खाली येण्यासाठी लागला. पण ती खरी कसरत होती. पाऊस वाढतच होता. डोळ्यावर असणारा चष्मा पावसामुळे काढावा लागला. सोबतच्या सहकाऱ्यांना पुढील सूचना देत पायवाटेने मुख्यमंत्री श्री. शिंदे चालत होते. एवढ्या उंचावर साहित्य घेऊन जाणाऱ्या बचाव पथकातील कर्मचाऱ्यांना सलाम करतो, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी दुर्घटनाग्रस्त लोकांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे दाखवून दिले.

दुर्घटनाग्रस्त जागेवर जाणे जेवढे कठीण होते, त्याहीपेक्षा त्या जागेवरून खाली येणे, ही मोठी कसरत होती. तरीही मुख्यमंत्री साऱ्या सहकाऱ्यांसोबत सुखरूप खाली उतरले. प्रसारमाध्यमांशी बोलले आणि मार्गस्थ झाले. रेनकोट घातलेले मुख्यमंत्री श्री. शिंदे तिथे उपस्थित असणाऱ्या साऱ्यांनी पाहिले आणि सारेच त्यांच्या या अशक्य वाटणाऱ्या घटनेबद्दल चर्चा करू लागले.

प्रत्यक्ष घटना घडलेल्या ठिकाणी पालकत्वाच्या भूमिकेत मुख्यमंत्री श्री. शिंदेच उपस्थित होते. स्वत:ला सामान्यांचा कार्यकर्ता म्हणून केवळ भाषणात न सांगता त्यांनी सर्वांसमोर हे सिद्ध केले. होय मी मुख्यमंत्री कार्यकर्ता आहे! यावेळी मुख्यमंत्री पावसातला 'योद्धा' होते, आपत्ती व्यवस्थापनातील 'तज्ज्ञ' होते, प्रशासनातील 'जरब' असलेले नेता होते. त्याचबरोबर 'मानवी संवेदना' जपणारा एक संवेदनशील 'माणूस'देखील होते. मुख्यमंत्रीपद हे सर्वसामान्यांच्या संकटसमयी उपयोगी पडावे यासाठी असते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले आहे. मुख्यमंत्र्यांच्या या धाडसाचे कौतुक करावे तेवढे थोडेच! नैसर्गिक आपत्तीने मृत्युमुखी पडलेला माणूस परत आणता येते नाही; परंतु आहे त्या माणसाला 'मदतीचा हात' देण्यासाठी शासन नेहमीच पुढे असते. हे मुख्यमंत्र्यांनी संपूर्ण दिवस घटनास्थळी थांबून संपूर्ण राज्यासमोर दाखवून दिले.

**– डॉ. गणेश मुळे,**

उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई

**आपत्ती व्यवस्थापनाची पूर्व तयारी म्हणून पूर्वतयारी, जलद निर्णय, त्या-त्या परिस्थितीत मिळणारा लोकांचा प्रतिसादाचा, तसेच शासकीय हस्तक्षेप, परिपूर्ण नियोजन, उपलब्ध निधी या सर्व गोष्टी व्यवस्थापनेमध्ये महत्त्वाच्या ठरतात. व्यवस्थापन प्रकियेमध्ये प्रशिक्षण, जनजागृती उपक्रम यंत्रणांचा सराव महत्त्वाच्या ठरत आहेत. तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये होणारे नुकसान टाळण्यासाठी लोकांना प्रशिक्षण देणे ही काळाची गरज बनत आहे.**

# आपत्तीनंतरचे व्यवस्थापन

**किरण वाघ**

१९ जुलैची रात्र खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडीसाठी काळरात्र ठरली. होत्याचं नव्हतं झालं. निसर्गाच्या सान्निध्यात आणि इर्शाळगडाच्या पायथ्याशी वसलेली ४५ घरांची ठाकूर वस्ती काही समजण्याच्या आत क्षणात मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेली. हा निसर्गाचा कोप असला, तरी स्वतःच निर्माण केलेली गाईगुरे, इतर पाळीव प्राणी व हसतीखेळती कुटुंबे आपल्या पोटात सामावून एका नवीन पठाराची निर्मिती निसर्गाने केली. कदाचित भविष्यात हे पठार प्रेक्षणीय स्थळ म्हणून उदयासही येईल; पण ज्यांचे आप्त या ढिगाऱ्याखाली गाडले गेले त्यांच्यासाठी हे स्थळ म्हणजे एक थडगे असेल. त्यांच्या आठवणी कायम त्या मातीच्या ढिगाऱ्यात दफन न होता जागृत राहतील. त्यांचा आक्रोश त्या स्थळाने पाहिलाही आणि ऐकलाही आहे.

### कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या हिमतीला सलाम

प्रथमदर्शनी ज्या अधिकारीवर्गाने ही घटना पाहिली, त्यांनी धैर्य दाखवले. त्यांच्या हिमतीला आणि धैर्याला सलाम! डोळ्यासमोर येतात ते खालापूर तालुक्याचे कर्तव्यदक्ष प्रशासकीय अधिकारी तसेच कर्मचारी. क्षणाचाही विलंब न करता अलिबागहून तत्पर इर्शाळवाडीवर पोहोचणारे पोलीस कर्मचारी आणि स्थानिक यंत्रणा यांनी परिस्थितीचे गांभीर्य जाणून नियोजनबद्ध पद्धतीने यंत्रणा हलवली. माणुसकीची जाण ठेवून, समाजाप्रति आपले कर्तव्य समजून सर्वजण मदतीला धावून आले. १९ जुलैच्या मध्यरात्रीपासून कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांनी डोंगरदऱ्या पार करून रात्री १२ वाजता अवघ्या सव्वा ते दीड तासात दुर्घटनास्थळ गाठले. घटनेची माहिती संबंधित यंत्रणेला व वरिष्ठांना कळवली. आपत्तीत मदतीला धावून जाणाऱ्या सामाजिक संघटनांशी समन्वय साधत तत्परतेने डोंगरावर पोहोचले. डोंगरावर पोहोचल्यानंतर तेथील परिस्थिती ही कल्पनेपेक्षा वेगळी होती.

कोणताही अंदाज येत नसताना आपले संतुलन ढळू न देता अधिकाऱ्यांनी प्रत्येक निर्णय योग्य आणि अचूक घेतला. जेवढे जीव वाचवता येतील तेवढे आपण वाचवले पाहिजेत, हेच उद्दिष्ट मनात ठेवून सर्व अधिकारी अवघड गड चढत होते. गड चढून आलेला थकवा विसरून मदतकार्याला आलेल्या सर्वच शिलेदारांना प्रचंड ताकद आणि ऊर्जा देत होते. त्यांची इच्छाशक्ती इतकी प्रबळ होती की, वरून कोसळणारा धो-धो पाऊस, अंगाला झोंबणारा वारा आणि थंडी या अडचणींचा सामना करत मदतकार्य चालूच ठेवले होते.









ही दुर्घटना याची देही याची डोळा पाहिलेल्यांपैकी जगदीश मरागजे सांगतात, 'मला आठवतंय, मी पावणे तीनच्या सुमारास अय्युब तांबोळी यांना काही माणसे अडकल्याचा कॉल केला. या ठिकाणी काही लोक मातीच्या ढिगाऱ्याखाली दबलेले असावेत, असा अंदाज वर्तविला. त्यांनी त्वरित आम्हाला सूचना केली आणि सांगितले की, जेवढे होईल तेवढे जीव वाचवता येतील, त्यासाठी प्रयत्न करा आणि स्वत:चीही काळजी घ्या. आम्ही प्रयत्न केले. ४० मिनिटांच्या अथक प्रयत्नानंतर दुर्दैवाने तीन मृतदेह बाहेर काढले. ज्यामध्ये एक पुरुष वय वर्ष २५, त्याची पत्नी वय वर्ष २१ आणि जीवन-मृत्यू याचा अर्थही ठाऊक नसलेली सहा महिन्यांची त्यांची मुलगी. हे दृश्य पाहिल्यानंतर भर पावसात अधिकारीवर्गाच्या डोळ्यात तरळलेले अश्रू आणि त्यातील भावना अगदी सहज दिसत होत्या.

आता खऱ्या अर्थाने रेस्क्यूला सुरुवात झाली होती. दुर्घटनास्थळी सामाजिक संस्थेला प्रवीण पारधीसह अन्य तीन लोकांना जिवंत वाचवण्यात आणि पहिले तीन मृतदेह बाहेर काढण्यात यश आले होते. त्याच वेळी यशवंती हाईकर्स, इतर स्थानिक संस्था आपल्या परीने प्रयत्न करत होते. साधारण पहाटे पाचच्या सुमारास एनडीआरएफचे जवान घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर तासाभरात टीडीआरएफचे जवानही पोहोचले आणि मदतकार्यास गती मिळाली.

महत्त्वाच्या महसूल विभागातील तालुक्याचा कारभार पाहणाऱ्या तहसील कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी भर पावसात चिखलाने माखलेल्या कपड्यांमध्ये मदतीसाठी सरसावत होते. दुर्घटनेमध्ये सापडलेल्या मृतदेहांची विल्हेवाट लावण्यासाठी एनडीआरएफचे जवान भर पावसामध्ये खड्डे खोदत होते. ही परिस्थिती बघून क्षणभर डोळ्यावर विश्वासच बसत नव्हता, पण नियतीने हे घडवून आणले होते.' त्या दरम्यान या सर्वच अधिकारीवर्गाने चार दिवस आपत्ती व्यवस्थापन बाखुबी यशस्वी केले. अगदी नियोजनबद्ध, शिस्तबद्ध आणि प्रामाणिकपणे केलेल्या कार्याची चर्चा महाराष्ट्रासह देशात आहे. मदतकार्य संपले आणि पुनर्वसन करण्याची वेळ आली, तेव्हा त्वरित कंटेनर हाऊसची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच रस्ते, पोलीस छावणी, आरोग्य केंद्र, पिण्याचे स्वच्छ पाणी यांसारख्या सुविधा तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आल्या होत्या.

माहिती अधिकारी, रायगड

**इर्शाळवाडी दुर्घटनेत बचावलेल्या लोकांच्या पाठीशी शासन ताकदीने उभे आहे. तेथील लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी तत्काळ कार्यवाही करण्यात येत आहे. कुटुंबांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी सिडकोकडून जागा निश्चित करून त्या जागेचा सर्वांगीण विकास करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे.**

# पुनर्वसनासाठी प्रयत्न

**मनीषा पिंगळे**

रायगड हा आपत्तीप्रवण जिल्हा आहे. डोंगर, दऱ्या आणि समुद्र यांची सीमा असलेल्या या जिल्ह्यात पावसाचे प्रमाण देखील सर्वाधिक असते. १७ ते १९ जुलैच्या सकाळपासूनच मुसळधार पावसामुळे नदी परिसरातील भागांवर आणि धोकादायक गावांवर सर्वांचेच लक्ष होते. या मुसळधार पावसामध्ये खालापूरजवळील इर्शाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या इर्शाळवाडीवर बुधवारी रात्री उशिरा दरड कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली. दुर्घटनेची बातमी समजताच जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे आणि जिल्हा प्रशासन कामाला लागले. उपविभागीय अजित नैराळे, तहसीलदार आयुब तांबोळी आणि पोलीस निरीक्षक बाळा कुंभार आणि नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी दुर्घटनास्थळाकडे जाण्यास सुरुवात केली. घटनास्थळ हे डोंगरावर होते. अंधार असल्याने मोबाइल व इतर बॅटरींच्या उजेडात वाट काढत त्यांनी घटनास्थळ गाठले. दरम्यान गावातील शाळेत वास्तव्यास असणाऱ्या मुलांनी दरड कोसळल्याची माहिती पोलीस कंटोल रूमला दिली.

प्रशासकीय यंत्रणेमार्फत सर्व बचाव पथकांना तसेच स्वयंसेवी संस्थांना तत्काळ मदतीसाठी बोलवण्यात आले. मुसळधार पावसासोबत वादळी वाराही जोराचा होता. अंधारात वाट काढतच घटनास्थळी पायी जावे लागणार होते. डोंगराळ भाग, जाण्याचा रस्ता केवळ तीन फुटांचा, बाजूला खोल दरी, जोराचा वारा आणि वरून पाऊस यामध्ये पायी चालणे कठीण जात होते. याठिकाणी वाहने जाण्यासाठी रस्ता नसल्याने मानिवली या गावातून पायी चालत जावे लागते. कुठल्याही प्रकारची यंत्रसामग्री पोहोचू न शकल्याने मानवी मदतीवरच हे बचावकार्य सुरू होते. खराब हवामानामुळे हवाई आणि यांत्रिक मदतीसाठी मर्यादा आल्या. त्यामुळे मनुष्यबळाकडूनच मदत व बचावकार्य करावे लागले. एनडीआरएफ पथकाच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी व पोलिसांकडून एमएमआरसीसी व डोंगरातील रेस्क्यु हेल्पलाइनवर मदतीसाठी फोन आले. त्वरित यशवंती हाइकर्स निसर्गमित्र पनवेल, अजिंक्य हायकर्स शिवदुर्ग मित्र, इतर काही संस्था, शासकीय यंत्रणा, ग्रामस्थही घटनास्थळी पोहोचले. ठाणे महापालिका आपत्कालीन व्यवस्थापनाच्या स्पेशल टीडीआरएफचे २२ जवान मदतकार्यात सहभागी झाले. सर्वांच्या सहकार्याने मदतकार्य सुरू होते. मदतकार्यासाठी साडेतीन किलोमीटरचा पायी प्रवास करून घटनास्थळापर्यंत पोहोचणे हेच मुख्य आव्हान बचावदलासमोर होते. मातीचा ढिगारा, राडारोडा उपसण्याच्या कामी सर्वजण लागले. पाऊस सुरूच होता. त्यामुळे जेवढा ढिगारा उपसत होतो, त्यापेक्षा जास्त वरून पुन्हा जमा होत होता.




## मुख्यमंत्रीमहोदयांचा दिलासा

दर गुरुवारी उपवास करणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अक्षरशः उपाशी पोटी दुर्घटनास्थळी पोहोचले. वाटेत जाताना मृतांचे कुटुंबीय-नातेवाईक भेटले, त्यांना मुख्यमंत्र्यांनी दिलासा दिला, त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. अक्षरशः जीवानिशी वाचलेल्या या सर्व नागरिकांना 'मी तुमच्या घरातील आहे, तुमचा आहे, तुमच्या पाठीशी नव्हे, तर सोबत आहे, काळजी करू नका,' असा धीर दिला. मुख्यमंत्रीमहोदय दुर्घटनास्थळी पोहोचले आणि एनडीआरएफ, टीडीआरएफ आणि अग्निशमन दलातील सर्व जवानांना आश्वस्त केले, धीर दिला.

## बचावकार्याला जातानाच गाठले मृत्यूने

इर्शाळवाडी येथे झालेल्या दुर्घटनेत बचावकार्यासाठी जाताना नवी मुंबई महापालिका अग्निशमन दलाचे अधिकारी कै. शिवराम ढुमणे यांचा मृत्यू झाला. इर्शाळगडापूर्वीचा डोंगर चढत असतानाच त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. इर्शाळवाडीलगतच त्यांच्या मावशीचे गाव असल्याने परिसराबद्दल

त्यांना इत्थंभूत माहिती होती. तिथल्या पायवाटा माहिती असल्याने व मुसळधार पाऊस असल्याने काय खबरदारी घेतली पाहिजे, याबाबत ते सर्वांना मार्गदर्शन करत होते. अशा सहकाऱ्याच्या जाण्याने मनोबल खचू नये, यासाठी मुख्यमंत्री स्वतः जवानांच्या बरोबरीने जात होते, त्यांना धीर देत होते.

## तात्पुरते पुनर्वसन

दुर्घटना घडल्यानंतर या गावातील नागरिकांचे तात्पुरते पुनर्वसन चौक येथील जागेत करण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला, यासाठी ४५ कंटेनर पाणी, वीज यांसह आपत्तिग्रस्तांना सर्व सोयीसुविधा असलेले निवारे देत या ठिकाणी आरोग्य केंद्र सुरू करण्यात आले. त्यांना शिबिर घेऊन रेशनकार्ड, अन्न धान्याचा पुरेसा साठा, त्यांच्या बँक खात्याबाबतची कार्यवाही, नियमित वैद्यकीय तपासणी, गरज असल्यास रुग्णालयात दाखल करून उपचार देण्यात येत आहेत. यासाठी संबंधित विभाग व यंत्रणांनी अधिकारी कर्मचारी या ठिकाणी नियुक्त केले आहेत. या सर्वांना मानसिक आधार देऊन समुपदेशन केले जात आहे. क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट, समाजसेवा अधीक्षक, सामाजिक कार्यकर्ता यांच्यामार्फत समुपदेशनाचे काम केले जात आहे.

दरड दुर्घटनेतून सर्व बचावलेल्यांना बाहेर काढणे आणि त्यांना मदत व निवारा देणे, इथपर्यंत शासनाचे काम मर्यादित न ठेवता यामध्ये सापडल्याने दुर्दैवी ठरलेल्या, आप्तजन गमावलेल्या आदिवासी बांधवांना आधार देणे, जगण्याचा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण करणे हे आव्हानात्मक काम जिल्हा प्रशासन करत होते. या एकूण ४३ कुटुंबांमध्ये २२९ लोक होते. या दुर्घटनेत २७ व्यक्तींचा मृत्यू झाला असून १४५ जण हयात आहेत. ५७ व्यक्तींचा शोध अद्याप लागलेला नाही. उर्वरित व्यक्तींचा शोध घेण्यासाठी शासकीय स्तरावर प्रयत्नांची पराकाष्ठा केली जात आहे.

या दुर्घटनाग्रस्त व्यक्तींचे काम होणे, त्यांना जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणणे, त्यांच्या मानसिक अवस्था समजून त्यांना आधार देणे महत्त्वाचे होते. यातील महिला, पुरुष, युवक अशा सज्ञान प्रौढ अनुभवी व्यक्तींच्या मूलभूत गरजा भागवणे ही प्राथमिक गरज होती. अगदी १ वर्षाचे वय असलेली मुले, शाळेत जाणारी मुले-मुली, आश्रमशाळेतील मुले यांच्या शिक्षणाचा विचार होणे महत्त्वाचे होते. अनाथ झालेल्या आदिवासी पाड्यातील २२ मुला-मुलींचे पालक होणे यावेळी महत्त्वाचे होते.

मुख्यमंत्र्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत घटनेनंतर एकाच दिवसात फूड पॅकेट्स्, ब्लँकेट्स्, कंटेनर यासह मदत साहित्याचा ओघ घटनास्थळाच्या बेस कॅम्पकडे वाहू लागला. भर पावसातदेखील बचाव व मदतकार्य सुरू होते.

### हॅम रेडिओ, सॅटेलाईटची मदत

इर्शाळवाडी ते पायथ्यावरील बेस कॅम्पपर्यंतचा परिसर पायी चालण्यासाठी मुसळधार पावसामुळे साडेतीन तास लागत असल्याने वीज नसलेल्या या परिसरात संपर्क साधण्यासाठी रिलायन्स फाऊंडेशनने हॅम रेडिओ आणि एनडीआरएफने सॅटेलाईटची मदत दिली. हॅम रेडिओ पाच व्हॅटचे असल्याने हा व्हीएचएफ सेट आहे. यातून एकाच वेळी १० किलोमीटर अंतरापर्यंत संपर्क साधता येतो, अशी माहिती येथील अधिकाऱ्यांनी दिली. तसेच यातील संपर्क यंत्रणा अँटेना टू अँटेना असल्याने कोणत्याही इंटरनेटविना ही संपर्कव्यवस्था सुरू राहते.

## पुनर्वसनासाठी ५०० स्क्वेअर फूट जागा

दरड आपत्तिग्रस्त कुटुंबांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी जागा निश्चित करून त्या जागेचा सर्वांगीण विकास करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. प्रत्येक दरडग्रस्त कुटुंबाचे पुनर्वसन करताना शासनाकडून काही योजना करण्यात आल्या आहेत. दरडग्रस्त कुटुंबाला पुनर्वसनासाठी ५०० स्क्वेअर फूट जागा देण्यात येते. जर एखाद्या कुटुंबाची मूळ जागा ५०० स्क्वेअर फुटांपेक्षा जास्त असेल, तर त्या कुटुंबाला पर्यायी जागेत उरलेल्या जागेचे नियोजन करण्यात येते आणि जर पुरेशी जागा उपलब्ध नसेल, तर पर्यायी जागेपेक्षा जास्त क्षेत्राचा मोबदला सरकारकडून दिला जातो. तसेच त्यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील ५ वाड्यांचे आणि २० धोकादायक गावांचे पुनर्वसन करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली.

## सहा वाचले पण भाऊ गमावाला !

'बाहेर मुसळधार पाऊस, कुटुंब गाढ झोपेत, रात्री साडेबारा वाजताची वेळ आणि अचानक घराचा वासा अंगावर पडला. काय झाले कळले नाही. सारे कुटुंब मातीच्या ढिगाऱ्याखाली. त्याही परिस्थितीत हिंमत करून उठलो, दुसऱ्या खोलीत असलेले आई-वडीलही ढिगाऱ्याखाली. बाहेर पडण्यासाठी छोटीशी जागा. त्यातून आई-वडील, पत्नी, मुलगी, भाऊ आणि मी कसेतरी बाहेर पडलो; मात्र दुसरा भाऊ पूर्ण ढिगाऱ्याखाली गाडला गेल्याने त्याला वाचवणे शक्य झाले नाही.' स्वतःवर ओढवलेला हा प्रसंग सांगताना मोहन सुतराम पारधी यांना भावना अनावर झाल्या. मोहन यांनी हिमतीने आपल्या कुटुंबाला वाचवले; मात्र भावाला वाचवू शकले नाही, हे दुःख त्यांच्या मनात राहिले.

## रामी आजींना मिळाला पुनर्जन्म

७७ वर्षीय आजी इर्शाळवाडी दुर्घटनेतून सुखरूप बचावल्या आहेत. रामी रमा पारधी (७७) असे त्यांचे नाव आहे. त्यांनी सांगितले की, 'बुधवारी रात्री सौर यंत्रणा बंद असल्याने सर्वत्र अंधार पसरला होता. त्यातच धो-धो कोसळणारा पाऊस असल्याने मी एकटी राहणारी लवकर निजले. थोड्याच वेळात मोठा आवाज झाल्याने, काय झाले पाहण्यासाठी घराबाहेर निघाले. दरड कोसळल्याने आरडा-ओरड ऐकू येत होती. लोक इकडून तिकडे पळत होते. मीपण घाबरून गेल्याने वाट मिळेल तिकडे चालत होते. अंधारात काहीच कळत नव्हते. खूप भीती वाटत होती, धो-धो पाऊस पडत होता, म्हणून एका झाडाच्या आडोशाला बसून राहिले. सकाळ होताच बचाव पथकाच्या मदतीने खाली आले. माझी वेळ आली नव्हती, म्हणूनच मी वाचले.'

जिल्हा माहिती अधिकारी, रायगड

**आपत्ती व्यवस्थापनामध्ये सज्ज्ता प्रतिसाद पुनर्प्राप्ती आपत्तीसाठीची पूर्वतयारी या सर्व गोष्टी महत्त्वाच्या असतात. कोणतीही आपत्ती कायमस्वरूपी थांबू शकत नाही; पण पूर्वतयारी करून आपण अनेकांचे जीवित व वित्तहानी नक्कीच कमी करू शकतो. नांदेड, चंद्रपूर, बुलडाणा, यवतमाळ, कोल्हापूर यांसारख्या पूरप्रवण जिल्ह्यातील पूरपरिस्थितीचा नियोजनबद्ध घेतलेला आढावा...**

## चंद्रपूर

### संकटावर मात, प्रशासनाची साथ

वैनगंगा नदीच्या पुरामुळे ब्रह्मपुरी, सिंदेवाही, सावली व गोंडपिपरी तालुक्यातील गावे, उमा आणि अंधारी नदीच्या पुरामुळे चिमूर व मुल तालुक्यातील गावे; तसेच इरई व झटपट नदीच्या पुरामुळे चंद्रपूर शहरातील काही भाग व नदीकाठावरील गावे बाधित होतात. नद्यांच्या पुरामुळे जिल्ह्यातील ८६ गावे पूरप्रवण क्षेत्रात येतात.

### शोध व बचाव साहित्य

रोप आणि रेस्क्यू किट १, बॉब रोप १२ एमएम ५०० मिटर, एचडीपीई बोट विथ ओबीएम ३, एफआरपी बोट १, रबर बोट विथ ओबीएम ३० एचपी- ७, लाईफ जॅकेट ६४, लाईफ बॉय २६, फ्लोटिंग स्ट्रेचर १, रेस्क्यु चेन सॉ लाईट वेट १, टेन्ट कॅनवास २, गमबूट ६, सेफ्टी हेल्मेट १८, बायनॅक्युलर स्टँडर्ड २, हॅमर ९, एक्स इम्पोर्टेड २, पोर्टेबल स्टोरेज टँक ५००० लिटर, सेफ्टिनेट ४, रेनकोट ८, रिफ्लेक्टिव्ह जॅकेट फॉर रेस्क्यु वर्कर २०, बॅरिकेट टेप १० बंडल, हेविड्युटी ग्लोज ३०, हेड लाईट टॉर्च (हेडलॅम्प) १० नग या प्रमाणात शोध व बचाव साहित्य उपलब्ध आहे.

### स्थलांतरित केलेल्या नागरिकांची माहिती

२२ जुलै २०२३ रोजी चिंतलधाबा, ता. पोंभुर्णा येथील ४० व्यक्तींना पूरपरिस्थितीमुळे जिल्हा परिषद शाळेत स्थलांतरित करण्यात आले होते. तसेच २२ जुलै २०२३ रोजी करंजी, ता. गोंडपिपरी येथील ३५ व्यक्तींना माळी समाज भवन, करंजी येथे स्थलांतरित करण्यात आले होते. २४ जुलै २०२३ रोजी हिरापूर ता. सावली येथील ४ व्यक्तींना पूरपरिस्थितीनुसार हिरापूर अंगणवाडी, ता. सावली येथे स्थलांतरित करण्यात आले होते.



### करण्यात आलेल्या उपाययोजना

चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे आपत्ती व्यवस्थापनांतर्गत १ जूनपासून २४ तास पूर नियंत्रण कक्ष कार्यरत आहे. संबंधित अधिकारी कर्मचारी यांना आपत्ती काळातील कामांची निश्चिती करून आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. एवढेच नाही, तर आणीबाणी काळात संपर्क करण्यास ०७१७२-२५४६१४, ०७१७२-२५९४०६, (१०१), ८९७५९९४२७७, ९८२३१०७१०१ हे क्रमांक नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

या क्रमांकांची सोशल मिडियावर, भ्रमणध्वनी संदेशामार्फत, तसेच ऑटो मायकिंगद्वारे प्रचार प्रसिद्धी करण्यात आली. इतर विभाग जसे - नियंत्रण कक्ष (मुंबई), जिल्हाधिकारी कार्यालय नियंत्रण कक्ष चंद्रपूर, महसूल विभाग, जिल्हा परिषद, होमगार्ड, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, वेकोलि, वीज वितरण विद्युत कंपनी, सिंचन विभाग इत्यादींचे दूरध्वनी क्रमांक आपत्ती नियंत्रण कक्षात उपलब्ध करून देण्यात आले. औषधी पुरवठाधारक, दवाखाने, ॲम्ब्युलन्स सेवा, ब्लड बँक, सामाजिक संस्था, राहण्यायोग्य ठिकाणांची यादी, चित्रपट गृह व सभागृह, आश्रमशाळा, पूरप्रवण क्षेत्रातील मंगल कार्यालय यादी, जलतरणपटू यांची यादी उपलब्ध ठेवण्यात आली. आपत्ती व्यवस्थापन साहित्य तयार ठेवण्यात आले आहे.

पूरपरिस्थितीमुळे १२ मनपा शाळा नागरिकांना आश्रय घेण्यास सज्ज ठेवण्यात

आल्या. शाळांमध्ये झोपण्याची व्यवस्था, विद्युत व्यवस्था, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, जेवण, नाश्ता, चहा इत्यादी सोयी सुविधा पुरवण्यात आल्या. या शाळांमध्ये जवळपास ५०० लोकांनी आश्रय घेतला होता. आश्रय घेतलेल्या सर्व नागरिकांची आरोग्य विभागामार्फत आरोग्य तपासणी करण्यात येऊन आवश्यक त्या नागरिकांना प्रथमोपचार व औषधे देण्यात आली.

आरोग्य विभागामार्फत २५ ब्रिडिंग चेकर्स, ३५ एएनएम, ७ एमपीडब्ल्यू व १६० आशा वर्कर; तसेच स्वच्छता निरीक्षक यांच्याद्वारे डासोत्पत्ती स्थाने तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

**– राजेश येसनकर,**
जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर




## यवतमाळ

### पूरग्रस्तांना दिलासा

संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यात २१ जुलैच्या रात्री जोरदार पाऊस झाल्याने संपूर्ण जिल्ह्यातच आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली होती. महागाव तालुक्यातील आनंदनगर तांडा या गावाला पूर्णपणे पुराचा वेढा पडल्याने तेथील नागरिकांना सुरक्षित बाहेर काढणे मोठे आव्हान होते. स्थानिक पथकांच्या मदतीने त्यांना बाहेर काढणे शक्य नसल्याने हवाई दलाचे हेलिकॉप्टर पाचारण करण्यात आले. स्थानिक परिस्थिती अनुकूल नसल्याने हेलिकॉप्टर उपयोगी पडले नाही. परिस्थिती गंभीर होत असताना अखेर राष्ट्रीय व राज्य आपत्ती निवारण दलाच्या पथकाने जोखीम घेऊन पाच तासांच्या प्रयत्नांनंतर अडकलेल्या ११० नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. स्थानिक पथकांसह राष्ट्रीय व राज्य आपत्ती निवारण पथकांचे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील व पालकमंत्री संजय राठोड यांनी कौतुक केले.

प्राथमिक अंदाजानुसार २ लाख ४८ हजार हेक्टर क्षेत्रावरील शेतपिकांचे नुकसान झाले, तर नदी नाल्यांना आलेल्या पुरामुळे तब्बल ७,४७३ हेक्टर इतकी शेतजमीन खरडून गेली. ७,७४५ कुटुंबे बाधित झाली. बाधित कुटुंबांना मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित करण्यात आले. पूरस्थितीत अडकून पडलेल्या २८९ नागरिकांना शोध व बचाव पथकाने सुरक्षितस्थळी हलवले आहे.

नदीकाठावरील ६ हजार २७५ नागरिकांना सुरक्षितस्थळी तात्पुरत्या निवारागृहात हलवण्यात आले. या ठिकाणी प्रशासनाच्यावतीने त्यांचे भोजन, निवास, ब्लँकेटची उत्तम व्यवस्था करण्यात आली.

### पाहणी व आढावा

राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी यवतमाळला भेट देत जिल्ह्याच्या पूरपरिस्थितीचा आढावा घेतला. या संकटात नुकसानग्रस्तांच्या पाठीशी उभे राहण्यासोबतच त्यांना तातडीने मदत देण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. नुकसानग्रस्तांना तातडीने सानुग्रह अनुदान व अन्नधान्य वाटप करण्यात यावे. शेतपिके व शेतजमिनींचे नुकसान, शासकीय मालमत्तेच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून अहवाल सादर करण्याच्या संबंधितांना सूचना केल्या आहेत.

### बाधितांना सानुग्रह अनुदान

नुकसानग्रस्त शेतपिके, शेतजमिनी, घरे, गोठे यांचे सर्वेक्षण युद्धपातळीवर केले जात आहे. पुरामुळे बाधित झालेल्या नागरिकांना तात्पुरता खर्च भागवण्यासाठी शासन तातडीने सानुग्रह अनुदान देते. यवतमाळ जिल्ह्यात ७,७४५ कुटुंब बाधित झाले. या बाधितांना ३ कोटी ८७ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्यात आले.

**– मंगेश वरकड,**
जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ

## बुलडाणा

### प्रशासनाची सजगता

सलग चार तास अतिवृष्टीने पूर परिस्थिती निर्माण झाली. पूरपरिस्थितीबाबत प्रशासनाने दाखवलेली तत्परता आणि या परिस्थितीवर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमुळे जीवित व वित्तहानी टळली आहे.

### सरसकट पंचनामे

खरीप हंगामात संग्रामपूर तालुक्यात ४२,९३७ हेक्टर, तर जळगाव जामोद तालुक्यात ४०,४६८ हेक्टर सरासरी पेरणी क्षेत्र आहे. सर्वाधिक नुकसान कापूस आणि सोयाबीन या दोन पिकांचे झाले आहे. आसलगाव, खेर्डा खुर्द, खेर्डा बुद्रुक, उटी खुर्द, उटी बुद्रुक, वडशिंगी, चावरा, इलोरा, पिंपळगाव काळे, येणगाव, सुनगाव, जामोद, चालठाणा या गावांना पुराचा फटका बसला आहे. शेतकऱ्यांना पिकविम्याची रक्कम मिळवून देण्यासाठी सरसकट पंचनामे करण्यात आले आहे.



## मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत

संग्रामपूर तालुक्यातील पुरामुळे मृत्युमुखी पडलेले एकलारा येथील मदन पांडुरंग धुळे (वय ५०) यांच्या कुटुंबीयांना नैसगिक आपत्ती योजनेतून चार लाख रुपयांची मदत केली आहे.

तसेच घरांचे नुकसान झालेल्या कुटुंबांना तातडीने १० हजार रुपयांची मदत दिली आहे. प्राथमिक अहवालानुसार जळगाव जामोदमध्ये २,२०० घरे, तर संग्रामपुरात १,१५० घरांचे नुकसान झाले आहे. घराच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरू आहे.

## स्थानिक बचाव पथकाची मदत

आपत्ती व्यवस्थापन कक्षाने प्रत्येक तालुक्यात प्रशिक्षित मनुष्यबळ तयार केले होते. ही पथके परिसरातील नागरिकांच्या बचावासाठी धावून आली. पूरपरिस्थितीत धुळे येथील एसडीआरएफचे एक पथक तैनात करण्यात आले होते.

## स्वयंसेवी संस्थांकडून स्वच्छता

पूर ओसरल्यानंतर स्वयंसेवी संस्थांनी गाळ काढण्याचे काम हाती घेतल्याने याठिकाणी आरोग्याची स्थिती नियंत्रणात राहिली. नागरिकांना अन्न, पाणी, आरोग्य सुविधा मिळण्यासाठीही स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. पूर आलेल्या भागात डोळे येण्याची साथ सुरू झाली आहे. याबाबत आरोग्य यंत्रणांनी डोळ्यांची काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे.

## महावितरणचे अथक प्रयत्न

पूरग्रस्त भागातील वीजपुरवठा सुरळीत सुरू करण्यासाठी महावितरणने अथक प्रयत्न केले. वीज खांबासह वाहून गेलेली भेंडवळ गावठाण वीज वाहिनी ४८ तासांत पुन्हा उभी करून आठ गावांचा वीजपुरवठा पूर्ववत केला.

**– गजानन कोटुरवार,**
जिल्हा माहिती अधिकारी, बुलडाणा

# नांदेड

## बचाव पथकाचे काम कौतुकास्पद

२८ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीने धर्माबाद, बिलोली, देगलूर, मुखेड, नांदेड, मुदखेड, किनवट, अर्धापूर, उमरी, लोहा आदी तालुक्यांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी अनेक गावांमध्ये शिरल्याने अडकलेल्या लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यासह प्रशासनाने सर्व विभागांच्या समन्वयातून अहोरात्र मेहनत घेऊन मदत पोहोचवली. तसेच गावातील स्थानिक नागरिकांनीही प्रशासनाला मदतीचा हात दिला.

किनवट तालुक्यातील इस्लापूर येथील साईबाबा मंदिराजवळील २७ जुलै रोजी नाल्याचे पाणी पुलावरून जात असताना हर्दुके नावाचे इसम वय अंदाजे ५५ वर्ष पाण्यात अडकले होते. या इसमाचा बचाव करण्यासाठी महसूल विभागाचे तलाठी बालाजी वसमतकर हे स्वतः पाण्यात उतरून या इसमाला धोक्याच्या पातळीबाहेर सुखरूप बाहेर काढले. मुदखेड तालुक्यातील नागेली गावामध्ये मातंग वाडा येथील घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे २५ व्यक्तींना सुरक्षित जागी (समाज मंदिर) हलवण्यात आले आहे. मुदखेड तालुक्यातील शेंबोली गावामध्ये शेंबोली फाट्यावरील घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे ३० व्यक्तींना सुरक्षित जागी (प्राथमिक आरोग्य केंद्र शेंबोली) हलवण्यात आले असून इतर कुटुंबांसाठी जिल्हा परिषदमध्ये व्यवस्था करण्यात आली आहे.

पालकमंत्री गिरीश महाजन यांनी अधिवेशन काळात तातडीने धाव घेऊन जिल्ह्यातील पूरग्रस्त भागांना भेटी दिल्या. अनेक गावांमध्ये त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. या संकटकाळात शेतकरी व ग्रामस्थांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास त्यांनी नागरिकांना दिला.

**– विनोद रापतवार,**
जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड



## कोल्हापूर

### पूरपरिस्थिती नियंत्रणात

हवामान विभागाने जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कोल्हापूर जिल्ह्याला ऑरेंज व रेड अर्लट दिला होता. पंचगंगा नदीने ३९ फूट ही इशारा पातळी ओलांडल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे सावट पसरले. या परिस्थितीत जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर; तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनाने चोख नियोजन केल्यामुळे पूरसदृश परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात प्रशासनाला यश आले.

जुलै महिन्यातील मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील धरणे ७० टक्क्यांहून अधिक भरल्याने पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली.

### पालकमंत्र्यांनी दिला धीर

कोल्हापूर जिल्ह्यात पूरसदृश परिस्थितीमध्ये जीवितहानी होऊ नये, यासाठी पालकमंत्री दीपक केसरकर यांनी तत्काळ संभाव्य पूरसदृश शिवाजी पूल परिसर, आंबेवाडी, प्रयाग चिखली, पट्टणकोडोली, कुरुंदवाड, इचलकरंजी, शिरोळ आदी ठिकाणांना भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधला. नागरिकांना सुरक्षितस्थळी पोहोचण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. प्रशासनाच्या सूचनांचे तत्काळ पालन करून प्रशासनाला सहकार्य केले.

धरणातील उपलब्ध पाणीसाठा, दैनंदिन पर्जन्यमान, पूरबाधित नागरिक व जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर, बचाव व मदतकार्य याबाबत जिल्हा, तालुका आणि गावपातळीवर प्रत्येक विभागाने चोख नियोजन केले. त्याचबरोबर पुलावर व रस्त्यावर पुराचे पाणी आलेल्या ठिकाणी दोन्ही बाजूला पोलीस विभाग व अन्य विभागांनी बॅरिकेटस् व सूचनांचे बॅनर लावल्यामुळे पुराच्या पाण्यात गाडी नेल्यामुळे होणाऱ्या दुर्घटना टाळता आल्या. तसेच पुराच्या पाण्यामुळे खंडित झालेला विद्युत पुरवठा तत्काळ सुरळीत करणे, झाडे व खांब पडल्यामुळे झालेली वाहतूक कोंडी दूर करून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याबरोबरच नागरिकांपर्यंत वेळेत आरोग्य सेवा सुविधा पोहोचवण्यात आल्या.



### के.डी.आर.एफ. पथकाने वाचवला प्राण

वारणा नदीला आलेल्या पुरात पन्हाळा तालुक्यातील मांगले-काखे पुलाजवळ बजरंग पांडुरंग खामकर हे मुसळधार पावसात रात्रभर तब्बल १२ तासांहून अधिक काळ झाडावर अडकले होते. जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाला ही माहिती मिळताच तत्काळ कोल्हापूर डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स (के.डी.आर.एफ.) हे पथक तत्काळ पोहोचून बजरंग खामकर यांना या पथकाने सुखरूप बाहेर काढत त्यांचा जीव वाचवला.

जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापन पथकाने आजवरची आपत्कालीन परिस्थिती प्रभावीपणे हाताळल्यामुळेच इंग्लंडच्या टीसाईड विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात येथील आपत्ती व्यवस्थापन पद्धतीचा समावेश करण्यात आला असून आता हे धडे परदेशात शिकवले जाणार आहेत.

### घाटातील वाहतूक सुरळीत

देवगड-निपाणी-कलादगी या राज्य मार्गावर फोंडाघाटात झाड पडल्यामुळे वाहतूक कोंडी झाली होती. अशावेळी सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस विभागासह वन व संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांनी मुसळधार पावसातही कार्यतत्परता दाखवत घाट मार्गातील वाहतूक सुरळीत केली.

### देशातील पहिले आपत्ती निवारण पथक

मार्च २०१९ मध्ये २ हजार आपदा मित्रांची फौज तयार करण्यात आली आहे. यामध्ये तब्बल ५०० आपदा सखींचा समावेश आहे. आपत्ती निवारण कामात मोठ्या प्रमाणात युवतींचा सहभाग असणारे हे देशातील पहिले पथक आहे.

### मदत व बचावकार्य

पूरबाधित नागरिक व जनावरांचे स्थलांतर, निवाऱ्याची, जेवणाची व्यवस्था, जनावरांसाठी चारा, वैद्यकीय सुविधा व औषधोपचार, निवारागृहांमध्ये राहणाऱ्या पूरबाधितांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

### २४ तास आपत्कालीन कक्ष

या कक्षामार्फत जिल्हा व तालुका स्तरावर २४ तास 'आपत्कालीन नियंत्रण कक्ष' व टोल फ्री क्रमांक १०७७ सुरू ठेवण्यात आला आहे. जिल्ह्यातील ६००हून अधिक ठिकाणी सार्वजनिक सूचना यंत्रणा (पब्लिक ड्रेस सिस्टिम) बसवली आहे.

### साथरोग नियंत्रणासाठी नियोजन

साथरोग नियंत्रणासाठी सामान्य, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रांमार्फत सर्व गावातील लोकांना आरोग्य सुविधा तयार ठेवण्यात आल्या. तत्काळ आरोग्य सेवा पुरवण्यासाठी रुग्णवाहिका (१०८ क्रमांक) आरोग्य विभागाने सज्ज ठेवल्या.

संभाव्य पूरपरिस्थितीसाठी कोल्हापूर जिल्हा प्रशासनाच्या सूक्ष्म नियोजनामुळे आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यामध्ये जिल्हा प्रशासन यशस्वी ठरले.

**– वृषाली पाटील,**
माहिती अधिकारी, कोल्हापूर

**राज्यात वातावरण बदलामुळे अचानक वादळे, पूर, गारपीट, भूस्खलन, जमिनीला मोठ्या भेगा पडणे, डोंगर खचणे, दरडी कोसळणे, अवर्षण यांसारख्या घटना घडत आहेत. अचानक आलेल्या पावसामुळे जीवित व वित्तहानी तसेच शेतीचेही मोठे नुकसान होत असते. नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना तत्काळ मदत करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे. बाधित झालेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून तातडीने मदत पोहोचवण्यात येत आहे.**

# मदतीसाठी सदैव तत्पर...

**संध्या गरवारे-खंडारे**

राज्य आपत्ती प्रतिसाद निधी एसडीआरएफसाठी केंद्र सरकारने निकष आणि दरांमध्ये सुधारणा केल्या असून, त्या सुधारणा स्वीकृत करण्याचा निर्णय नुकत्याच झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या सुधारणा २०२५-२६ पर्यंत असतील. तसेच या निर्णयांची अंमलबजावणी १ नोव्हेंबर २०२२ पासून होणार आहे.

## पूरग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत

नैसर्गिक आपत्तीमधील शेतीपिकांच्या नुकसानीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दुप्पट दराने मंत्रिमंडळाने मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. लातूर, उस्मानाबाद व बीड या तीन जिल्ह्यांमध्ये शंखी गोगलगायीमुळे शेतीपिकांच्या नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांनादेखील मदत करण्यात आली असून. अलीकडेच सततचा पाऊस हीदेखील मोठ्या प्रमाणात समस्या बनली असून, त्यासाठी देखील मदत देण्यात आली आहे. शासनाच्या वरील धोरणानुसार या आपत्तीमध्ये शेतीपिकांच्या व इतर मालमत्तेच्या झालेल्या नुकसानीकरिता बाधित झालेल्या नागरिकांना मदतीचे वाटप करण्यासाठी राज्य शासनाने आतापर्यंत एकूण ८ हजार ६७७ कोटी रुपये एवढा निधी वितरित केला आहे.

अतिवृष्टीमुळे आलेला पूर, जमिनीचे भूस्खलन किंवा जमिनीला मोठमोठ्या भेगा पडणे, डोंगर खचणे किंवा दरडी कोसळणे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे एखाद्या बाधित गावाचे, वाडीचे, तांड्याचे आणि अशाप्रकारच्या बाधितांचे स्थलांतरण करून पुनर्वसन करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयान्वये पुनर्वसनासाठी त्या ग्रामीण भागातील पात्र लाभधारकांच्या पुनर्वसनाकरिताचे निकष, पुनर्वसित गावठाणामध्ये उपलब्ध करून द्यावयाच्या नागरी सुविधा व त्यांची अंमलबजावणी करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

## अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी भरीव मदत

मार्च ते एप्रिल या कालावधीत राज्यामध्ये गारपीट आणि अवकाळी पाऊस झाला. यामध्ये कडधान्य, फळपिके, भाजीपाला, गहू, हरभरा, कांदा, द्राक्ष, स्ट्रॉबेरी, संत्रा, मका इत्यादी पिकांचे मोठ्या प्रमाणात





**विविध नैसर्गिक आपत्तींवर मात करण्यासाठी जिल्हास्तरावर; तसेच राज्यस्तरावर २४ तास नियंत्रण कक्ष सुरू केले आहेत. पुरामुळे बाधित गावांना सतर्कतेचा इशारा स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांतर्फे देण्यात आला आहे. पूरपरिस्थितीबाबत बचावकार्य करण्यासाठी म्हणून प्रशासनातर्फे एनडीआरएफ व एसडीआरएफच्या टीम यांना आपत्कालीन परिस्थितीकरिता पूर्व तैनात करण्यात आले आहे. धरणातून सोडणाऱ्या विर्सगाचे नियंत्रण केले जात असून अतिववृष्टी, पूर व धरणातून होणाऱ्या पाण्याचा विसर्ग यामध्ये प्रभावी संनियंत्रण व विभागामध्ये सुयोग्य समन्वय ठेवून जीवित व वित्तहानी होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे. होणाऱ्या नुकसानीचे सर्वे क्षणदेखील करण्यात येत आहे.**

**– अनिल पाटील,**
**मदत व पुनर्वसन मंत्री**

नुकसान झाले. अमरावती, नाशिक, पुणे, नागपूर, कोकण, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) या जिल्ह्यांतील ६ लाख ७ हजार ४७६ शेतकऱ्यांना ५१३ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

### सततचा पाऊस आता नैसर्गिक आपत्ती

सततचा पाऊसही राज्य शासनामार्फत नैसर्गिक आपत्ती घोषित करून शेतीपिकांच्या नुकसानीकरिता मदत देण्यात यावी, असा निर्णय ५ एप्रिल २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार आता शेतकऱ्यांना मदत देण्यात येत आहे.

अतिवृष्टी ही राज्य शासनाने घोषित केलेली आपत्ती असून महसूल मंडळामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या स्वयंचलित हवामान केंद्रामध्ये २४ तासात ६५ मि.मी. पेक्षा जास्त पाऊस झाल्यास मंडळातील सर्व गावांमध्ये शेतीपिकांच्या नुकसानीचे पंचनामे केले जातात. शेतीपिकांचे नुकसान ३३ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास जेवढ्या क्षेत्राचे नुकसान झाले आहे, तेवढ्या क्षेत्राकरिता विहित दराने निविष्ठा अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना मदत देण्यात येते. मात्र महसुली मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद नसतानाही मंडळातील गावांमध्ये अतिवृष्टी होऊ शकते आणि त्यामुळे शेतीपिकांचे नुकसान होऊ शकते. तसेच काही गावांमध्ये सलग काही दिवस सतत पाऊस पडत असल्यामुळेदेखील शेतीपिकांचे नुकसान होऊ शकते. अशा प्रकरणी शेतकऱ्यांना मदत देणे आवश्यक आहे.

१५ जूलै ते १५ ऑक्टोबर या कालावधीत महसूल मंडळामध्ये सलग पाच दिवसांच्या कालावधीत प्रत्येक दिवशी किमान १० मि.मी पाऊस झाल्यास; आणि त्याच महसूल मंडळात या कालावधीत मागील १० वर्षांच्या (दुष्काळी वर्ष वगळून) सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत ५० टक्के (दीडपट) किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस झाल्यास, सततच्या पावसाचा पहिला ट्रिगर लागू राहील. अशा महसूल मंडळामध्ये पहिला ट्रिगर लागू झाल्याच्या दिनांकापासून १५व्या दिवसापर्यंत सामान्यकृत वनस्पती निर्देशांक (एनडीव्हीआय) निकष पुढीलप्रमाणे तपासण्यात येतील. १५ जुलै ते १५ ऑक्टोबर या कालावधीत खरीप पिकांचे 'सामान्यकृत वनस्पती निर्देशांक फरक (एनडीव्हीआय)' जर ०.५ किंवा त्यापेक्षा कमी आल्यास, सततच्या पावसाचा दुसरा ट्रिगर लागू राहील. तथापि, ज्या तारखेला सतत पावसाची सुरुवात झाली त्या दिवसाचा एनडीव्हीआय हा १५ व्या दिवसाच्या एनडीव्हीआयपेक्षा जास्तच असायला पाहिजे.

सततच्या पावसाचा दुसरा ट्रिगर लागू झालेल्या महसूल मंडळातील बाधित क्षेत्राचे सर्वेक्षण करून पंचनामा करण्यात येईल आणि ३३ टक्क्यांपेक्षा जास्त शेतीपिकांचे नुकसान झाले असल्यास मदत देण्यात येईल. त्याचप्रमाणे जून ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीतील सततच्या पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी मदत देण्याबाबत शासनास प्राप्त झालेल्या सर्व प्रलंबित प्रस्तावांकरिता वरील निकष वापरून पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सुधारित दराने मदत देण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे. यापुढे राज्य शासनामार्फत घोषित करण्यात आलेल्या अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीकरितादेखील २४ तासांमध्ये ६५ मि.मी.पेक्षा जास्त पाऊस हा निकष कायम ठेवून याबरोबरच सततच्या पावसाकरिता निश्चित करण्यात येणाऱ्या दुसऱ्या ट्रिगरमधील सामान्यकृत वनस्पती निर्देशांक (एनडीव्हीआय) हा अतिरिक्त निकष शेती पिकांच्या नुकसानीकरिता लागू करण्यात येणार आहे. दुष्काळाव्यतिरिक्त इतर सर्व नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठीदेखील हा निकष लागू राहील.

### नुकसानाची थेट मदत

राज्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानाची मदत पारदर्शी पद्धतीने व योग्य शेतकऱ्यांना तत्काळ मिळावी, याकरिता निधी संगणकीय प्रणालीमधून आधार क्रमांकाद्वारे ओळख पटवून त्यांच्या बँक खात्यात थेट वितरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

राज्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची मदत पारदर्शी पद्धतीने शेतकऱ्यांना मिळावी, याकरिता निधी संगणकीय प्रणालीमधून आधार क्रमांकाद्वारे ओळख पटवून त्यांच्या बँक खात्यात थेट वितरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

### उष्णतेच्या लाटेसंदर्भात राष्ट्रीय कार्यशाळा

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व

### आपदा मित्र



आपत्तीला प्रतिसाद देण्यासाठी स्थानिक लोकांची क्षमता आणि आपत्ती प्रतिसादाबाबत जागृती निर्माण करणे, हा आपदा मित्र कार्यक्रमाचा उद्देश आहे. स्थानिक लोकांना प्रशिक्षित करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्यातर्फे आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात आला आहे. राज्यातील २० पूरप्रवण जिल्ह्यांमध्ये ७,९०० व्यक्तींना विविध आपत्तीला प्रतिसाद देण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यांना आपत्तीदरम्यान प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक असलेले साहित्य पुरवण्यात आले आहे. या योजनेकरिता राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी महाराष्ट्र राज्याकरिता एकूण २७.३० कोटी एवढा निधी वितरित केला आहे. या योजनेंतर्गत प्रशिक्षित सर्व आपदा मित्रांना १०,००० एवढ्या किमतीचे आपत्कालीन प्रतिसादकर्ता संच वितरित करण्यात आले आहेत. या योजनेत समाविष्ट आपदा मित्रांचा राज्य शासनातर्फे न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी यांच्यातर्फे ३ वर्षांकरिता ५ लाखांचा विमा काढण्यात आला आहे. या व्यतिरिक्त या योजनेत समाविष्ट सर्व २० जिल्ह्यांना २० लाख रुपये एवढ्या किमतीचे आपत्कालीन अत्यावश्यक साधनांचा राखीव संच वितरित करण्यात येणार आहे.

आय.आय.टी., मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने आय.आय.टी., मुंबई येथे उष्णतेच्या लाटेसंदर्भात राष्ट्रीय कार्यशाळेचे १३ व १४ फेब्रुवारी २०२३ रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत उपस्थित राज्यांनी उष्णतेच्या लाटेसंदर्भात करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली. तसेच विविध प्राधिकरणातील सदस्यांनी कळवलेल्या उपाययोजना आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशपातळीवर राबवण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांबद्दल मार्गदर्शन केले. त्यांचा अनुभव लक्षात घेऊन, राज्याने सविस्तर कृतिआराखडा तयार केला.

## उष्णता लाट कृतिआराखडा

राज्यातील १५ जिल्हे हे उष्णताप्रवण जिल्हे असून उन्हाळी हंगामात तीव्र लाटेमुळे जीवसृष्टीवर विपरित परिणाम होऊ नये, यासाठी विशेषतः मानवी जीवनावर होणारा दुष्परिणाम विचारात घेऊन त्यासंबंधी निगडित असणाऱ्या जिल्हास्तरावरील यंत्रणा, राज्यस्तरावरील यंत्रणा यांच्यामध्ये सुयोग्य समन्वय ठेवून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे हा प्रमुख उद्देश असून, यामध्ये आरोग्य विभागाकडे असलेला याविषयीचा पुरेसा औषधसाठा, स्थानिक बाजार, बसस्थानक, वाहनतळे, रेल्वे स्थानक, बाजार समित्या, आठवडी बाजार, उन्हामध्ये ग्रामीण व नागरी भागामध्ये काम करणारे कारागीर, कामगार, वयोवृद्ध नागरिक, लहान मुले, गर्भवती महिला, इतर आजाराने ग्रस्त यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ नये. तसेच दुभती जनावरे, वन्यप्राणी, उन्हाळी पिके यांचेही संरक्षण व्हावे हा प्रमुख उद्देश आहे. सरकारी व गैरसरकारी यंत्रणा यामध्ये समन्वये साधणे व उष्मलाटप्रवण क्षेत्रातील नागरिकांमध्ये जनजागृती करणे, यावर भर देण्यात आला आहे. वरील बाबींचा विचार करून कृतिआराखडा तयार केला.

## सचेत प्रणाली

महाराष्ट्र राज्य हे आपत्तीप्रवण राज्य असून राज्यात विविध आपत्तींचा सामना करावा लागतो. केंद्र शासनाने घोषित केलेल्या १२ आपत्ती व राज्याने घोषित केलेल्या ५ आपत्ती अशा एकूण १७ आपत्तींना प्रतिसाद द्यावा लागतो. आपत्ती बाबत पूर्वसूचना संबंधित नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध साधनांचा उपयोग केला जातो. त्यापैकी सचेत ही प्रणाली जागतिक स्तरावर स्वीकृत कॉमन अलर्टिंग प्रोटोकॉल मानकांवर आधारित असून याची संकल्पना एनडीएमएद्वारे प्रत्यक्षात आणली गेली तसेच ही योजना पूर्णतः एनडीएमए पुरस्कृत आहे. ही प्रणाली गृह मंत्रालय; तसेच सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेश यांना त्यांच्या नागरिकांना स्थानिक भाषांमध्ये स्थान आधारित आपत्ती सतर्कतेचा संदेश प्रसारित करणे, लोकांना वेळेवर पूर्वसूचना देणे व त्या माध्यमातून जोखीम कमी करण्याची सुविधा प्रदान करते. यामुळे जीवित व वित्त हानी कमी होण्यास मदत होते. ही प्रणाली आयएमडी, सीडब्ल्यूसी, आयएनसीओआयएस, डीजीआरई, आयसीएआर, आयसीएमआर यांसारख्या अलर्ट जनरेटिंग एजन्सींना राष्ट्रीय स्तरावरील समान व्यासपीठावर एकत्रित करते. याद्वारे जास्तीत जास्त नागरिकांना कमीत कमी कालावधीत आपत्तीबाबत मेसेजद्वारे पूर्वसूचना देणे शक्य झाले आहे. याचा वापर सामान्य व्यक्ती; तसेच मच्छीमार यांना सूचना देण्यासाठी होऊ शकतो. प्राथमिक स्तरावरील पारंपरिक मोबाइल नेटवर्कचा उपयोग करून या प्रणालीचा वापर करता येतो, हा या प्रणालीचा सर्वात मोठा फायदा आहे. या प्रकल्पासाठी (प्रणाली देखभाल खर्च) पुढील १० वर्षांकरिता येणारा खर्च हा एनडीएमएद्वारे केला जाणार असल्याने राज्य व केंद्रशासित प्रदेशांवर याचा आर्थिक भर पडणार नाही. या प्रणालीचा वापर करून आतापर्यंत सुमारे १० कोटी नागरिकांना सर्तकतेचा इशारा देण्यासाठी मेसेज पाठवण्यात आले. तसेच, या वर्षी अवकाळी पाऊस, वीज व गारपीट यासाठी सर्तकतेचा इशारा देण्यासाठी ३.९१ कोटी मेसेज पाठवण्यात आले आहेत.

## समाजमाध्यमांचा प्रभावी वापर

आपत्ती व्यवस्थापन प्रभागातर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध योजना; तसेच उपक्रमांची माहिती तसेच विविध आपत्तीसंदर्भात नागरिकांना सर्तक राहण्याबाबतच्या पूर्वसूचना देण्याबाबत प्रभावी माध्यम म्हणून सोशल मीडियाचा वापर आपत्ती व्यवस्थापन प्रभागातर्फे करण्यात येत आहे. या माध्यमांमध्ये आपत्ती व्यवस्थापन प्रभागाचे स्व:ताचे फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप आणि कु ॲप (सोशल मीडिया अकाऊंट - SDMAMaharashtra) यासारख्या माध्यमांचा वापर करून नागरिकांना सर्तक करण्यात येते. तसेच विविध आपत्तींना प्रतिसाद देताना घ्यावयाची काळजी; तसेच आपत्तीबाबत माहिती देऊन जनजागृती करण्याबाबत या माध्यमांचा उपयोग केला जात आहे.

## शालेय सुरक्षा कार्यक्रम

आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग व संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यूएनडीपी) यांनी शालेय शिक्षण विभागासोबत राज्यात शालेय सुरक्षा कार्यक्रम राबवला आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्यांमधील एका शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण देऊन मास्टर ट्रेनर



बनवून तयार केले आहे. या मास्टर ट्रेनर्सना शालेय सुरक्षा, शालेय आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे, स्थानिक भागातील आपत्तीबाबत प्रशिक्षण देण्यात आले. या व्यतिरिक्त या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये एका शाळेसाठी शालेय आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना रंगीततालीम देऊन आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत स्कूल सेफ्टी मॅन्युअल तयार करण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभागाच्या सरल या संकेतस्थळावर सर्व शाळांचे आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करून अपलोड करण्याकरिता वेब पेजची निर्मिती करण्यात आली आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**भारताची आर्थिक राजधानी, चित्रपट तसेच उद्योगसृष्टीचे माहेरघर, रोजगार आणि सृजनशीलतेला वाव देणारी नगरी, लाखो भारतीयांच्या अपेक्षापूर्तीचे आशास्थान अशा अनेक उपाधींनी मुंबई महानगर ओळखले जाते. वाहतूक, आरोग्य तसेच अन्य अनेक पायाभूत सुविधांची पूर्तता करत येथे वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने मुंबई महानगर कायमच वैशिष्ट्यपूर्ण राहिले आहे. मात्र, अनपेक्षित नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींचा सामना करत खंबीरपणे वाटचाल करत राहणाऱ्या मुंबईत नागरी सेवा-सुविधा पुरवण्याचे पालकत्व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे आहे. तसेच या महानगरावर येणाऱ्या आपत्तींमध्ये उपाययोजना करण्याची अत्यंत मोठी जबाबदारीदेखील मुख्य समन्वय यंत्रणा (नोडल एजन्सी) म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका सांभाळत आहे.**

# सुरक्षिततेसाठी कटिबद्ध

**डॉ. आय. एस. चहल**

सात बेटांपासून निर्माण झालेल्या मुंबई महानगराची भौगालिक रचना अत्यंत क्लिष्ट आहे. हे महानगर दोन बाजूंनी अरबी समुद्राने, तर एका बाजूने खाडीने वेढलेले आहे. अशा परिस्थितीत मुसळधार पाऊस आणि त्याचवेळी समुद्राला भरती असली तर आव्हानात्मक पूरस्थिती निर्माण होते. त्यामुळे अशा भागांमध्ये पुराचे पाणी साचल्याने जनजीवनावर विपरित परिणाम होतो. त्यामुळे येथील भौगोलिकता विचारात घेऊनच उपाययोजना कराव्या लागतात. अशा उपाययोजनांसाठी उत्तम संसाधने आणि नियोजनासह बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यरत राहते. मुंबईने आजवर अनेकदा अतिवृष्टी, पूरस्थिती, भूस्खलन, दरडी कोसळणे, इमारती कोसळणे, आगीच्या घटना आणि इतरही संकटांचा सामना केला आहे.

सन २००५ मध्ये मुंबई महानगरामध्ये प्रलयकारी पावसाने धुमाकूळ घातला. या अनपेक्षित अस्मानी संकटाने मुंबई अक्षरशः जागीच थांबली. मात्र, अशाही आपत्कालीन परिस्थितीशी लढा देण्यासाठी उपलब्ध असेल त्या सर्व संसाधनांसह बृहन्मुंबई महानगरपालिकेने अथक प्रयत्न करत अवघ्या ४८ तासांमध्ये मुंबईतील जनजीवन पूर्वपदावर आणण्यात मोलाची भूमिका बजावली. यासह अशा अनेक संकटांवेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.



## आपत्तीच्या पार्श्वभूमीवरील सज्जता

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये सुमारे १ लाख कर्मचारी कार्यरत आहेत. आपत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने महानगरपालिकेतील सर्व विभाग आणि कर्मचारी त्यांच्या धोरणांनुसार कार्यरत असतात. पावसाळ्यामध्ये हिवताप (मलेरिया), डेंग्यू, लेप्टोसारखे आजार बळावतात. पावसाळाजन्य आजारांमध्ये वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता, सार्वजनिक आरोग्य विभाग पूर्वतयारीसह सज्ज असतो. मुंबईतील अधिक जोखमीच्या ठिकाणी सर्वेक्षण करणे, नमुने घेणे आणि त्यासाठी आवश्यक उपाय करणे इत्यादी कार्यवाही या विभागाकडून केली जाते. महानगरपालिकेकडून मुंबईतील विविध लहान, मोठे नाले तसेच नद्या मिळून सुमारे ९ लाख मेट्रिक टन इतका गाळ काढला जातो. इतरही अनेक महत्त्वपूर्ण कामे महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या वतीने पार पाडली जातात. ही सर्व कामे म्हणजे संभाव्य आपत्तीच्या पार्श्वभूमीवरील सज्जताच असते. यासोबतच तटरक्षक दल, लष्कर, नौदल अशा तब्बल १०८ यंत्रणा एकत्रितपणे मुंबईला सुरक्षित ठेवण्यासाठी आपसात समन्वय राखून काम करत असतात.

गत काही वर्षांपासून कमी वेळात खूप मोठ्या प्रमाणात पाऊस पडण्याचे प्रसंग वाढले आहेत. मात्र, बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेल्या उपाययोजनांमुळे आता पाणी साचण्याचा कालावधी कमी झाला आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत सुरू असायला हवी, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका सज्ज असते. रेल्वे, बसेस, रस्ते वाहतूक बंद होऊ नये, यासाठी सखल ठिकाणी पाणी उपसा करण्यासाठी पंप लावले आहेत. पाणी साचण्याची शक्यता असलेल्या अतिसखल भागांमध्ये जसे की, हिंदमाता, मिलन भुयारी मार्ग आदी भागांसाठी कोट्यवधी लीटर पाणी साठवून ठेवण्याची क्षमता असलेल्या भूमिगत टाक्या बांधल्या आहेत. अतिमुसळधार पाऊस पडला आणि त्याचवेळी समुद्राला भरती असल्यास अशावेळी सखल भागांमध्ये साचलेले पाणी या भूमिगत टाक्यांमध्ये साठवून नंतर

## आपत्कालीन व्यवस्थापन विभाग

संदेशवहन आणि समन्वयासोबत आपत्कालीन परिस्थितीत करावयाचे प्रतिबंध, सज्जता, उपशमन याबाबत जागरूक असणे फार महत्त्वाचे असते. आपत्ती व्यवस्थापन हे शास्त्र असून शास्त्रोक्त पद्धतीने आपत्कालीन व्यवस्थापन करणे फार महत्त्वाचे असते. याच धर्तीवर कोणत्याही संकटांवर शास्त्रोक्त पद्धतीने उपाययोजना करून मात करता यावी, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रयत्न केले जातात. महानगरपालिकेतील आपत्कालीन व्यवस्थापन विभाग हा सर्व अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज आहे. आपत्तीच्या वेळी सर्व यंत्रणांशी येथूनच समन्वय साधून कार्य केले जाते. आपत्तीच्या काळात नागरिकांपर्यंत कसे पोहोचावे आणि त्यांचे संरक्षण कसे करावे, यासाठी याच विभागातून धोरण निश्चिती होते. हा विभाग ३६५ दिवस २४ तास कार्यरत असतो. अर्थातच वर्षभर आपत्ती किंवा संकटे येत नसतात. त्यामुळे अशा शांततेच्या काळात (पिस टाईम) विविध संभाव्य आपत्तींसाठी सज्ज राहण्याच्या दृष्टीने अभ्यास केला जातो. साधारणपणे मुंबईत ताशी १०० कि.मी वेगाने चक्रिवादळ आल्यास कोणत्या भागाला त्याचा सर्वाधिक फटका बसेल, तेथील भौगोलिक रचना काय, त्यावर कोणत्या उपाययोजना करता येतील, त्यासाठी आवश्यक संसाधनांची निश्चिती कशी करता येईल आदी बाबींचा अशाप्रकारच्या अभ्यासात समावेश असतो. यालाच आपत्ती व्यवस्थापनाच्या भाषेत सज्जता म्हटले जाते.

ओहोटीच्या वेळी समुद्रात सोडले जाते. यासोबत, सहा मोठ्या उदंचन केंद्रांच्या (पंपिंग स्टेशन) माध्यमातून सखल भागातील साचलेल्या पाण्याचा त्वरित निचरा केला जातो. फ्लड गेट्स, मायक्रो टनेलिंग अशा अनेक बाबींवर २००५ नंतर मोठ्या प्रमाणात काम झाले आहे.

## नागरिकांना नि:शुल्क प्रशिक्षण

मुंबई महानगरामध्ये मोडकळीस आलेल्या तसेच जुन्या इमारतींची संख्या मोठी आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ कलम ३५३(बी) नुसार ३० वर्षांपेक्षा जुन्या इमारतींचे संरचना परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करावे लागते. या परीक्षणानुसार सी-१ (पूर्ण इमारत पाडणे), सी-२ (ए) (इमारतीचा काही भाग पाडणे), सी-२ (बी) (दुरुस्ती करणे) अशी क्रमवारी निश्चित करावी लागते. त्यानुसार महानगरातील इमारतींची विभागणी केलेली असते. अशा इमारतीधारकांना दरवर्षी पावसाळ्यापूर्वी सूचित केले जाते. अतिधोकादायक श्रेणीतील इमारती तत्काळ रिकाम्या करून घेतल्या जातात. दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या भागांमध्ये संरक्षण भिंती बांधल्या आहेत. तरीसुद्धा काही ठिकाणी जोखमीची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत नागरिकांनी राहू नये किंवा त्वरित महानगरपालिकेला सूचित करावे, यासाठी जनजागृती केली जाते. धोकादायक ठिकाणी राहणाऱ्या लोकांना महानगरपालिकेच्या वतीने मागील तीन वर्षांपासून नि:शुल्क प्रशिक्षण दिले जात आहे. ज्यामध्ये आपत्तीच्या वेळी काय करावे, मदत कशी करावी, आदी बाबींचा समावेश आहे. मुंबईत सुमारे ३० लाख झाडे आहेत. या झाडांच्या फांद्यांची पावसाळ्यापूर्वी छाटणी केली जाते.

## माहिती तंत्रज्ञानाचा वापर

मुंबईला सुमारे १४० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा आहे. समुद्रकिनारी पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांची सुरक्षितता अबाधित राहावी, यासाठी सहा ठिकाणी मिळून १०४ जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. नागरिकांनी देखील प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सुरक्षित, सतर्कतेने पर्यटन करणे गरजेचे असते.

मुंबई संनियंत्रण प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करून दिलेल्या पाच हजारांहून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी महानगरपालिका मुख्यालयातील आपत्कालीन नियंत्रण कक्षात 'व्हिडीओ वॉल' सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे अनेक आपत्तींशी लढा देणे सोयीचे जाते.



महानगरपालिकेने आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा आधार घेण्यास सुरुवात केली आहे. यातून माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रतिबंध, उपशमन आणि सज्जतेसाठी आधारभूत माहिती (डेटाबेस) तयार करण्यात आला आहे. भौगोलिक माहिती प्रणालीवर (जीआयएस) आधारित तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला आहे. या भौगोलिक माहिती प्रणालीमध्ये आपत्ती उद्‌भवू शकणारी ठिकाणे तसेच उद्‌भवणाऱ्या आपत्तीचा सामना करण्यासाठी उपलब्ध असलेल्या यंत्रणा, साधनसामग्री, मनुष्यबळ इत्यादींची माहिती भौगोलिक माहिती प्रणालीवर उपलब्ध आहेत. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीमध्ये प्रभावी निर्णय घेणे, उपाययोजना आणि अंमलबजावणी करणे या बाबींसाठी मदत होत आहे.

२००५ मध्ये दोनच स्वयंचलित हवामान केंद्रे होती. आता ती संख्या ६० वर गेली असून आगामी काळात त्यात आणखी ६० केंद्रांची भर पडणार आहे. या केंद्रांच्या माध्यमातून पाऊस, हवामान, वादळ-वारे आदींची अद्ययावत 'रिअल टाईम' माहिती सहज उपलब्ध होते. ही माहिती डिझास्टर मॅनेजमेंट बीएमएसी मोबाइल ॲपसह www.dm.mcgm.in या संकेतस्थळावरही उपलब्ध असते.

## कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान

भूतकाळातील आपत्तींचा किंवा भविष्यातील संभाव्य आपत्ती, संकट यांचा विचार करून आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने आता कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. या माध्यमातून मुंबईतील विविध संभाव्य धोक्यांचा अभ्यास करून त्यानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे नियोजन करण्यात येईल. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगच्या माध्यमातून विविध आपत्तींचा अंदाज आधीच बांधता येऊ शकेल. या अंदाजांचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून वेळीच निर्णय घेता येतील आणि संभाव्य आपत्तींची जोखीम

कमी करता येऊ शकेल, असा प्रशासनाला विश्वास आहे. विविध आपत्तींची जोखीम कमी करणे आणि उपाययोजना, अंमलबजावणीचे व्यवस्थापन करण्यासाठी 'आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५'नुसार बृहन्मुंबई महानगरपालिका समन्वय यंत्रणेच्या (नोडल एजन्सी) रूपात भूमिका बजावते. त्यासाठी महानगरपालिका प्रशासन अत्यंत कटिबद्धतेने कार्यवाही करत आहे. निरनिराळ्या आपत्तींशी सामना करण्यासाठी सुनिश्चित कार्यपद्धतीदेखील तयार करण्यात आली आहे, त्यामुळे सर्व संबंधित यंत्रणांना त्यांचे पालन करणे सोपे ठरते. फक्त यंत्रणांपुरते मर्यादित न राहता, जनजागृती, प्रशिक्षण व लोकसहभाग या पैलूंवरदेखील महानगरपालिकेने लक्ष केंद्रित केले आहे. नागरिक, विद्यार्थी यांना वेगवेगळ्या आपत्तींमध्ये करावयाच्या प्राथमिक बाबींसाठी प्रशिक्षित करण्याचे उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. याच दृष्टिकोनातून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आपत्कालीन व्यवस्थापनाचे शहर आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्र परळ येथे उभारण्यात आले आहे. या प्रशिक्षण केंद्राच्या चार मजली इमारतीत १५० आसनक्षमता असलेले थ्रीडी थिएटर, प्रशिक्षण वर्ग, अत्याधुनिक कलादालन इत्यादी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. येथे सुमारे १ हजार आपदा मित्र आणि आपदा सखी; तसेच १ लाखांहून अधिक स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. विविध संस्था आणि बिगर शासकीय संस्थांच्या ५ हजार स्वयंसेवकांनाही येथे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना त्वरित सहकार्य मिळावे, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचा १९१६ हा क्रमांक अविरत कार्यरत आहे. येथे ३० हंटिंग लाईन्स असून नागरिकांना त्यावर संवाद साधता येतो. २४ विभाग कार्यालयात प्रत्येकी एक असे एकूण २४ विभाग नियंत्रण कक्ष (वॉर्ड कंट्रोल रुम) आहेत. कधी १९१६ क्रमांक लागला नाही तर लोक तिथेही संपर्क करू शकतात. याशिवाय, ट्विटर, इन्स्टाग्राम, फेसबुकवर नागरिक mybmc या खात्याच्या माध्यमातून प्रशासनाशी संपर्क करू



शकतात. केंद्र शासनाचे सचेत ॲप आहे. त्याद्वारे आपत्तीच्या काळात घटनेशी संबंधित ठिकाणच्या नागरिकांना सतर्क करण्यासाठी संदेश पाठवता येतो.

मुंबईतील वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या मुंबई किनारी रस्ता (कोस्टल रोड) सह अनेक पायाभूत सुविधा विकासाचे प्रकल्प सध्या मुंबईमध्ये सुरू आहेत. या प्रकल्पांमध्ये शाश्वत विकासाची संकल्पना अबाधित राहावी आणि संभाव्य धोक्यांच्या जोखीम कमी करता याव्यात, या उद्देशाने इंडियन स्टँडर्ड १८९३ (आयएस १८९३) च्या सर्व नियमांचे महानगरपालिका काटेकोरपणे पालन करते. इमारती किंवा अन्य बांधकाम करताना ते भूकंपरोधी यंत्रणांनी सुसज्ज असावे, यासाठी नियम केले आहेत. सध्या मुंबईचा विस्तार हा भूपृष्ठीय नव्हे, तर अवकाशीय दिशेने होत आहे. त्यामुळे टोलेजंग इमारतींमध्ये आगीसारख्या घटनांमध्ये प्राणहानी, वित्तहानी टाळता यावी, यासाठी अग्निप्रतिबंधक यंत्रणा अनिवार्य केली आहे. इतकेच नव्हे, तर दर सहा महिन्यांनी प्रत्येक इमारतीने अशा यंत्रणेचे अग्निसुरक्षा परीक्षण करून त्याचे प्रमाणपत्र महानगरपालिकेकडे सादर करणे बंधनकारक केले आहे. त्यासाठी सर्व इमारतींना महाराष्ट्र फायर प्रिव्हेन्शन ॲण्ड लाईफ सेव्हिंग ॲक्ट २००९चा अवलंब करणे अनिवार्य आहे.

आपत्कालीन व्यवस्थापन हा आपत्ती व्यवस्थापनाचा प्रमुख भाग असून यामध्ये बचाव, शोध आणि शून्य मृत्यू हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. पीडितांना आपत्कालीन काळात मदत करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन दलाकडून त्वरित प्रतिसाद देण्यात येतो. त्यांच्या पुनर्वसनासाठी विशेष कृतिआराखडा तयार करण्यात येतो. विविध यंत्रणांच्या जोडीने मुंबई महानगरपालिकेमार्फत आपत्तीपूर्व, आपत्ती दरम्यान आणि आपत्तीपश्चात सूक्ष्म नियोजन करून अनेक महत्त्वपूर्ण कामांचे नियोजन आणि त्यावर अंमलबजावणी केली जाते.

आपत्कालीन परिस्थितीनंतर त्याच्या परिणामांवर दु:ख करण्यापेक्षा त्यावर पूर्व नियोजित उपाययोजना करून हानी टाळता यावी, यासाठी आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने अनेकविध उपाययोजना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सातत्याने केल्या जात आहेत. आपत्कालीन परिस्थिती कितीही आव्हानात्मक असली तरीही त्यामुळे होणारी जीवित व वित्तहानी कमीतकमी होऊन 'मुंबईकरांना सुरक्षित ठेवणे' हे ब्रीद मनी बाळगून महानगरपालिका प्रशासन आपले कर्तव्य पार पाडत असते. संसाधने, यंत्रसामग्री किंवा नियोजन या जरी प्रशासनाशी निगडित बाबी असल्या, तरीसुद्धा जनजागृती, लोकसहभागातून कोणत्याही आपत्तीला सहज सामोरे जाता येऊ शकते, असा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा दृढविश्वास आहे. त्यानुरूप सुरक्षित मुंबई तसेच मुंबईकरांसाठी प्रशासन सदैव सजग, तत्पर आणि कर्तव्यदक्ष आहे.

**(लेखक हे बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबईचे आयुक्त तथा प्रशासक आहेत.)**

**शेती करताना पिकांचे विविध कारणांमुळे होणारे नुकसान काही प्रमाणात भरून काढण्यासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू केली. राज्य शासनही ही योजना राबवत आहे. पूर्वी शेतकऱ्याला २ ते ५ टक्के विमा हप्ता भरावा लागत होता. यावर्षीपासून शेतकऱ्यांना केवळ १ रुपयात पीक विमा काढता येणार आहे, तर उर्वरित ३,३०० कोटी रुपये रक्कम राज्य शासन भरणार आहे. राज्याच्या २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात यासाठी तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील १ कोटी ५२ लाख शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे.**

# एक रुपयात पीक विमा

**मनीषा सावळे**

राज्याच्या विकासामध्ये कृषी क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी राज्य शासन विविध योजना राबवत आहे. शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासोबतच, बारमाही पिकासाठी सिंचनाची सुविधा, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी शेतीला कृषिपूरक व्यवसायाची जोड देण्यासाठी शासन काम करत आहे. सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती आहे असा क्रांतिकारी निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

## 'कप अॅण्ड कॅप' मॉडेल

२०२३ च्या खरीप हंगामापासून ही योजना राबवण्यात येते. ही योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकरी यांना ऐच्छिक स्वरूपाची आहे. खातेदाराव्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्ट्याने शेती करणारे शेतकरी योजनेत सहभागी होऊ शकतात. नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत विमा संरक्षण मिळते. ही योजना राबवण्यासाठी राज्यातील जिल्ह्यांचे १२ समूह करण्यात आले आहेत. प्रधानमंत्री पीक विमा योजना ही या वर्षी 'कप अॅण्ड कॅप' मॉडेल (८०:११०) नुसार राबवण्यात येत आहे. यामध्ये एकूण जमा विमा हप्त्याच्या २० टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम विमा कंपन्यांना स्वतःकडे ठेवता येणार नाही. शेतकऱ्यांची नुकसानभरपाई दिल्यानंतर उरलेली २० टक्क्यांपेक्षा जास्तीची रक्कम विमा कंपनी राज्य शासनाला परत करेल. तसेच विमा कंपनी एका वर्षामध्ये जिल्हा समूहामध्ये एकूण जमा विमा हप्ता रकमेच्या ११० टक्क्यांपर्यंतचेच दायित्व स्वीकारणार आहे. त्यापेक्षा जास्तीचा भार राज्य शासन स्वीकारणार आहे. म्हणजे विमा कंपनी त्यांच्याकडे जमा विमा हप्त्याच्या जास्तीत जास्त ११० टक्क्यांपर्यंतच नुकसानभरपाई शेतकऱ्यांना देईल. त्यापेक्षा जास्त असणारी नुकसान भरपाईची रक्कम राज्य शासनामार्फत शेतकऱ्यांना देण्यात येईल.

## पीक विमा कशासाठी

नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण, पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित ठेवण्यासाठी, शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी तसेच कृषी क्षेत्रासाठीच्या पतपुरवठ्यात सातत्य राखून उत्पादनातील जोखमींपासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबरच अन्नसुरक्षा, पिकांचे विविधीकरण आणि कृषी क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ करण्यासाठी शासनाने यावर्षी नवीन स्वरूपात पीक विमा योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे.



## योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये

शेतकऱ्यांना केवळ १ रुपया भरून पीक विमा पोर्टलवर नोंदणी करावयाची आहे. या योजनेंतर्गत निश्चित करण्यात आलेला पीकनिहाय प्रति हेक्टरी विमा हप्ता दर व शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात भरावयाचा विमा हप्ता रक्कम १ रुपया वजा जाता उर्वरित फरक हा सर्वसाधारण विमा हप्ता अनुदान समजून राज्य शासन भरणार आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदारांच्या व्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. भाडेपट्टीने शेती करणाऱ्यास नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरार पीक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे.

या योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२३ ते रब्बी हंगाम २०२५-२६ या तीन वर्षांकरिता सर्व अधिसूचित पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के असा निश्चित करण्यात आला आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील ७ वर्षांपैकी सर्वाधिक उत्पादनाच्या ५ वर्षांचे सरासरी उत्पादन गुणीले त्या पिकाचा जोखीमस्तर विचारात घेऊन निश्चित केले जाईल. उंबरठा उत्पादन हे तीन वर्ष कालावधीकरिता निश्चित असेल. तसेच विमा कंपनीने सादर केलेला विमा हप्ता दरही तीन वर्ष कालावधीकरिता कायम असेल.

सहा प्रकारे पिकांचे नुकसान झाल्यास नुकसानभरपाई मिळते.

**१) प्रतिकूल हवामान परिस्थितीमुळे पिकांची पेरणी किंवा लावणी न झाल्यास-** हंगामातील अपुरा पाऊस, प्रतिकूल, हवामानामुळे पेरणी / लावणी होऊ न शकलेल्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण पेरणी क्षेत्राच्या ७५ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास विमा संरक्षण देय राहील.

**२) हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान -** पीक काढणीच्या १५ दिवस आधी पूर, पावसातील खंड, दुष्काळ इत्यादीमुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षित उत्पादनामध्ये मागील ७ वर्षांच्या सरासरी

## जिल्ह्यानिहाय निश्चित विमा कंपनी

- **जिल्हा समूह क्र-१ :-** अहमदनगर, नाशिक, चंद्रपूर.
  **जिल्हा समूह क्र-२ :-** सोलापूर जळगाव, सातारा.
  ओरिएंटल इन्शुरन्स कं.लि., पत्ता :- मे. फेअर टॉवर्स, पहिला मजला, पुणे-मुंबई रोड, वाकडेवाडी, पुणे- ४११००५, टोल-फ्री क्र. १८००११८४८५,
  ईमेल - pmfby.160000@orientalinsurance.co.in
- **जिल्हा समूह क्र-३ :-** परभणी, वर्धा, नागपूर
  आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कं.लि. माणिकचंद आयकॉन, तिसरा मजला, प्लॉट नं. २४६, सी विंग, बंडगार्डन, पुणे-४११००१ टोल-फ्री क्र.- १८०० १०३ ७७१२
  ईमेल - customersupportba@icicilombard.com
- **जिल्हा समूह क्र.४ :-** जालना, गोंदिया, कोल्हापूर
  युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कं.लि. १०३, पहिला मजला, आकृती स्टार, MIDC सेंट्रल रोड, अंधेरी (पुर्व), मुंबई-४०००९३, टोल-फ्री क्र. १८०० २०० ५१४२, १८०० २०० ४०३०, ईमेल - contactus@universalsompo.com
- **जिल्हा समूह क्र.५ :-** नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
  युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, क्षेत्रीय कार्यालय, २ रा मजला, काकडे बीझ, आयकॉन, ई स्क्वेअर जवळ, गणेशखिंड रोड, शिवाजीनगर, पुणे-४११०१६,
  टोल-फ्री क्र. १८०० २३३ ७४१४ ईमेल- uiicpmfby2023@uiic.co.in
- **जिल्हा समूह क्र.६ :-** छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), भंडारा, पालघर, रायगड
  चोलामंडलम एम एस जनरल इन्शुरन्स कं.लि. वेलस्ली कोर्ट, तिसरा मजला, १५-बी, डॉ. आंबेडकर रोड, BMW शोरुमच्या वर, कॅम्प, पुणे ४११००१
  टोल-फ्री क्र.-१८०० २०८ ९२०० ईमेल- customercare@cholams.murugappa.com
- **जिल्हा समूह क्र.७ :-** वाशिम, बुलडाणा, सांगली, नंदुरबार
  भारतीय कृषी विमा कंपनी, मुंबई क्षेत्रीय कार्यालय, स्टॉक एक्सचेंज टॉवर्स, २० वा मजला, दलाल स्ट्रिट, फोर्ट, मुंबई-४०००२३ टोल-फ्री क्र.- १८०० ४१९ ५००४,
  ईमेल- pikvima@aicofindia.com
- **जिल्हा समूह क्र.८ :-** हिंगोली, अकोला, धुळे, पुणे
  एचडीएफसी इर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, डी-३०१, तिसरा मजला, इस्टर्न बिझिनेस डिस्ट्रिक्ट (मैग्नेट मॉल) लाल बहादूर शास्त्री मार्ग, भांडुप(प.) मुंबई-४०००७८, टोल-फ्री क्र.- १८०० २६६ ०७००
  ईमेल- pmfby.maharashtra@hdfcergo.com
- **जिल्हा समूह क्र. ९ :-** यवतमाळ, अमरावती, गडचिरोली
  रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पाचवा मजला, विरवानी इंडस्ट्रियल इस्टेटच्या पुढे, पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगाव पूर्व, मुंबई-४०००६३,
  टोल-फ्री क्र.- १८०० १०२ ४०८८, ईमेल - rgicl.maharashtraagri@relianceada.
- **जिल्हा समूह क्र.१० :-** उस्मानाबाद
  एचडीएफसी इर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, डी-३०१, तिसरा मजला, इस्टर्न बिझिनेस डिस्ट्रिक्ट (मैग्नेट मॉल) लाल बहादूर शास्त्री मार्ग, भांडुप (प.) मुंबई-४०००७८, टोल-फ्री क्र.- १८०० २६६ ०७०० ईमेल - pmfby.maharashtra@hdfcergo.com
- **जिल्हा समूह क्र.११ :-** लातूर
  एसबीआय जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, के.डी.प्लाझा,पाहिला मजला,२८९/६-७, नेहरु रोड, सेव्हन लव हॉटेल जवळ, स्वारगेट पुणे-४११०४२, टोल-फ्री क्र.- १८०० २०९ ११११
  ईमेल- pmfby.mh@sbigeneral.in /pmfby.sbig@sbigeneral.in
- **जिल्हा समूह क्र.१२ :-** बीड
  भारतीय कृषी विमा कंपनी, मुंबई क्षेत्रीय कार्यालय, स्टॉक एक्सेचेंज टॉवर्स, २० वा मजला, दलाल स्ट्रिट, फोर्ट, मुंबई-४०००२३, टोल-फ्री क्र.- १८०० ४१९ ५००४,
  ईमेल - pikvima@aicofindia.com

उत्पादनाच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त घट झाली असेल तर विमा संरक्षण देय राहील.

३) **पीक पेरणी ते काढणीपर्यंत उत्पादनात येणारी घट -** दुष्काळ, पावसातील खंड, पूर, क्षेत्र जलमय होणे, कीड व रोगांचा व्यापक प्रादुर्भाव, भूस्खलन, नैसर्गिक आग, वीज कोसळणे, वादळ, गारपीट आणि चक्रिवादळ यांसारख्या टाळता न येणाऱ्या जोखमींमुळे पिकांच्या उत्पादनात येणाऱ्या घटीपासून व्यापक विमा संरक्षण दिले जाईल.

५) **स्थानिक नैसर्गिक आपत्ती -** गारपीट, भूस्खलन, विमा संरक्षित क्षेत्र जलमय झाल्यास, ढगफुटी अथवा वीज कोसळल्यामुळे लागणारी नैसर्गिक आग यामुळे होणारे अधिसूचित पिकाचे ठरावीक क्षेत्रातील नुकसान हे वैयक्तिक स्तरावर पंचनामे करून निश्चित करण्यात येईल.

६) **काढणीपश्चात नुकसान -** ज्या पिकांची काढणीनंतर शेतात पसरवून अथवा पेंढ्या बांधून सुकवणी करणे आवश्यक असते, अशा काढणीनंतर सुकवणीसाठी शेतात पसरवून ठेवलेल्या पिकाचे काढणीनंतर दोन आठवड्यांच्या आत (१४ दिवस) गारपीट, चक्रिवादळ, चक्रिवादळामुळे बिगरमोसमी पावसामुळे नुकसान झाल्यास नुकसानभरपाई निश्चित केली जाईल.

**योजनेत समाविष्ट पिके -** या योजनेंतर्गत अन्नधान्य पिके, गळित धान्य पिके व नगदी पिकांना विमा संरक्षण मिळेल.

**खरीप हंगाम -** भात, ज्वारी, बाजरी, नाचणी, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, कारळे, तीळ, सूर्यफूल, सोयाबीन, कापूस, कांदा. रब्बी हंगाम- गहू (बागायत), ज्वारी (बागायत, जिराईत), हरभरा, उन्हाळी भात, उन्हाळी भुईमूग, रब्बी कांदा.

**विमा क्षेत्र घटक -** राज्यात शासनाने खरीप व रब्बी हंगामासाठी अधिसूचित केलेल्या महसूल मंडळ / मंडळगट किंवा तालुकास्तरावर अधिसूचित पिकांसाठी राबवण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे -** ७/१२, आधार कार्ड, बँक पासबूक प्रत, पिकाच्या पेरणीबाबत स्वयंघोषणा पत्र, भाडेपट्टा करार असल्यास करारनामा/ सहमतीपत्र.

**योजनेचा हप्ता कुठे भरावा?** आपले सरकार सेवा केंद्र, बँक, प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था; तसेच www.pmfby.gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाइन भरता येईल.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**आदिवासी बांधव निसर्गदेवतेचे पूजक आहेत. आदिवासी बांधव डोंगराळ भागात राहतात हे सर्वश्रुत आहेच; पण तेथे राहून ते जमिनीचे संरक्षण करतात, त्यांच्या परंपरा, चालीरीती यातून ते निसर्ग जपतात. काळाच्या ओघात शहरी भागात व्यवसाय, रोजगार, शिक्षण या दृष्टीने आदिवासी बांधव स्थायिक झालेले दिसतात; परंतु आजही ते त्यांच्या संस्कृती आणि परंपरा जपून आहेत. निसर्ग, निसर्गातील झाडे, डोंगर, नद्या यांना देव मानून त्याची पूजा करून पारंपरिक सण-उत्सव त्यांनी अबाधित ठेवले आहेत.**

# आदिवासी संस्कृतीचे संवर्धन

**नयना गुंडे** (भा.प्र.से)

महाराष्ट्राचा विचार करता २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी १.०५ करोड इतकी आदिवासी लोकसंख्या आहे. ज्याचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ९.३५% इतके आहे. महाराष्ट्रात सुमारे ४५ आदिवासी जमाती आहेत. त्यापैकी भिल्ल, महादेव कोळी, माडिया, गोंड, पारधी, वारली, कोकणा, कातकरी, ठाकर, कोलाम अशा प्रमुख आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्रातील सगळ्याच जिल्ह्यात आदिवासी जमाती विखुरलेल्या आहेत. सन २०११ च्या जणगणनेनुसार, नंदुरबारमध्ये सर्वाधिक अर्थात ६९.६०% इतकी लोकसंख्या आहे. त्याखालोखाल गडचिरोली (३८.६८%), पालघर (३७.३९%), धुळे (३१.५५%) आणि नाशिक (२५.६१%) अशी आदिवासी लोकसंख्या आहे. याशिवाय इतर सर्वच जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात आदिवासी बांधव वास्तव्यास आहेत. आदिवासी बांधवांच्या शिक्षण, जीवनकौशल्य, रोजगार आणि आरोग्य यांसाठी आदिवासी विकास विभाग सतत कार्यरत असतो.

आजपासून सुमारे ३१ वर्षांपूर्वी म्हणजेच ९ ऑगस्ट १९८२ रोजी २१व्या शतकात होणारी आदिवासी बांधवांची उपेक्षा, राहणीमान, बेरोजगारी, जीवन कौशल्ये या बाबींवर चर्चा करणे; तसेच या समस्या सोडवणे, ह्या हेतूसाठी संयुक्त राष्ट्रसंघाची पहिली बैठक झाली होती. त्यानंतर २३ डिसेंबर १९९४ रोजी झालेल्या बैठकीतील ४९/२१४ ठरावान्वये आदिवासी बांधवांचे हक्क आणि त्या हक्कांचा प्रसार प्रचार करण्याच्या हेतूने दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस 'जागतिक आदिवासी दिवस' म्हणून साजरा केला जाईल, अशी घोषणा करण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघ दरवर्षी जागतिक आदिवासी दिनासाठी विविध थिम जाहीर करते. यावर्षी अर्थात २०२३ चा जागतिक आदिवासी दिन 'Indigenous Youth as agents of change for self-determination' अर्थात 'आदिवासी तरुण हेच स्वनिर्णय बदलाचे प्रतिनिधी' ही थिम जाहीर करण्यात आली आहे. यात हवामान बदल, स्वत:ला न्याय मिळवून देण्यासाठी एकत्र येणे, पिढ्यांमधील सुसंवाद हे तीन विषय यात अधोरेखित केले आहेत. वसाहतवाद आल्यापासून आदिवासी तरुणांना पर्यावरण बदल, तसेच राहणीमानातील संस्कृती आणि परंपरा बदल याला सामोरे जावे लागत आहे, याच भूमिकेतून संयुक्त राष्ट्र महासंघाकडून यावर्षी ही थीम ठरवण्यात आली आहे. संयुक्त राष्ट्रसंघ म्हणते की, आदिवासींना स्वनिर्णयाचा अधिकार आहे आणि या अधिकाराचा वापर करताना त्यांनी आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास करायला हवा.

सध्या तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे. यात आपले आदिवासी तरुणदेखील वावरत आहेत. मात्र या नव्या जगात वावरताना आदिवासी बांधवांच्या संस्कृतीचा ऱ्हास होता कामा नये. आदिवासी मुले लहानपणापासून अनेक गोष्टी त्यांच्या परिसरातून अनुकरणाने शिकत असतात. निसर्ग अनुभवणे, त्याचे निरीक्षण करणे त्यांना जमते. आजही जुन्या पिढीतील आदिवासीबांधव उन्हाळ्यात बांधलेल्या पक्ष्याच्या घरट्यांवरून पाऊस कधी येईल याचा अंदाज सांगतात. घड्याळ न बघताही सूर्याच्या स्थानावरून वेळेचा अचूक अंदाज बांधतात. कोणतेही वैद्यकीय शिक्षण न घेता आजारावर वनस्पती, कंदमुळे यांच्या साहाय्याने प्राथमिक उपचार करतात. आजच्या तरुण पिढीने ते शिकणे, निरीक्षण



करणे आणि अनुभवणे जपले पाहिजे. सध्या तंत्रज्ञान युगातल्या विविध बदलांमुळे हे मागे पडत चालले आहे, यासाठी आदिवासी तरुणांनी हवामान बदल आणि हरित संक्रमण, न्यायासाठी एकत्र येणे आणि पिढ्यांमधील संवाद यासाठी स्वयंनिर्णय घेणे महत्त्वाचे आहे. तसेच त्या निर्णयामुळे होणारे भविष्यातील बदल आधी समजून घेणे महत्त्वाचे आहे. याच उद्युक्त विचाराने संयुक्त राष्ट्रसंघ यंदा ही थिम जागतिक आदिवासी दिनासाठी राबवत आहे. याच थिमवर आधारित सप्टेंबर २०२३ मध्ये होणाऱ्या शाश्वत विकास शिखर परिषदेच्या अनुषंगाने पुढील विविध क्षेत्रात आदिवासी युवकांनी चांगल्या भविष्यासाठी पुढील क्षेत्रात स्वयंनिर्णय अधिकार वापरणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## हवामान बदल आणि हरित संक्रमण

आदिवासी तरुण त्यांच्या समुदायात अधिकार, जबाबदाऱ्या, सामाजिक स्थान यात विविध भूमिका बजावतात. अर्थात समुदाय आणि त्यांची बोलीभाषा यानुसार त्यात फरक पडतो. थोडे विस्ताराने सांगायचे झाले तर अगदी लहानपणापासून पशुपालन, शेतीची विविध कामे, घरातील कामे आपल्या कुटुंबासोबत करतात. त्यामुळे निसर्गाशी, त्यातल्या जैवविविधतेशी तसेच जमिनीशी त्यांचा जवळून संबंध येतो; परंतु सध्या होत असलेल्या सामाजिक विकासामुळे आदिवासींच्या पारंपरिक जगण्याच्या पद्धतीत बदल होत आहेत. अगदीच सांगायचे झाले तर औद्योगिकीकरण, संप्रेषण साधनांचा गैरवापर यामुळे आदिवासींच्या जीवन पद्धतीत बदल होत आहेत. आदिवासी समाज हा बऱ्यापैकी शेती आणि त्यातही पावसावर आधारित शेतीवर अवलंबून आहे. मात्र हवामान बदलामुळे झालेल्या अनियमित पाऊस, समुद्राच्या पाणी पातळीत वाढ होऊन लगतची जमीन खारफुटी अर्थात नापीक होणे, जमिनीची धूप होणे, पिकाचे उत्पन्न कमी होणे यांसारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

यासोबतच सर्वसमावेशकपणे उच्च शिक्षणाचा विचार केला तर आदिवासींच्या भाषा, त्यांची संस्कृती याचा कोठेही समावेश होत नाही. प्राथमिक स्तरावर या संदर्भाने समावेश जरी नसला तरी यासाठी अनेक संधी उपलब्ध करून दिल्या जातात. सध्या आदिवासी तरुण ही स्थिती बदलवू बघत आहेत. किंबहुना असे म्हणता येईल जागतिक स्तरावरील हवामान बदलाच्या चळवळीचे ते मुख्य घटक आहेत. भविष्यात अनेक नवे तंत्रज्ञान येईल, ज्यामुळे आदिवासीबांधव त्यांची जमीन, त्यांचे हक्क गमावतील. पर्यायाने उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे यासंदर्भात विचार करून आदिवासी तरुणांनी स्वयंनिर्णय घेणे आणि ते अमलात आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## न्याय मिळवणे

काही वर्षांपूर्वी भेदभाव आणि वर्णद्वेष यामुळे आदिवासी तरुणांना अनेक अडचणी यायच्या. अनेकदा त्यांची भाषा, संस्कृती, वडिलोपार्जित चालीरीती नाकारणे असे प्रकार घडले आहेत. मात्र आता आदिवासी



तरुण अनेक संस्था, संघटना या माध्यमातून स्वत:च्या संस्कृतीची ओळख पटवून देण्यासाठी लढत आहेत. एखाद्या ठिकाणी झालेल्या अन्यायाबद्दल एकत्रितपणे प्रतिकार करत आहेत. यासोबतच तंत्रज्ञान वापरून आदिवासी तरुण त्यांचे सण-उत्सव साजरे करणे; तसेच भाषा, परंपरा, माहिती जतन करणे; तसेच सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे काम करत आहेत. अनेक पारंपरिक बाबी जसे औषधे, खाद्यपदार्थ, गाणी ज्या आदिवासींनी जतन केल्या आहेत, तो माहितीचा खजिना लोकांसमोर आदिवासी तरुण आणत आहेत. यासोबतच त्यांचे हक्क, कर्तव्य यासोबतच त्यांच्यासमोरील शासनाच्या संधी, योजना याबाबत जागरूकता निर्माण करत आहेत. त्यामुळे आदिवासीबांधवांना समाजात एक वेगळे स्थान मिळेल आणि येणाऱ्या अडचणी कमी होतील. मात्र हे सर्वव्यापी होण्यासाठी आदिवासी तरुणांनी स्वत: निर्णय घेऊन त्याकरिता प्रयत्न करायला हवेत.

## पिढ्यांमधील संवाद

बोली भाषा, कला, संस्कृती, चालीरीती, माहिती, लोकगीते इ. या सर्व बाबी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वारसा म्हणून जातात. प्रत्येक आदिवासी जमातीत यात वैविध्य आहे. या सर्व बाबी त्या त्या आदिवासी जमातीची ओळख असते. त्यामुळे पिढ्यांमध्ये संवाद असणे महत्त्वाचे आहे. कारण पिढीमधील मोठ्या लोकांकडे आलेल्या अनुभवातून तो तो साठा तयार होत जातो. काही आदिवासी जमाती बोलत असलेल्या भाषांना लिपी नाही. त्यामुळे ते जतन करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यायला हवा. पूर्वी केवळ मौखिक साधन होते. मात्र आता अनेक साधनांद्वारे आपण माहिती जतन करून ठेवू शकतो. आपापल्या संस्कृतीची, परंपरांची पूर्ण माहिती असल्याने आदिवासी तरुण त्यांच्या संस्कृतीला पुढे नेऊ शकतात. कालांतराने त्यांच्या पुढच्या पिढीस वारसा हस्तांतरित करू शकतात. त्यामुळेच याबाबत आदिवासी तरुणांनी स्वत: निर्णय घेऊन पिढ्यामधील संवादासाठी पुढाकार घ्यायला हवा.

यंदा संयुक्त राष्ट्र संघाने केलेली थिम ही आदिवासी तरुणांसाठी समर्पित केलेली आहे. याच धर्तीवर आपणही महाराष्ट्रात यंदाचा जागतिक आदिवासी दिन ९ ऑगस्ट रोजी साजरा करणार आहोत. शेवटी एवढंच म्हणेन,

*होईल संवर्धन आदिवासी संस्कृतीचे,*
*तरुणांनी वापरावे अधिकार स्वनिर्णयाचे..*

**(लेखिका या आदिवासी विकास आयुक्तालय येथे आयुक्त पदावर कार्यरत आहेत.)**

**महाराष्ट्रातील दुर्गम व डोंगराळ भागातील आदिवासींच्या कल्याणासाठी सन १९८३ पासून स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची खात्याची निर्मिती झालेली आहे. आदिवासींचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास व्हावा, यासाठी हा विभाग सतत कार्यरत असतो. राज्य सरकारने आदिवासींसाठी विकासाची सर्वांगीण विकासाची दालने खुली करण्यात आली आहेत.**

# विकासात्मक योजना

**शैलजा पाटील**

ऑगस्ट महिन्यात जागतिक आदिवासी दिन साजरा केला जातो. मूल निवासी समजल्या जाणाऱ्या आदिवासींचे सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिकदृष्ट्या वेगळे वैशिष्ट्य आहे. आदिवासी समाजाचा बहुविध वारसा आणि संस्कृतीचे जतन करत त्यांना सक्षम करणे आणि त्यांचे हित जपण्यासाठी चालना देणे यासाठी आदिवासी समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासन विविध योजना प्रभावीपणे राबवत आहे.

## शासकीय आश्रमशाळा

अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास जलदगतीने घडवून आणण्यासाठी १९७२-७३ पासून निवासी आश्रमशाळा समूह योजना सुरू करण्यात आली आहे. ही योजना मुख्यत्वे अतिदुर्गम डोंगराळ व पाड्यातील आदिवासी मुला-मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून शैक्षणिकदृष्ट्या त्यांना सुशिक्षित करणे व त्यायोगे त्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने राबवण्यात येते. सद्य:स्थितीत आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्थ ४९९ शासकीय आश्रमशाळांमध्ये सुमारे १ लाख इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

## अनुदानित आश्रमशाळा

राज्यात आदिवासी विकास विभागांतर्गत एकूण ५५६ अनुदानित आश्रमशाळा असून, त्यापैकी ५२ प्राथमिक अनुदानित आश्रमशाळा, ३२७ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा व १७७ उच्च माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा स्वयंसेवी संस्थांमार्फत चालवल्या जातात. या आश्रमशाळांपैकी सद्य:स्थितीत ५४१ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. या शाळांमध्ये एकूण २,४१,८९४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

## शासकीय वसतिगृह

आदिवासी विद्यार्थ्यांना गाव, तालुका, जिल्हा व विभागाच्या ठिकाणी माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे, म्हणून शासकीय वसतिगृह सुरू करण्यात आली आहेत. राज्यात ४८७ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यामध्ये एकूण ४८,९३३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना मोफत भोजन, निवास व आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरवण्यात येते. सन २०१७-१८ पासून बेडींग साहित्य, वह्या, पुस्तके, शैक्षणिक साहित्य इत्यादी उपलब्ध करून घेण्याकरिता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट निधी जमा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून सन २०१८-१९ पासून महानगर, विभागीय आणि जिल्हास्तरावरील शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आहाराकरिता थेट लाभ हस्तांतर (डीबीटी)



योजनेद्वारे लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## निवासी शाळा

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित शाळेमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणे, या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली असून नामांकित शाळेमार्फत विद्यार्थ्यांना पुरवण्यात येत असलेल्या शैक्षणिक व निवासी सुविधांचा खर्च शासनामार्फत करण्यात येतो. या योजनेंतर्गत आजपर्यंत एकूण १४८ नामांकित शाळांमध्ये ४६,२२६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या योजनेंतर्गत शाळांची निवड व त्यांचा दर्जा निश्चित करून दर्जानुसार थेट शाळांना निधी वितरित करण्याची ऑनलाइन संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

## पं. दीनदयाळ उपाध्याय स्वयं योजना

शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्याबाबत पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयं योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत महानगरपालिका, विभागीय शहरे आणि जिल्हास्तरावरील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निवास भत्ता, आहार भत्ता, निर्वाह भत्ता; तसेच शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून घेण्याकरिता निर्धारित केलेले अर्थसाहाय्य देण्यात येते.

या योजनेसाठी अटी पुढीलप्रमाणे आहेत:- विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा; तसेच विद्यार्थ्याने अर्जासोबत जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या ज्या वेळी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा लागू राहील. हा विद्यार्थी १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा. विद्यार्थ्यांस आदिवासी विकास विभागाच्या सामाजिक न्याय विभागाच्या किंवा संबंधित शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहामध्ये मोफत प्रवेश मिळालेला नसावा. विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा. आदिम जमातीच्या व अनुसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ प्राधान्याने मिळेल. सन २०१७-१८ पर्यंत सदर योजनेंतर्गत महानगर, विभाग स्तर व जिल्हा स्तर या ठिकाणी कार्यरत शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत लाभ देण्यात येत होता. शासन निर्णय दिनांक २७ नोव्हेंबर २०१८ अन्वये सन २०१८-१९ पासून तालुका स्तरावरील कार्यरत शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांनादेखील योजनेचा लाभ देण्याची सुरुवात करण्यात आली आहे.

## भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना

अनुसूचित क्षेत्रात स्त्रियांच्या आहारातील उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे कुपोषण, मातामृत्यू, बालमृत्यू व कमी वजनाची बालके जन्माला येणे यांसारख्या गंभीर समस्यांबाबत कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरू करण्यात आली. गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना एक वेळ चौरस आहार देण्यात येतो. तसेच ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना पोषक आहाराचे वाटप करण्यात येते.

## शबरी आदिवासी घरकूल योजना

आदिवासी समाज हा अतिदुर्गम भागात राहतो. ते कुडा-मातीच्या घरात, झोपड्यांमध्ये किंवा तात्पुरत्या तयार केलेल्या घरात राहतात. त्यांना हक्कांची व कायमस्वरूपी पक्के घर मिळावे, यासाठी निवाऱ्याचा प्रश्न सोडवण्याला प्राधान्य दिले, शबरी घरकूल योजनेच्या माध्यमातून सर्व सुविधा व सोयीसह पक्के घरकूल देण्याला प्राधान्य दिले आहे. या योजनेत आदिवासी समाजातील दिव्यांग लाभार्थ्यांना प्राधान्य मिळावे, यासाठी या योजनेत ५ टक्के आरक्षण दिव्यांग लाभार्थ्यांसाठी ठेवण्यात आले आहे. यामध्येही दिव्यांग महिलांना प्राधान्य देण्यात येते.

आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी; तसेच आदिवासी बाह्य क्षेत्रातील जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत घराचे २६९.०० चौ.फू. चटई क्षेत्र असलेले पक्के घरकूल बांधून देण्याची तरतूद आहे.

## स्पर्धा परीक्षार्थींना आर्थिक साहाय्य

प्रशासकीय सेवांमध्ये अनुसूचित जमातीच्या तरुणांची टक्केवारी वाढावी, यासाठी आदिवासी विकास विभागाने स्वतंत्र योजना आणली आहे. राज्यातील अनुसूचित जमातीच्या तरुणांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळावे, त्यांचा प्रशासनात सहभाग वाढावा, यासाठी सन २०२०-२१ या वर्षापासून प्रोत्साहनपर आर्थिक साहाय्य देण्यात येते. तसेच नामवंत खासगी व्यावसायिक संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येते .



## एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल

अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, या हेतूने नवव्या पंचवार्षिक योजनेत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरावर निवासी शाळा स्थापन करण्याचा केंद्र शासनाने निर्णय घेतला. या शाळा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई), नवी दिल्ली यांच्याशी संलग्न असून, या शाळांमध्ये इ. ६ वी ते १२ वी (विज्ञान) पर्यंतचे वर्ग नैसर्गिक वाढीने सुरू करण्यात येतात. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत शिक्षण देण्यात येते. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच निवास, अंथरूण-पांघरूण, भोजन, गणवेश, पाठ्यपुस्तके वह्या व शैक्षणिक साहित्य इ. सुविधा मोफत देण्यात येतात. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, व्यवसाय प्रशिक्षण आणि इतर विशेष पाठ्योत्तर कार्यक्रम यांना पुरेसा वेळ मिळेल, अशाप्रकारे या शाळांचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. आजपर्यंत राज्यामध्ये एकूण ३९ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ३७ एकलव्य निवासी शाळा सुरू आहेत.

## स्वाभिमान सबलीकरण योजना

दारिद्र्यरेषेखालील आदिवासी भूमिहीन कुटुंबांना उत्पन्नाचे स्रोत उत्पन्न व्हावे आणि कसण्यासाठी जमीन उपलब्ध करण्यासाठी आदिवासी विकास विभाग स्वाभिमान सबलीकरण योजना राबवते. या योजनेंतर्गत चार एकरपर्यंत कोरडवाहू जमीन प्रति एकर पाच लक्ष दराने आणि दोन एकरपर्यंत बागायती जमीन प्रति एकर आठ लाख या कमाल दराने देण्याची तरतूद आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीने खासगी जमीन प्रचलित शिघ्रशिघ्र (रेडिरेकनर) किमतीप्रमाणे विकत घेऊन उपलब्ध करून द्यावयाची आहे. या दराने जमीन उपलब्ध होत नसल्यास २० टक्क्यांच्या पटीत १०० टक्क्यांपर्यंत म्हणजेच रेडिरेकनरच्या दुपटीपर्यंत किंमत वाढवण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस देण्यात आले आहेत; परंतु जिरायती जमिनीकरिता ही रक्कम प्रति एकर पाच लाख आणि बागायती जमिनीकरिता ही रक्कम प्रति एकर आठ लाख इतक्या कमाल मर्यादेत असावी.

ही योजना १०० टक्के शासन अनुदानित आहे. या पूर्वीच्या योजनेतील १५ वर्ष वास्तव्याची अट वगळण्यात आली असून लाभार्थी त्या गावचा रहिवासी असावा व भूमिहीन असावा तसेच दारिद्र्यरेषेखालील यादीमध्ये त्याची नोंद असावी. या योजनेसाठी निवडावयाच्या लाभार्थ्यांमध्ये दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन आदिवासी परित्यक्त्या स्त्रिया, दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन आदिवासी विधवा स्त्रिया, भूमिहीन कुमारी माता, भूमिहीन आदिम जमाती, भूमिहीन पारधी यांना प्राधान्य देण्यात आले आहे.

## ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना



राज्यातील आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी भागातील आदिवासी उपयोजना क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र, माडा व मिनीमाडा, अर्थसंकल्पित माडा व मिनीमाडा क्षेत्र व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील ५० टक्क्यांपेक्षा जास्त आदिवासींची लोकसंख्या असलेल्या वस्त्या, पाडे, वाड्या, गावांच्या व महानगरपालिका, नगरपरिषदेचे प्रभाग येथील विकासासाठी आवश्यक असलेल्या सामूहिक विकासाच्या सुविधा पुरवण्यासाठी ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम ही योजना राबवण्यात येते. ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही योजना केवळ जिल्हास्तरावरून अथवा राज्यस्तरावरून न राबवता सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्ती सुधारणा योजना, पूर्वीची दलित वस्ती सुधार योजना व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना या योजनांप्रमाणे राज्यस्तर व जिल्हास्तर अशा दोन्ही स्तरांवर राबवण्यात येणार आहे.

### वनहक्क कायदा

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ दि. ३१ डिसेंबर २००७ पासून राज्यात लागू झाला आहे. या अधिनियमाच्या कलम-३ (१) अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी यांना वैयक्तिक किंवा सामूहिक वनहक्क धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत.

## आदिवासी विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी दरवर्षी अधिछात्रवृत्ती

राज्यातील १०० आदिवासी विद्यार्थ्यांना पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी संशोधन अधिछात्रवृत्ती मिळणार आहे. राज्यातील १०० आदिवासी विद्यार्थ्यांना दरवर्षी संशोधनासाठी अधिछात्रवृत्ती दिली जाते. सद्य:स्थितीत सुरू असलेल्या संशोधन अधिछात्रवृत्तीमध्ये अन्य विद्याशाखांचा समावेश केला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना दरमहा ३१ हजार रुपये अधिछात्रवृत्ती दिली जाते. दिव्यांगांना अतिरिक्त दोन हजार रुपये साहाय्य अनुदान दिले जाते. विशेष म्हणजे हे सगळे लाभार्थ्यांना त्यांच्या खात्यात थेट दिले जाते.

## पेसा ५ टक्के अबंध निधी योजना

मा. राज्यपाल महोदयांच्या ३० ऑक्टोबर २०१४ च्या अधिसूचनेनुसार आदिवासी घटक कार्यक्रमाच्या एकूण नियतव्ययाच्या ५% निधी हा दरवर्षी अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा, वन हक्क अधिनियम (एफआरए) व पेसा (पीईएसए) कायद्याची अंमलबजावणी, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजीविका इत्यादी कामांसाठी वितरित करण्यात येतो.

विभागीय संपर्क अधिकारी

**राज्यात क्रीडा संस्कृतीचे जतन करणे व क्रीडा वातावरण निर्माण व्हावे, यासाठी महाराष्ट्र राज्य शासन विविध उपक्रम राबवत आहे. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये राज्याचा नावलौकिक वाढावा व अधिक पदके प्राप्त व्हावीत, यासाठी राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देणे व स्पर्धेच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, यासाठी विविध योजना राबवण्यात येतात.**

# क्रीडा व युवक कल्याण

**राजू धोत्रे**

फुटबॉल हा जगातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे. फुटबॉल हा खेळ महाराष्ट्रामध्ये रुजावा व राज्यातील खेळाडूंना या खेळामध्ये आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने खेळाडूंना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण व प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासन क्रीडा विभाग व एफसी बायर्न म्युनिक फुटबॉल क्लब, जर्मनी यांच्यामध्ये फेब्रुवारी २०२३ मध्ये सामंजस्य करार करण्यात आला होता. या कराराच्या पार्श्वभूमीवर राज्यात एफसी बायर्न महाराष्ट्र कप नावाने १४ वर्षांखालील मुलांच्या फुटबॉल स्पर्धा राज्यातील सर्व जिल्हे, विभाग व राज्यस्तरावर घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये राज्यातील जवळपास १ लाख मुलांनी सहभाग घेतला.

म्युनिक जर्मनी येथील प्रशिक्षणासाठी, एफसी बायर्न फुटबॉल क्लबच्या प्रशिक्षकांनी या स्पर्धेमधून सर्वोत्कृष्ट २० फुटबॉलपटूंची निवड केली. जर्मनीतील बायर्न राज्यातील म्युनिक येथे १९ ते २६ मे २०२३ या कालावधीमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

राज्यात फुटबॉल खेळास चालना मिळावी. तसेच राज्यातील खेळाडूंना या खेळातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील कौशल्य तंत्र आत्मसात करता यावे व प्रशिक्षण मिळावे आदी बाबींचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी तसेच खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला होता.


## सामंजस्य करार

कुस्ती खेळाडूंना तांत्रिक दृष्टीने सक्षम करण्यासाठी जपानमधील वाकायामा राज्याच्या कुस्तीगीर संघटनेबरोबर सामंजस्य करार करण्यात आला.

महाराष्ट्र व वाकायामा या दोन्ही राज्यांतील खेळाडूंना परस्परांच्या देशात जाऊन एकत्र सराव, तंत्रांची देवाणघेवाण करणे सुलभ होणार असून प्रशिक्षकांनाही सहकार्य करून खेळाडूंना नवनवीन तंत्रे शिकवणे शक्य होणार आहे. खेळाडूंच्या खेळाचा दर्जा उंचावण्यासाठी याचा उपयोग होणार असून खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील कामगिरी उंचावण्यास मदत होणार आहे. पुणेस्थित असोसिएशन ऑफ फ्रेंडस् ऑफ जपान (एएफजे) या संस्थेच्या समन्वयाने हा करार साध्य झाला आहे. एएफजे ही संस्था गेली ३२ वर्षे भारत व जपान या दोन देशांचे विविध क्षेत्रांतील संबंध दृढ करण्यासाठी झटत आहे.

राज्यातील कुस्ती खेळाडूंना तांत्रिक







दृष्टीने सक्षम करण्यासाठी राज्यातील कुस्ती खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावरील ऑलिम्पिकसारख्या विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धा; तसेच राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये पदकांची संख्या वाढवण्यासाठी कुस्ती या खेळातील तंत्रज्ञान आदान-प्रदान करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. खेळाडूंना विविध खेळांच्या सरावासाठी विभाग, जिल्हा तालुकास्तरावर अद्ययावत क्रीडासंकुले बांधण्यात आली आहेत. त्यामध्ये खेळांसाठी लागणारे साहित्य पुरवण्यात येते. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील मार्गदर्शक नियुक्त करण्यात आले आहेत.

## गोविंदांना आता विमा संरक्षण

गोविंदा पथकातील गोविंदांना आता १० लाखांचे विमा संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या विमा संरक्षणाचे प्रीमियम शासनाकडून भरण्यात येत आहे.

गोविंदा पथकातील खेळाडूचा दहीहंडीच्या थरावरून पडून मृत्यू झाल्यास कायदेशीर वारसांना पाच लाख, सात लाख ५० हजार ते १० लाखांपर्यंत आर्थिक साहाय्य देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

## विजेत्या खेळाडूंना शासकीय नोकरी

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक पटकावणाऱ्या खेळाडूंना शासनात थेट नोकरीत नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## विजेत्यांच्या बक्षीस रकमेत पाचपट वाढ

पदके विजेत्यांच्या बक्षीस रक्कम जवळपास पाचपटीने वाढवण्यात आली आहे. पूर्वी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंना १० लाख रुपये देण्यात येत होते. आता ती रक्कम ५० लाख रुपये करण्यात आली आहे. रौप्यपदक विजेत्या खेळाडूंसाठी ७.५० लाख रुपयांऐवजी ३० लाख रुपये करण्यात आली आहे, तर कांस्यपदक विजेत्या खेळाडूंना ५ लाख रुपयांऐवजी २० लाख रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे.

## क्रीडा विद्यापीठ

राज्यातील फुटबॉल खेळाच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्य क्रीडा विभाग व एफसी बायर्न म्युनिक (FC Bayern Munich) जर्मनी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. सामंजस्य करारामुळे जी२० देशांतील सहकार्य वाढीस मदत होणार आहे.

## ऑनलाइन प्रणाली विकसित

क्रीडा विभागामार्फत शासकीय व निमशासकीय सेवेत खेळाडूंसाठी ५% आरक्षण ठेवण्यात आले आहे, या आरक्षणासाठी खेळाडूंची क्रीडाविषयक प्रमाणपत्रे पडताळणी करण्याचे काम क्रीडा विभागामार्फत करण्यात येते, हे पडताळणीसाठी खेळाडूंचा अर्ज, त्यांचे क्रीडाविषयक प्रमाणपत्र, संघटनांमार्फत त्या-त्या क्रीडा स्पर्धांची विविध आवश्यक कागदपत्रे प्रत्यक्ष सादर करण्यात येत होती. तथापि, बनावट क्रीडा प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय नोकरी मिळवणे; तसेच संघटना सचिव यांची बनावट स्वाक्षरी व कागदपत्रे सादर करून शासनाची फसवणूक करणे असे प्रकार निदर्शनास आले आहेत. त्यामुळे पात्र खेळाडूंच्या बाबतीत अन्याय झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे क्रीडा विभागामार्फत ऑनलाइन प्रणाली विकसित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासामध्ये ऑगस्ट क्रांतीचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. ऑगस्ट क्रांती म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली ९ ऑगस्ट १९४२ रोजी सुरू केलेली 'भारत छोडो' ही चळवळ होय. या चळवळीमध्ये लाखो लोक सामील झाले. हजारो लोक तुरुंगात गेले आणि शेकडो लोकांना आपले प्राण गमवावे लागले. संपूर्ण भारतभर ही चळवळ पसरलेली होती.**

# ऑगस्ट क्रांती चळवळ

**डॉ. अशोक चौसाळकर**

'भारत छोडो' चळवळ सुरू करण्यापूर्वी देशामध्ये अनेक घडामोडी झालेल्या होत्या. १९३५ च्या कायद्याप्रमाणे १९३७ साली अकरा राज्य विधानसभांच्या निवडणुका झाल्या आणि यातील आठ राज्यांमध्ये काँग्रेसला बहुमत मिळाले. या आठही राज्यांमध्ये काँग्रेसने आपले सरकार बनवले आणि आपल्या धोरणांची अंमलबजावणी करावयास सुरुवात केली. या कायद्याप्रमाणे केंद्रात मात्र फेडरेशन स्थापन होऊ शकले नाही.

## इंग्रज सरकार आणि काँग्रेसमधील संघर्ष

१९३९ साली जर्मनीने पोलंडवर हल्ला केल्यानंतर महासंहारक अशा दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली. हे युद्ध जर्मनी, जपान आणि इटली या फॅसिस्ट युतीविरुद्ध इंग्लंड आणि फ्रान्स यांनी सुरू केलेले युद्ध होते. त्यानंतर प्रथम अमेरिका आणि नंतर रशिया इंग्लंडच्या बाजूने युद्धात उतरले. युद्ध सुरू होताच भारतीय लोकांना विश्वासात न घेता भारताच्या व्हाईसरॉयने भारत युद्धात सामील झाला आहे अशी घोषणा केली. त्याचा निषेध म्हणून आठ काँग्रेस मुख्यमंत्र्यांनी आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा सादर केला. अशा प्रकारे इंग्रज सरकार आणि काँग्रेस यांच्यामध्ये एकप्रकारच्या संघर्षाला सुरुवात केली. याच काळात इंग्लंडमध्ये प्रधानमंत्री चेम्बरलेन यांच्या जागी हुजूर पक्षाचे साम्राज्यवादी नेते विन्स्टन चर्चिल हे प्रधानमंत्री झाले. भारतामध्ये त्यांच्यासारखे साम्राज्यवादी विचाराचे, लॉर्ड लिनलिथगो हे भारताचे व्हाईसरॉय झाले. या दोघांच्या उदार भूमिकेमुळे संघर्ष पुढे तीव्र झालेला आपणास दिसतो. तसे पाहिले तर काँग्रेस पक्ष फॅसिझमच्या विरोधात होता आणि दोस्त राष्ट्राबद्दल त्यांच्या मनामध्ये सहानुभूतीची भावना होती; पण सरकारने त्यांची बूज राखली नाही.



## अहिंसात्मक वैयक्तिक सत्याग्रह

१९४० साली महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. त्या सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही होते आचार्य विनोबा भावे आणि दुसरे सत्याग्रही होते पंडित जवाहरलाल नेहरू. महाराष्ट्रात नाना पाटील हे पहिले सत्याग्रही म्हणून निवडले गेले. १९४० मध्येच लाहोर येथे मुस्लीम लीगचे अधिवेशन झाले आणि या अधिवेशनात लीगने पाकिस्तानची मागणी करणारा ठराव संमत केला. काँग्रेसचे बिहारमधील रामगड येथे अधिवेशन भरले. या अधिवेशनाचे अध्यक्ष मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पाकिस्तानच्या मागणीला विरोध करून सामायिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. या अधिवेशनात काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली.

## काँग्रेस महासमितीची बैठक

दुसऱ्या महायुद्धाच्या पहिल्या दोन वर्षांच्या काळात, जर्मनीने आणि जपानने मोठे विजय मिळवले. अमेरिका आणि नंतर रशिया दोस्त राष्ट्रांच्या बाजूने १९४१ साली महायुद्धात उतरले. या युद्धात भारतीयांचा पाठिंबा मिळावा म्हणून अमेरिका आणि चीन यांनी भारतीय नेत्यांशी इंग्लंडने तडजोड करावी यासाठी दबाव आणला. त्यामुळे इंग्लंड सरकारने मजूर पक्षाचे नेते आणि अर्थमंत्री सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना शिष्टाई करण्यासाठी भारतात पाठवले. क्रिप्स यांनी भारतीय नेत्यांशी सविस्तर चर्चा केली; पण चर्चिल आणि लिनलिथगो यांच्या ताठर भूमिकांमुळे करार होऊ शकला नाही आणि क्रिप्स यांना यश आले नाही. क्रिप्स यांची शिष्टाई अयशस्वी ठरल्यानंतर देशात निराशेचे वातावरण होते. स्वातंत्र्यासाठी आता नवा संघर्ष सुरू करावा लागेल, याची जाणीव काँग्रेस नेतृत्वाला झालेली होती. काँग्रेसचे एक ज्येष्ठ नेते राजगोपालाचारी यांचे असे विचार होते की, आज फॅसिस्टांविरुद्ध विजय मिळवणे हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आता

## इतिहासातील महान घटना

८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथील गोवालिया टँक मैदानावर काँग्रेस महासमितीचे अधिवेशन बोलवण्यात आले. काँग्रेस अध्यक्ष मौलाना अबुल कलाम आझाद यांनी भाषण करून या ठरावास मान्यता देण्याची विनंती केली. उपस्थित प्रतिनिधींनी मोठ्या बहुमताने या ठरावास मान्यता दिली; परंतु महासमितीच्या १३ सदस्यांनी उभे राहून या ठरावाला विरोध केला. हे सभासद कम्युनिस्ट पक्षाचे आणि मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमॉक्रेटिक पक्षाचे अनुयायी होते. या ठरावाला अनुमोदन देताना महात्मा गांधींनी जे भाषण दिले ते सर्वांसाठी दिशादर्शक ठरले. या विषयावर गांधी जवळजवळ दोन तास बोलले. प्रथम त्यांनी हिन्दुस्थानी भाषेमध्ये आणि नंतर इंग्रजी भाषेमध्ये आपल्या अनुयायांशी संवाद साधला. आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच गांधींनी १३ विरोधी मत मांडणाऱ्या प्रतिनिधींचे अभिनंदन केले. मोठे बहुमत विरोधात असतानासुद्धा आपल्या मतांशी ते प्रामाणिक राहिल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

भारताचे स्वातंत्र्य तिसऱ्या जगातील गुलाम देशाच्या स्वातंत्र्यासाठी आवश्यक आहे, असे ते म्हणाले. सुरुवातीलाच त्यांनी असे मत व्यक्त केले की, ब्रिटिश सरकार मुस्लीम लिगच्या हातामध्ये सत्ता देण्यास तयार असेल, तर आपली हरकत नाही; पण हे राज्य मुस्लिम राज्य किंवा मुस्लीम वर्चस्वाचे राज्य नसले पाहिजे आणि त्यामध्ये एका जमातीचे इतरांवर वर्चस्व लादणे आम्हाला चालणार नाही. काँग्रेस पक्ष केवळ हिंदूकरिता लढत नाही, तर तो सर्वांसाठी लढतो. स्वराज्यासाठी हिंदु-मुसलमानांचे ऐक्य आवश्यक आहे. कारण दोघांनाही इंग्रजांच्या बेड्यातून सुटायचे आहे. ते म्हणाले की, आता मला ताबडतोब स्वातंत्र्य हवे आहे. आता या क्षणी ते मला हवे आहे. त्यासाठी मी जितका त्याग करावा लागेल, तितका करावयाला तयार आहे. भारतावर जपानचे आक्रमण होत असताना मी गप्प बसावे असे सांगणे अयोग्य आहे.

सत्याग्रहाची चळवळ सुरू करू नये; पण बहुसंख्य काँग्रेसजन स्वातंत्र्यासाठी शेवटचा लढा सुरू करण्याबाबत उत्सुक होते. या प्रश्नाचा विचार करण्यासाठी १४ जुलै १९४२ रोजी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीत काँग्रेस पक्षाने अशी मागणी केली की, सरकारने भारताला स्वातंत्र्य द्यावे. कारण भारताची गुलामगिरी भारताचे संरक्षण करण्याच्या मार्गामध्ये अडथळा निर्माण करत आहे. सध्या जगाला भस्मसात करणारे महायुद्ध सुरू असताना पारतंत्र्यामुळे भारतीय लोक काही करू शकत नाहीत. भारताचे स्वातंत्र्य हे तिसऱ्या जगातील गुलाम राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठी आवश्यक आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा उद्देश साम्राज्यशाहीचा अंत करणे आणि जगातील इतर गुलाम राष्ट्रांना स्वतंत्र करून त्यांचे शोषण थांबवणे हा आहे. क्रिप्स शिष्टाई यशस्वी झाल्यामुळे भारतीय लोकांच्या मनामध्ये ब्रिटिशांबद्दल द्वेषभावना आणि जपानच्या विजयाबद्दल आनंद निर्माण होत आहे, हे पाहून काँग्रेस अशी मागणी करते की, ब्रिटिशांनी आमच्या देशातून चालते व्हावे आणि त्याजागी हंगामी सरकार स्थापन करावे. त्यानंतर या सरकारच्या नेतृत्वाखाली आणि चीनच्या मदतीने, आमच्या आक्रमणाचा प्रतिकार करत यानंतर तीन आठवड्यांनी या ठरावास मान्यता देण्यासाठी काँग्रेस महासमितीची बैठक बोलवण्यात आली.




## करा किंवा मरा

१९४२ च्या चळवळीसाठीचा 'चलेजाव' हा मंत्र देताना गांधी म्हणाले, 'हा एक मंत्र मी तुम्हाला देतो, तो तुम्ही आपल्या हृदयावर कोरून ठेवा आणि तो तुमच्या प्रत्येक श्वासातून व्यक्त होऊ द्या. तो मंत्र म्हणजे 'करेंगे या मरेंगे' आपण स्वतंत्र तरी होऊ किंवा त्या प्रयत्नात मरून जाऊ. आपल्या गुलामगिरीची पापी अवस्था पाहायला आपण जगणार नाही. प्रत्येक सच्च्या स्त्री, पुरुष काँग्रेस अनुयायाने या कठोर निश्चयाने लढ्यात सामील झाले पाहिजे. प्रत्येक जणाने आपल्या अंतरात्म्याला साक्षी ठेवून अशी प्रतिज्ञा करावी की, स्वातंत्र्य मिळेपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाही. स्वातंत्र्य हे भ्याडासाठी नाही मर्दासाठी आहे. महात्मा गांधींनी लोकांना अहिंसक मार्गाने या उद्याच्या निकराच्या सत्याग्रहासाठी तयार राहावे, असे आवाहन केले. ते असे म्हणाले की, लढा लगेच सुरू होणार नाही आणि चर्चेसाठी त्यांनी सरकाराला तीन आठवड्यांचा वेळ दिला आहे, त्यासाठी ते व्हाईसरॉयला भेटायलाही तयार आहेत.

८ ऑगस्ट रोजी महात्मा गांधींनी केलेल्या या आवाहनामुळे लोकांच्या उत्साहाला भरती आली; पण व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी गांधींची - चर्चेची मागणी लाथाडून देत त्याच दिवशी काँग्रेसच्या बहुतेक पुढाऱ्यांना तुरुंगात टाकले. महात्मा गांधींना तुरुंगात टाकण्यात आले, तर पंडित नेहरू, मौलाना आझाद

आणि वल्लभभाई पटेल यांची रवानगी अहमदनगरच्या किल्ल्यामध्ये करण्यात आली. तुम्ही स्वतंत्र आहे असे वागावे, असे गांधींनी सांगितल्यामुळे देशातील विविध भागातील लोकांनी स्वातंत्र्याची बंधने झुगारून चळवळ करावयास सुरुवात केली. अनेक ठिकाणी लोकांनी मोर्चे काढले. तहसीलदार किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयावर फडकणारा ब्रिटिश झेंडा काढून चरखा अंकित असलेला तिरंगा झेंडा त्या जागी फडकवण्यास सुरुवात केली. या



वेळी निःशस्त्र आणि अहिंसक सत्याग्रह्यांवर पोलिसांनी गोळीबार केला आणि त्यात अनेक लोक मारले गेले. वैयक्तिक शौर्याच्या अनेक घटना घडल्या. खानदेशात शिरीषकुमार मेहता या १३ वर्षांच्या मुलाने आणि हमुकलानी या सिंधमधील मुलाने छातीवर गोळ्या झेलून प्राण अर्पण केले; पण हातातील तिरंगा झेंडा सोडला नाही. मोठा पोलीस बंदोबस्त असतानाही अरुणा आसफ अली यांनी गोवालिया टँक मैदानावर तिरंगा झेंडा फडकावला. हा लढा देशभर चालू राहिला; परंतु तो विसकळीत स्वरूपामध्ये होता. कारण, काँग्रेसचे सर्व नेते तुरुंगामध्ये होते.

## समाजवादी विचारांचा प्रभाव

काँग्रेसमधील तरुण कार्यकर्त्यांनी असा निर्णय घेतला की. आता हा लढा भूमिगतरीत्या चालवावा लागणार आहे. कारण पोलिसांच्या गोळीबारात असंख्य लोक मारले जात आहेत. यात समाजवादी विचारांच्या तरुणांचा भरणा जास्त होता. कुठल्याही प्रकारे हिंसेचा वापर न करता, मनुष्यवध होऊ न देता सरकारच्या कामकाजाला रतीब घालण्याचा दुसऱ्या टप्प्यातील चळवळीचा उद्देश होता. यामध्ये सरकारविरुद्ध पत्रके वाटणे, रेल्वेच्या फिश प्लेटस् काढून मालगाड्या न चालू देणे, मात्र प्रवासी गाड्यांना हात न लावणे, संदेश वहन यंत्रणा उद्ध्वस्त करणे, गुप्त रिडिओ केंद्र चालवणे आदी बाबींचा समावेश होता. जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, डॉ. लोहिया, एस. एम जोशी हे या चळवळीतील प्रमुख नेते होते. जयप्रकाश नारायण यांना अटक झालेली असताना तुरुंग फोडून ते बाहेर पडले. अच्च्युतराव पटवर्धन शेवटपर्यंत सरकारच्या हातामध्ये सापडले नाहीत. मुंबई येथे काही महिने डॉ. उषा मेहता आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी काँग्रेस रेडिओचे केंद्र यशस्वीरीत्या चालवले. या चळवळीला लोकांचा मोठ्या प्रमाणामध्ये पाठिंबा होता. भारताच्या तीन जिल्ह्यांमध्ये लोकांनी ब्रिटिश राजवट उलथून टाकून प्रतिसरकारांची स्थापना केली. हे तीन जिल्हे म्हणजे, मिदनापूर, बालिया आणि सातारा. मिदनापूर येथील चळवळीचे नेतृत्व मातंगिनी हाजरा या निष्कांचन विधवा महिलेने केले. तिने तीन हजार लोकांच्या मोर्चाचे नेतृत्व करीत तहसील कार्यालयावर मोर्चा नेला. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात हाजरा यांचा बळी गेला. त्यानंतर लोकांनी उठाव करून तेथे प्रतिसरकार स्थापन केले. या चळवळीच्या दरम्यान तुरुंगामध्ये महात्मा गांधींच्या पत्नी कस्तुरबा गांधी, महादेव भाई देसाई आणि मौलाना आझाद यांचे निधन झाले.

सातारा येथे स्थापन झालेल्या प्रतिसरकारला शेतकऱ्यांचा पाठिंबा होता. या चळवळीमध्ये नाना पाटील, जी. डी. लाड, नागनाथ नाईकवडी, बर्डे गुरुजी, कासेगावकर वैद्य यांचा समावेश होता. क्रांतिकारकांनी अनेक गावांतील सरकारी सत्ता नष्ट करून आपले राज्य स्थापन केले. त्यासाठी ग्रामस्वराज्याची कल्पना राबवण्यात आली. या चळवळीतील मुख्य नेते शेवटपर्यंत हाती लागले नाहीत. महाराष्ट्रातील इतर भागातही याला चांगला प्रतिसाद मिळाला.

## स्वातंत्र्यलढा पूर्णत्वास

१९४२ च्या ऑगस्ट क्रांतीच्या चळवळीमुळे ब्रिटिशांचा राज्य करण्याचा अधिकार लयास गेला. या चळवळीला मुस्लीम लिग, हिंदू महासभा, डॉ. आंबेडकरांचा शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, लोकनायक बापुजी अणे यांचा लोकशाही स्वराज्य पक्ष, रॉय यांचा रॅडिकल डेमॉक्रेटिक पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांचा पाठिंबा नव्हता, तरीही काँग्रेसने स्वबळावर ही चळवळ चालवली. यामुळे लोकांचा यांना पाठिंबा मिळाला व १९४६च्या सार्वत्रिक निवडणुकीत यांना मोठे यश मिळाले. या काळात बंगालमध्ये मोठा दुष्काळ पडला आणि ४४ तास लोक अन्न-अन्न करत मरण पावले; पण इंग्रज सरकारने धान्याची निर्यात थांबवली नाही. त्यामुळे लोकांना स्वराज्याचे व स्वातंत्र्याचे महत्त्व समजले. या सर्व गोष्टींचे फलित म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ ला उगवलेला स्वातंत्र्य सूर्य. स्वातंत्र्यप्राप्तीमागे असणारे राष्ट्रभक्तीचे धगधगते अग्निकुंड, यामुळेच हा स्वातंत्र्यलढा पूर्णत्वास आला. त्या समस्त हुतात्म्यांना क्रांतिदिनाच्या निमित्ताने कोटी कोटी प्रणाम!

(लेखक हे ज्येष्ठ विचारवंत आहेत.)

# नवे मंत्री

**विधानसभेचे सदस्य अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची, तर इतर आठ जणांनी २ जुलै २०२३ रोजी मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यांना राज्यपाल रमेश बैस यांनी राजभवनातील दरबार हॉलमध्ये पद व गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी छगन चंद्रकांत भुजबळ, दिलीप दत्तात्रय वळसे–पाटील, हसन मियालाल मुश्रीफ, धनंजय पंडितराव मुंडे, धर्मरावबाबा भगवंतराव आत्राम, कु. आदिती सुनील तटकरे, संजय बाबुराव बनसोडे, अनिल भाईदास पाटील यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यावेळी विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य, विधानसभेचे सदस्य, लोकप्रतिनिधी आदी उपस्थित होते.**




## अजित अनंतराव पवार

**जन्म** : २२ जुलै, १९५९. **जन्म ठिकाण** : देवळाली-प्रवरा, तालुका-राहुरी, जिल्हा-अहमदनगर. **शिक्षण** : बी.कॉम. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती सुनेत्रा. **अपत्ये** : एकूण २ (दोन मुलगे). **व्यवसाय** : शेती. **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. **मतदारसंघ** : २०१-बारामती, जिल्हा -पुणे.

**इतर माहिती** : विश्वस्त, विद्या प्रतिष्ठान, बारामती; सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा; संचालक, छत्रपती शिक्षण संस्था, भवानीनगर, तालुका इंदापूर; संचालक, श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना, लि. भवानीनगर; संचालक, माळेगाव सहकारी साखर कारखाना, लि.; संचालक, सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, लि. जिल्हा पुणे; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, मुंबई; संचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, पुणे; मार्च १९९१ ते ऑगस्ट १९९१ तसेच डिसेंबर १९९४ ते डिसेंबर १९९८ अध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; ११ डिसेंबर १९९८ ते १७ ऑक्टोबर १९९९ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई; १९ डिसेंबर २००५ पासून संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघ; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई; २८ सप्टेंबर २००६ पासून अध्यक्ष, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ; मार्च २०१३ पासून अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन; सप्टेंबर २००५ ते २३ मार्च २०१३ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन; १३ ऑगस्ट २००६ ते १९ ऑगस्ट २०१८ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन; १७ जून १९९१ ते १८ सप्टेंबर १९९१ सदस्य, लोकसभा; १९९१-९५ (पो.नि.), १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २८ जून १९९१ ते नोव्हेंबर १९९२ कृषी, फलोत्पादन व ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री ; नोव्हेंबर १९९२ ते फेब्रुवारी १९९३ जलसंधारण, ऊर्जा व नियोजन खात्याचे राज्यमंत्री; २७ ऑक्टोबर १९९९ ते २५ डिसेंबर २००३ पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे), फलोत्पादन खात्याचे मंत्री; २६ डिसेंबर २००३ ते ३१ ऑक्टोबर २००४ ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, पाटबंधारे (कृष्णा खोरे कोकण पाटबंधारे महामंडळ) खात्याचे मंत्री; ९ नोव्हेंबर २००४ ते ७ नोव्हेंबर २००९ जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून), लाभक्षेत्र विकास, पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याचे मंत्री; ७ नोव्हेंबर २००९ ते ९ नोव्हेंबर २०१० जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व ऊर्जा खात्याचे मंत्री; ११ नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१४ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन आणि ऊर्जा ); ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; २२ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०१९ उपमुख्यमंत्री; ३० डिसेंबर २०१९ पासून उपमुख्यमंत्री. (वित्त व नियोजन) ६ एप्रिल २०२१ ते जून २०२२ अखेर राज्य उत्पादन शुल्क खात्याचा अतिरिक्त कार्यभार. ५ जुलै २०२२ पासून विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी निवड.



## छगन चंद्रकांत भुजबळ



**जन्म** : १५ ऑक्टोबर १९४७. **जन्म ठिकाण** : नाशिक. **शिक्षण** : एल.एम.ई. (आय), (मेकॅनिकल इंजिनीअर). **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती मीना. **अपत्ये**: एकूण १ (एक मुलगा). **व्यवसाय** : शेती. **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. **मतदारसंघ** : ११९-येवला, जिल्हा- नाशिक.

**इतर माहिती** : संस्थापक-अध्यक्ष, मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट, बांद्रा, मुंबई; माजी विश्वस्त, व्हि . जे. टी. आय. संस्था, मुंबई; विश्वस्त, नायर रुग्णालय; विश्वस्त, प्रिन्स आगाखान रुग्णालय, मुंबई; संस्थापक, महात्मा फुले समता परिषद, या संस्थेमार्फत उपेक्षित पद-दलित, मागासवर्गीयांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न तसेच, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहु महाराज यांच्या विचारांचा व आदर्शांचा प्रचार व प्रसार; ५ नोव्हेंबर २०१० रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांना मुंबई भेटीदरम्यान महात्मा फुले यांनी लिहिलेल्या 'गुलामगिरी' या पुस्तकाचा 'स्लेव्हरी' हा अनुवादित ग्रंथ भेट दिला; माजी विश्वस्त, मुंबई पोर्ट-ट्रस्ट; १९८५ दैवत व १९९० नवरा बायको या मराठी चित्रपटांची निर्मिती; १९७३ सदस्य, १९७३-८४ विरोधी पक्षनेते, १९८५ व १९९१ महापौर, मुंबई महानगरपालिका; या काळात गृहनिर्माण, झोपडपट्टी सुधारणा, मुंबई शहराचे सौंदर्यीकरण, चौकांचे सुशोभीकरण, हुतात्मा चौकाचे सुशोभीकरण केले; १९९१ अध्यक्ष, ऑल इंडिया कौन्सिल ऑफ मेयर्स; १९९१ पर्यंत शिवसेनेत विविध पदांवर कार्य; १९९१ नंतर काँग्रेस पक्षात कार्यरत; जून १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य ; संस्थापक-सदस्य व जून १९९९ ते नोव्हेंबर १९९९ महाराष्ट्राचे पहिले प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; १९८५-९०, १९९०-९५, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; १९९६-२००२ व २००२-२००४ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; डिसेंबर १९९१ ते मार्च १९९३ महसूल खात्याचे मंत्री; मार्च १९९३ ते मार्च १९९५ गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधार, घरदुरुस्ती आणि पुनर्बांधणी खात्याचे मंत्री; १९९६-१९९९ विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद; ऑक्टोबर १९९९ ते जानेवारी २००३ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व गृह आणि पर्यटनमंत्री, नोव्हेंबर १९९९ ते जानेवारी २००३ मुंबई शहराचे पालकमंत्री; जानेवारी २००३ ते डिसेंबर २००३ उपमुख्यमंत्री व गृहमंत्री; नोव्हेंबर २००४ ते ऑक्टोबर २००९ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) या खात्यांचे मंत्री; नोव्हेंबर २००९ ते नोव्हेंबर २०१० दुसऱ्यांदा उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१४ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री व नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री; या काळात दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदनाची अत्यंत देखणी अशी महाराष्ट्राला भूषणावह ठरणारी वास्तू उभी केली; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी २०२० ते जून २०२२ अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण खात्याचे मंत्री.

## दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील



**जन्म** : ३० ऑक्टोबर १९५६. **जन्म ठिकाण** : निरगुडसर, तालुका-आंबेगांव, जिल्हा -पुणे. **शिक्षण** : बी.ए. (ऑनर्स ), डी.जे., एल.एल.एम. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती किरण. **अपत्ये** : एकूण १ (एक मुलगी). **व्यवसाय** : शेती व व्यापार. **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. **मतदारसंघ** : १९६-आंबेगाव, जिल्हा -पुणे.

**इतर माहिती** : महाविद्यालयीन जीवनापासूनच राजकारणात सक्रिय सहभाग; सहकारी चळवळीमध्ये राज्यातील अभ्यासू नेत्यांसोबत राहून सक्रिय सहभाग; संस्थापक-अध्यक्ष, राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र, पुणे या संस्थेमार्फत ग्रामीण, दुर्गम आदिवासी भागातील जनतेच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध उपक्रम राबवले; ग्रामीण भागात दुग्ध व्यवसायास प्रोत्साहन देऊन संस्थांचे जाळे विकसित केले; ग्रामीण भागातील महिला वर्गाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विशेष प्रयत्न; विश्वस्त, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई; महाराष्ट्रातील अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांशी निकटचा संबंध; संचालक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; संस्थापक-चेअरमन, भीमाशंकर सहकारी साखर कारखाना; १९९०-१९९५, १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; १९९२-१९९३ समिती प्रमुख, विधिमंडळ अंदाज समिती; राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे सन १९९७-१९९८ मध्ये महाराष्ट्र विधानसभेतील उत्कृष्ट संसदपटू या पुरस्काराने सन्मानित; ऑक्टोबर १९९९ ते डिसेंबर २००२ उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; डिसेंबर २००२ ते जानेवारी २००३ उच्च व तंत्रशिक्षण आणि ऊर्जा खात्याचे मंत्री; जानेवारी २००३ ते नोव्हेंबर २००४ ऊर्जा व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २००४ ते मार्च २००५ ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळून) व वैद्यकीय शिक्षण खात्याचे मंत्री; मार्च २००५ ते डिसेंबर २००८ ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळून), वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; डिसेंबर २००८ ते ऑक्टोबर, २००९ वित्त व नियोजन खात्याचे मंत्री; मंत्रिपदी कार्यरत असताना महत्त्वपूर्ण धोरणात्मक व उल्लेखनीय निर्णय घेतले. त्यामध्ये प्रामुख्याने 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळ' या कंपनीची स्थापना करून गतीने विकास केला. त्यामुळे राज्यात संगणक साक्षरता वाढीचे

महत्त्वाचे कार्य होऊ शकले. विद्युत कायदा २००३ ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी केली; ऊर्जा क्षेत्रात राज्याला योग्य दिशा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विभाजन करून सूत्रधारी कंपनी, महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या चार कंपन्यांची स्थापना केली व ऊर्जा विकासासाठी रोडमॅप केला. ६००० मेगावॅटचे प्रकल्प उभारण्याचे व विद्युत पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम केले; २००९-२०१४ अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा; या काळात विधानमंडळाचे कामकाज योग्य पद्धतीने चालावे, यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले; २०१२-२०१३ मध्ये महाराष्ट्र विधानमंडळाच्या अमृतमहोत्सव समारंभाचे भारताच्या राष्ट्रपती महामहीम प्रतिभाताई पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन केले; तसेच यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दीनिमित्त अमरावती, नागपूर, औरंगाबाद व मुंबई येथे प्रदर्शन व चर्चासत्रांचे आयोजन; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी २०२० ते ५ एप्रिल २०२१ कामगार व राज्य उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री. ६ एप्रिल २०२१ ते जून २०२२ गृह खात्याचे मंत्री.

## हसन मियालाल मुश्रीफ



**जन्म :** २४ मार्च १९५४. **जन्म ठिकाण :** कागल, जिल्हा-कोल्हापूर. **शिक्षण :** बी.ए. (ऑनर्स). **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती साहेरा. **अपत्ये :** एकूण ४ (तीन मुलगे व एक मुलगी). **व्यवसाय :** शेती. **पक्ष :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. **मतदारसंघ :** २७३-कागल, जिल्हा -कोल्हापूर.

**इतर माहिती :** विद्यार्थी चळवळीत सक्रिय सहभाग; अध्यक्ष, आदर्श शिक्षण संस्था, कागल; अध्यक्ष, भाई माधवराव बागल शिक्षण संस्था, कोल्हापूर; अध्यक्ष, नागनाथ शिक्षण संस्था, एकोंडी; संस्थापक-अध्यक्ष, छत्रपती शिवाजी सहकारी सोसायटी, कागल; शेतकरी, दुर्बल घटक व मागासवर्गीय यांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील; महाराष्ट्र कर्नाटक सीमाप्रश्नी शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनात सक्रिय सहभाग; शेतकरी संघटनेच्या तंबाखू व दूध दरवाढ आंदोलनात सहभाग; सदस्य व १९९७-९८ सभापती, पंचायत समिती, कागल; सदस्य, जिल्हा परिषद, कोल्हापूर; १९८६-२०१५ संचालक, काही काळ व्हाईस चेअरमन व चेअरमन, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, या बँकेच्या माध्यमातून अनेक नावीन्यपूर्ण योजना सभासदांच्या हितार्थ राबवल्या. त्यामुळे शासनाने या बँकेचा विशेष गौरव केला; अध्यक्ष, संजय गांधी निराधार योजना, कागल; संचालक व उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या. (महानंद), गोरेगाव, मुंबई; व्हाईस चेअरमन, खा. सदाशिवराव मंडलिक कागल तालुका सहकारी साखर कारखाना, हमीदवाडा; सदस्य, कागल तालुका खरेदी विक्री संघ; संस्थापक-संचालक, छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना लि. कागल; व्हाईस चेअरमन, कागल तालुका सह. सूत गिरणी मर्या. चेअरमन, शरद सहकारी सूत गिरणी मर्या; सहकारी कागल; संचालक, कोल्हापूर जिल्हा सहकारी कृषी उद्योग सहकारी संस्था; उपाध्यक्ष, जिल्हा काँग्रेस कमिटी; १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; मार्च २००१ ते जुलै २००४ पशुसंवर्धन व दुग्धविकास खात्याचे राज्यमंत्री; जुलै २००४ ते ऑक्टोबर २००८ पशुसंवर्धन, दुग्धविकास, शालेय शिक्षण, औकाफ खात्यांचे राज्यमंत्री; नोव्हेंबर २००८ ते नोव्हेंबर २००९ नगरविकास, पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय, अल्पसंख्याक, औकाफ, विधि व न्याय खात्याचे राज्यमंत्री ; नोव्हेंबर २००९ ते जून २०१४, कामगार खात्याचे मंत्री ; २७ जून २०१४ ते ऑक्टोबर २०१४ जलसंपदा (कृष्णा खोरे महामंडळ) खात्याचे मंत्री ; ऑक्टोबर २०१९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी २०१९ ते जून २०२२ ग्रामविकास खात्याचे मंत्री.

## धनंजय पंडितराव मुंडे



**जन्म :** १५ जुलै १९७५. **जन्म ठिकाण :** नाथ्रा, पो. कोठळी, तालुका परळी-वैजनाथ, जिल्हा बीड. **शिक्षण :** बी.एस.एल. **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती राजश्री. **अपत्ये :** एकूण २ (दोन मुली). **व्यवसाय :** शेती, व्यापार व समाजसेवा. **पक्ष :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. **मतदारसंघ :** २३३-परळी, जि. बीड.

**इतर माहिती :** अध्यक्ष, नाथ प्रतिष्ठान, परळी-वैजनाथ, या संस्थेमार्फत सामूहिक विवाहांचे आयोजन; वृक्ष लागवड, आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन; विविध क्रीडा स्पर्धांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप; २००३ मध्ये घाटनांदूर येथील रेल्वे अपघातात १२ जणांचे प्राण वाचविले; ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न सोडविण्यासाठी अनेक गावात २०० पेक्षा अधिक विंधन विहिरी घेतल्या ; २००१ मध्ये बेरोजगार व दहशतवाद विरोधी युवक मोर्चा ; २००८ दिल्ली येथील युवाक्रांती रॅलीत महाराष्ट्रातील युवकांचे नेतृत्व; १४ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय २००९ मध्ये पुणे येथे युवा संकल्प रॅलीचे

आयोजन केले; १९९७-१९९८ भारतीय जनता युवा मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी आघाडीचे प्रमुख; १९९८-२००१ उपाध्यक्ष व २००१-२००७ सरचिटणीस व २००७-२०१० अध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा ; नोव्हेंबर, २०१४ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य ; २००२-२००७ सदस्य, २००७-२०१० उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, बीड; संचालक, संत जगमित्र सहकारी सूतगिरणी मर्यादित, टोकवाडी, परळी- वैजनाथ; २०१०-२०१६, २०१६-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद; डिसेंबर २०१४ ते ऑक्टोबर २०१९ विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड; जानेवारी २०२० जून २०२२ सामाजिक न्याय व विशेष साहाय्य खात्याचे मंत्री.

## धर्मरावबाबा भगवंतराव आत्राम



**जन्म** : २० ऑक्टोबर १९५३. **जन्म ठिकाण** : अहेरी, जिल्हा गडचिरोली. **शिक्षण** : एस.एस.सी. **ज्ञात भाषा** : मराठी , हिंदी , इंग्रजी, गोंडी, माडिया व तेलगु. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती स्नेहादेवी. **अपत्ये** : एकूण- ३ (एक मुलगा व दोन मुली). **व्यवसाय** : शेती व व्यापार. **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. **मतदारसंघ** : ६९ - अहेरी (अनुसूचित जमाती), जिल्हा - गडचिरोली.

**इतर माहिती** : सन १९९१ सचिव, भगवंतराव मेमोरियल शिक्षण संस्था, अहेरी; उपाध्यक्ष; पुष्पप्रिया देवी शिक्षण मंडळ, अहेरी; १९८६ उपाध्यक्ष, वन वैभव शिक्षण मंडळ, आलापल्ली, या संस्थेमार्फत १०० शाळा व महाविद्यालये, आश्रमशाळा, सैनिकी शाळा, पोस्ट बेसिक आश्रम शाळा, डी.एड.कॉलेज, ज्युनिअर कॉलेज सुरू करून गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील मुलांच्या शिक्षणाची सोय केली; २००१-२००४ मध्ये नेत्रचिकित्सा शिबिरात १०,५०० जणांवर नेत्र चिकित्सा केली; वेस्टर्न झोन सुटिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक, बाफना पुरस्कार प्राप्त. २००४-२००६ सिकलसेल शिबिराचे आयोजन; कुपोषण कमी करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न; १९८२-८५ अध्यक्ष, गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटी; १९७८ सदस्य, ग्रामपंचायत, अहेरी; १९८०-१९८२ सभापती, पंचायत समिती, अहेरी; १९९५ सदस्य, जिल्हा परिषद, गडचिरोली; १९९०-९५, १९९९-२००४, २००४-२००९, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; जून १९९१ ते मार्च १९९३ आदिवासी विकास, वने आणि सामाजिक वनीकरण खात्याचे राज्यमंत्री; जुलै २००२ ते जुलै २००४ आदिवासी विकास खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर २००४ ते ऑक्टोबर २००९ परिवहन, सामाजिक न्याय, विमुक्त भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण व खनिकर्म खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

## कु. आदिती सुनील तटकरे



**जन्म** : १६ मार्च १९८८. **जन्म ठिकाण** : मुंबई. **शिक्षण** : एम. ए., डिप्लोमा इन एच. आर. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : अविवाहित. **व्यवसाय** : सामाजिक कार्य. **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. **मतदारसंघ** : १९३ - श्रीवर्धन, जिल्हा रायगड.

**इतर माहिती** : सन २००८-२००९ प्राध्यापिका, जयहिंद कॉलेज; २०१० संघटक, कोकण विभाग राष्ट्रवादी युवती काँग्रेस; २०१७-२०१९ सदस्या तसेच मार्च २०१७ ते नोव्हेंबर २०१९ अध्यक्षा; जिल्हा परिषद, रायगड; सन २०१७ मध्ये हिरकणी पुरस्काराने सन्मानित; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड; जानेवारी २०२० ते जून २०२२ उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क खात्याच्या राज्यमंत्री.

## संजय बाबुराव बनसोडे



**जन्म** : १ जुलै १९७३. **जन्म ठिकाण** : लातूर. **शिक्षण** : एच.एस.सी (सायन्स). **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती शिल्पा. **अपत्ये** : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी). **व्यवसाय** : शेती. **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. **मतदारसंघ** : २३७-उदगीर (अनुसूचित जाती), जिल्हा -लातूर.

**इतर माहिती** : सन १९९२ पासून विद्यार्थी चळवळीत सहभाग; १९९३ मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनात सक्रिय सहभाग; सांस्कृतिक व साहित्यिक कार्यात सहभाग; २००४ सदस्य, महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळ; १९९४ युवक काँग्रेस उपाध्यक्ष; १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; २००४ जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २००६ पासून सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २०१४ लातूर आयकॉन पुरस्कार प्राप्त; जैन समाज भूषण पुरस्काराने सन्मानित; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड; जानेवारी २०१९ ते जून २०२२ सामाजिक न्याय, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी योजना, पर्यावरण, पाणीपुरवठा स्वच्छता, भूकंप पुनर्वसन व संसदीय कार्य खात्याचे राज्यमंत्री.

---

## अनिल भाईदास पाटील



**जन्म** : ७ जुलै १९६८. **जन्म ठिकाण** : जळगाव. **शिक्षण** : एम.कॉम., डी.एलएल. अँड एल.डब्लू. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती जयश्री. **अपत्ये** : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी) **व्यवसाय** : शेती. **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. **मतदारसंघ** : १५-अमळनेर, जिल्हा जळगाव.

**इतर माहिती** : सन २००२-२००७ व २००७-२०१२ सदस्य, जिल्हा परिषद, जळगाव; सन २००४ ते २०१४ सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर; २०१० पासून संचालक, जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि .; माजी जिल्हा अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष; सन २०१९ पासून प्रदेश कार्यकारणी सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; प्रतोद, विधिमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

**(संदर्भ – १४ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय पुस्तिका)**

## राज्य मंत्रिमंडळ

राज्य मंत्रिमंडळातील नवनियुक्त मंत्र्यांच्या खातेवाटपाबरोबरच सध्याच्या मंत्र्यांच्या खात्यांमध्येदेखील काही फेरबदल करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खातेवाटप जाहीर केले आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी मंजुरी दिल्यानंतर हे खातेवाटप १४ जुलै २०२३ रोजी जाहीर करण्यात आले आहे.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे** : सामान्य प्रशासन, नगरविकास, माहिती व तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, परिवहन, सामाजिक न्याय, पर्यावरण व वातावरणीय बदल, खनिकर्म आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना वाटप न केलेले विभाग.
**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** : गृह, विधि व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा, राजशिष्टाचार.
**उपमुख्यमंत्री अजित पवार** : वित्त व नियोजन.
**छगन भुजबळ** : अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण.
**दिलीपराव वळसे-पाटील** : सहकार
**राधाकृष्ण विखे-पाटील** : महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास.
**सुधीर मुनगंटीवार** : वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय.
**हसन मुश्रीफ** : वैद्यकीय शिक्षण, विशेष साहाय्य.
**चंद्रकांत पाटील** : उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्ये.
**विजयकुमार गावित** : आदिवासी विकास.
**गिरीश महाजन** : ग्रामविकास आणि पंचायत राज, पर्यटन.
**गुलाबराव पाटील** : पाणीपुरवठा व स्वच्छता.
**दादाजी भुसे** : सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम).
**संजय राठोड** : मृद् व जलसंधारण.
**धनंजय मुंडे** : कृषी.
**सुरेश खाडे** : कामगार.
**संदीपानराव भुमरे** : रोजगार हमी योजना, फलोत्पादन.
**उदय सामंत** : उद्योग.
**प्रा. तानाजी सावंत** : सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण.
**रवींद्र चव्हाण** : सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून).
**अब्दुल सत्तार** : अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन.
**दीपक केसरकर** : शालेय शिक्षण, मराठी भाषा.
**धर्मरावबाबा आत्राम** : अन्न व औषध प्रशासन.
**अतुल सावे** : गृहनिर्माण, इतर मागास व बहुजन कल्याण.
**शंभूराज देसाई** : राज्य उत्पादन शुल्क.
**कु. आदिती तटकरे** : महिला व बालविकास.
**संजय बनसोडे** : क्रीडा व युवक कल्याण, बंदरे.
**मंगल प्रभात लोढा** : कौशल्य विकास, उद्योजकता व नावीन्यता.
**अनिल पाटील** : मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन.

**वस्तू व सेवा कर (जीएसटी) अस्तित्वात येण्यापूर्वी विक्रीकर विभागातर्फे राबवण्यात येणारे विविध कर या संदर्भातील ही योजना असून, या योजनेंतर्गत आवश्यक रकमेचा भरणा करण्यासाठी ३१ ऑक्टोबर २०२३ पर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. महाराष्ट्र कर व्याज शास्ती किंवा विलंब शुल्क तडजोड असे या योजनेचे नाव आहे.**

# अभय योजना २०२३

**रेश्मा घाणेकर**

लहान मोठ्या व्यापाऱ्यांना जुन्या थकबाकीच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी अभय योजना उपयुक्त ठरली आहे. ही योजना ऑनलाइन राबवण्यात येत असून वस्तू व सेवाकर लागू होण्यापूर्वी मूल्यवर्धित कर विभागातर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध कर यासंबंधीची ही योजना आहे.

- केंद्रीय विक्रीकर अधिनियम १९५६
- मुंबई मोटार स्पिरीट विक्री कराधान अधिनियम १९५८
- मुंबई विक्रीकर अधिनियम १९५९
- महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम १९६२
- महाराष्ट्र राज्य व्यवसाय व्यापार आजीविका यावरील कर अधिनियम १९७५
- महाराष्ट्र कोणताही माल कोणत्याही प्रयोजनार्थ वापरण्याच्या हक्काच्या हस्तांतरणावरीत विक्रीकर अधिनियम १९८५.
- महाराष्ट्र ऐशआराम कर अधिनियम १९८७.
- महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रामध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम १९८७
- महाराष्ट्र कार्य कंत्राटाच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर पुनर्धिनियमित अधिनियम १९८९
- महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम २००२
- महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम २००२.

## पात्रता

१. संबंधित कालावधीतीत कर व्याज शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीच्याबाबतीत अपिल केलेले असो किंवा नसो अर्ज करण्यास पात्र असेल.

२. या अर्जदाराने २०१६, २०१९ २०२२ च्या शासन निर्णयाद्वारे अभय योजनेखाली लाभ घेतला असेल, असे अर्जदारदेखील या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

३. अर्जदाराने २०२२ अंतर्गत लाभ घेतला असेल त्याला ज्या थकबाकीकरिता तडजोड अधिनियम २०२२ अंतर्गत यापूर्वीच अर्ज केला असेल आणि जिथे आवश्यक रक्कम भरण्याचा देय दिनांक अद्याप उलटून गेलेला नसेल अशा थकबाकीसाठी या अधिनियमाखाली

## योजनेची वैशिष्ट्ये

१. कर कायद्यांतर्गत एका वर्षात वैधानिक आदेशान्वये १० हजार रुपयांची थकबाकी असल्यास थकबाकीची रक्कम संपूर्णपणे माफ होण्याची तरतूद होती. या वर्षीपासून या योजनेंतर्गत दोन लाखांपर्यंतची थकबाकी माफ होणार आहे.

२. ज्या व्यापाऱ्यांची वैधानिक आदेशान्वये थकबाकीची रक्कम ५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यापाऱ्यांना अविवादित कर, विवादित कर, शास्ती असा वेगवेगळा हिशोब न करता सरसकट एकूण थकबाकीच्या २० टक्के रक्कम भरण्याचा पर्याय उपलब्ध करण्यात आला आहे. अशी ठोक २० टक्के रक्कम भरल्यास उर्वरित ८० टक्के रक्कम माफ करण्यात येणार आहे.

३. जे व्यापारी अशा प्रकारे ठोक रक्कम भरण्यास पात्र ठरणार नाहीत किंवा ते हा पर्याय निवडणार नाहीत, अशा व्यापाऱ्यांना थकबाकीच्या तडजोडीसाठी प्रस्तावित योजनेमध्ये अविवादित करास कुठलीही सवलत देण्यात येणार नाही.

४. अविवादित कराचा १०० टक्के भरणा करावा लागेल. मात्र, विवादित करापोटी ३१ मार्च २००५ पूर्वीच्या कालावधीसाठी ३० टक्के भरणा करावा लागेल. त्याचबरोबर व्याजापोटी १० टक्के व शास्तीपोटी ५ टक्के भरणा करावा लागेल.

५. १ एप्रिल २००५ ते ३० जून २०१७ या कालावधीसाठी विवादित रकमेपोटी ५० टक्के, व्याजापोटी १५ टक्के, शास्तीपोटी ५ टक्के व विलंब शुल्कापोटी ५ टक्के रकमेचा भरणा केल्यानंतर उर्वरित थकबाकी माफ करण्यात येणार आहे.

६. या योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक रकमेचा एकरकमी भरणा निश्चित कालावधीत करावा लागेल. तथापि ज्या व्यापाऱ्यांची एका आर्थिक वर्षाची थकबाकी ५० लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, अशा व्यापाऱ्यांना अभय योजनेंतर्गत भरावयाच्या आवश्यक रकमेसाठी हप्ते सवलतीचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. एकूण हप्ते सवलत ४ भागांमध्ये विभागली असून, पहिला हप्ता २५ टक्के हा ३१ ऑक्टोबर २०२३ पर्यंत भरणे आवश्यक आहे. उरलेले ३ हप्ते पुढील ९ महिन्यांमध्ये भरणे आवश्यक आहे. विलंब झाल्यास १२ टक्के दराने व्याजाची आकारणी होईल. आवश्यक रकमेपेक्षा कमी भरणा केल्यास त्या व्यापाऱ्याला प्रमाणशीर लाभ दिला जातो.

७. ही अभय योजना पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने आणि पारदर्शकपणे राबवण्यात येत आहे. उद्योग व व्यापार क्षेत्रातील थकबाकीदारांसाठी ही योजना महत्त्वाची ठरत आहे. तसेच या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

त्याला लाभ घेता येणार नाही.

४. २०२२ अंतर्गत देय लाभ किंवा त्याशिवाय पारित केलेल्या तडजोडीच्या आदेशांच्या प्रकरणात वरील बाब लागू होणार नाही.

५. जर या योजनेसाठी अर्ज करावयाचा असेल तर अपील प्राधिकाऱ्यासमोर किंवा न्यायाधीकरणासमोर किंवा न्यायालयासमोर प्रलंबित असलेले अपील अर्जदार पूर्णपणे आणि विनाशर्त मागे घेता येऊ शकतो.

## योजनेतील तरतुदी

ही तरतूद २०२२ च्या अभय योजनेप्रमाणे आहे.

१. जर मूल्यवर्धित कर अधिनियमाखालील अधिकची वजावट किंवा परतावा, केंद्रीय विक्रीकर अधिनियम १९५६ किंवा प्रवेशावरील कर अधिनियम या खालील दायित्वापोटी समायोजित केली असेल किंवा अशा प्रकारे समायोजित केलेली वजावट किंवा परतावा कमी करण्यात किंवा नाकारण्यात आला असेल, तर केंद्रीय विक्रीकर अधिनियम १९५६ किंवा प्रवेशावरील कर अधिनियम या खालील अपिलासोबत मूल्यवर्धित कर अधिनियमान्वये दाखल केलेले अपीलदेखील पूर्णपणे आणि विनाशर्त मागे घेणे गरजेचे आहे.

२. तडजोडीच्या अर्जासोबत अपील मागे घेण्याच्या अर्जाची पोचपावती सादर करणे हा उक्त अपील मागे घेण्याबाबतचा पुरेसा पुरावा असल्याचे समजण्यात येईल.

३. अर्जदार कलम १० पोट कलम २ मध्ये दिलेल्या तक्त्यातील खंड (क) मध्ये नमूद केलेल्या शेवटच्या दिनांकास दिलेल्या थकबाकीच्या प्रत्येक वित्तीय वर्षासाठी स्वतंत्रपणे अर्ज करू शकतो.

४. एखाद्या वित्तीय वर्षाशी संबंधित असणाऱ्या एकापेक्षा अधिक विवरणांच्या किंवा सुधारित विवरणांच्या बाबतीतील विवरणानुसार असलेल्या देण्यांची तडजोड करण्याची इच्छा असेल, तर तो एकच अर्ज करू शकतो. अर्जासोबत एकरकमी पर्यायाच्या बाबतीत संपूर्ण आवश्यक रक्कम आणि हप्त्याच्या पर्यायाच्या बाबतीत आवश्यक रकमेच्या २५ टक्के रक्कम भरल्याचा पुरावा आणि अर्जाच्या नमुन्यात सादर केलेले दस्तऐवज सादर करण्यात येतील.

५. आवश्यक रक्कम भरल्याची पदनिर्देशित अधिकाऱ्याची खात्री पटली असेल, तर पदनिर्देशित अधिकारी आदेश पारित करेल आणि एकरकमी प्रदान पर्याय असेल, तर आवश्यक रकमेच्या प्रदानासाठी हरवलेल्या अंतिम दिनांकापासून किंवा हप्ता प्रदान पर्यायांतर्गत आवश्यक रकमेच्या शेवटच्या हप्त्याच्या प्रदानासाठी विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत अर्जदाराला देईल आणि अर्जदाराची माफीच्या रकमेच्या मर्यादेपर्यंत त्याच्या दायित्वातून मुक्तता होईल.



६. अर्ज अधिनियमाच्या तरतुदीनुसार नसेल तर अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाते. जर तडजोड आदेशात चूक झाली, हे स्वतः हून किंवा अर्जदाराच्या अर्जावरून लक्षात आल्यावर तडजोड आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत अभिलेखातून उघड झालेली चूक दुरुस्त करता येईल. अर्जदारास ६० दिवसांच्या आत दुरुस्तीसाठी अर्ज करता येऊ शकतो. अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आल्याशिवाय त्याच्यावर प्रतिकूल परिणाम करणारा कोणताही आदेश पारित करण्यात येणार नाही.


७. या योजनेसंबंधातील तडजोडीचा आदेश हा त्यात अंतर्भूत असलेल्या थकबाकीच्या तडजोडीच्या बाबतीत निर्णायक असेल आणि तडजोडीच्या अशा आदेशातील कोणतीही बाब ही भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकाच्या विशिष्ट निरीक्षणांवरील कोणत्याही कार्यवाहीखेरीज, पुनर्विलोकनाच्या किंवा पुनर्परीक्षणाच्या इतर कोणत्याही कार्यवाहीत पुन्हा उघडण्यात येत नाही.

८. जर अर्जदाराने कोणतीही महत्त्वाची माहिती दडवून ठेवून किंवा चुकीची किंवा खोटी माहिती सादर करून तडजोडीचा लाभ मिळवला असल्याचे दिसून आले असेल वा झडती आणि जप्ती या कार्यवाहीत महत्त्वाची तथ्ये दडवून ठेवलेली किंवा तपशील लपवून ठेवला असल्याचे आढळून आले, तर त्याबाबतीत कारणे लेखी नमूद करून व अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर ज्या वित्तीय वर्षात तडजोडीचा आदेश बजावण्यात आला असेल, त्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून दोन वर्षांच्या कालावधीत कलम १३ च्या पोट कलम १ अन्वये काढलेला उक्त आदेश रद्द करता येईल.

९. जर तडजोडीचा आदेश रद्द करण्यात आला, तर तडजोडीच्या आदेशात समाविष्ट असलेले निर्धारणा पुनर्निर्धारणा, दुरुस्ती, पुनर्परीक्षण, पुनर्विलोकन हे ताबडतोब पुनरुज्जीवित किंवा पुनःस्थापित होईल. मात्र जर त्याची कालमर्यादा रद्द केल्याच्या आदेशाच्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत समाप्त झाली असेल, तर अशा आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत याबाबत कार्यवाही करण्यात येईल. याबाबतीत मूळ अपील संबंधित अपील प्राधिकाऱ्याकडे अर्ज केल्यावर पुनःस्थापित करण्यात येईल.

जुन्या कायद्याखालील थकबाकीतून व्यापाऱ्यांनी मुक्त व्हावे आणि आताच्या उद्योग व्यवसायावर लक्ष एकाग्र करावे, हाच या योजनेचा हेतू आहे. या योजनेला उद्योग व व्यापार क्षेत्राकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

(लेखिका या राज्यकर सहआयुक्त-३, पुणे येथे कार्यरत आहेत.)



# अण्णा भाऊ साठे
# यांच्या जयंतीनिमित्त विशेष...

**आपल्या राज्यातील स्वातंत्र्य चळवळ, गोवामुक्तीचा लढा आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ या चळवळींनी मराठी माणसाची अस्मिता जागी केली. या चळवळींमुळे सामान्य माणसांचा सार्वजनिक जीवनात सहभाग वाढला. अनेकजण नायक म्हणून पुढे आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की, 'नरकाच्या तळाशी राहणाऱ्यांचा स्वर स्वर्गीय असतो.' संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सांगली जिल्ह्यातील वाटेगावच्या अण्णा भाऊ साठे नावाच्या शाहिराचा स्वर्गीय स्वर राज्य, देश आणि परदेशाने देखील अनुभवला. ग्रामीण आणि शहरी भागात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा आशय पोहचवून लोकांना कृतिप्रवण बनवण्यात अण्णा भाऊ साठे यांनी दिलेले योगदान ऐतिहासिक आणि निर्णायक ठरले.**

# लोकनाट्य चळवळीची प्रेरणा

**डॉ. संजय थोरात**

संयुक्त महाराष्ट्राची मागणी या ना त्या प्रकारे अगदी लोकमान्य टिळकांपासून सुरू होती. भाषावार प्रांत रचनेला देशभर समर्थन होते. मराठी लेखक, नेते अधून-मधून मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र राज्याची मागणी करत होते. प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे, ग. त्र्यं. माडखोलकर, दत्तो वामन पोतदार, श्रीपाद शंकर नवरे, त्र्यं. वि. पर्वते आदी साहित्यिक मंडळी मराठी भाषिक राज्याचा आग्रह धरत होती. १९३८ साली स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झालेल्या साहित्य संमेलनात मुंबईसह महाराष्ट्राची मागणी करण्यात आली. १९४६ ला ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संमेलनातही एक भाषिक मराठी राज्याचा आग्रह धरण्यात आला. मात्र स्वातंत्र्यानंतर दार आयोग, जेव्हीपी समिती (जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, पट्टाभी सीतारामय्या) या आयोग आणि समित्यांचे अहवाल प्रतिकूल होते. स्वामी रामानंद तीर्थांनी तर १९४७ ला काँग्रेसच्या अधिवेशनात नेहरूंच्या उपस्थितीत मराठी राज्याचा आग्रह धरला होता. गुजरात आणि मुंबई या द्विभाषिक राज्याच्या प्रयोगाला मराठी माणूस कंटाळला होता. त्यातूनच मुंबई केंद्रशासित प्रदेश करावा अशाही हालचाली होत्या. फाजलअली आयोगही मुंबईसह महाराष्ट्र या मुद्द्याच्या विरोधात होता. १९५६ पासून मराठी माणसाचा उद्रेक रस्त्यावर आला. सेनापती बापट, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, क्रांतीसिंह नाना पाटील, आचार्य अत्रे, उद्धवराव पाटील, एस. एम. जोशी, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, माधवराव बागल, बी. टी. रणदिवे आदी नेत्यांच्या नेतृत्वाखाली सामान्य मराठी माणूस प्राणपणाने लढला. मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखालील सरकारने संयुक्त महाराष्ट्राची चळवळ मोडून काढण्यासाठी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला. आचार्य अत्रे व डॉ. आर. डी. भंडारे यांनी १९४९ मध्ये मुंबई महापालिकेत संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडला होता. व्यापक जनआंदोलनामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत १०५ जण हुतात्मा झाले. अनेकजणांनी तुरुंगवास पत्करला. सी.डी. देशमुखांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. सामान्य माणसांच्या या लोकलढ्यामुळे १ मे १९६० रोजी आपले महाराष्ट्र राज्य मुंबईसह अस्तित्वात आले.



### लेखक आणि शाहिरांचे योगदान

संयुक्त महाराष्ट्राचा हा लोकलढा उभारताना लेखक आणि शाहिरांचे योगदान देखील लढ्याच्या वातावरणनिर्मितीसाठी निर्णायक ठरले. सेनापती बापटांनी नाव सुचवलेला आचार्य अत्रे यांचा 'मराठा' गर्जत होता. 'मराठा'च्या पहिल्याच अंकाच्या २५ हजारांहून अधिक प्रती विकल्या गेल्या. 'मराठा तितुका मेळावा महाराष्ट्र धर्म वाढवावा' हे 'मराठा'चे ब्रीदवाक्य छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, लोकमान्य टिळक यांच्या चित्रांसह शिरोभागी छापलेले असे.. तर सेनापती बापट यांची,

'महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले
मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले
खरा वीर वैरी पराधीनतेचा
महाराष्ट्र आधार या भारताचा' अशी

गर्जना सुरू होती. अशा या भारावलेल्या वातावरणात श्रीपाद अमृत डांगे यांच्या नेतृत्वाखाली लोकशाहीर अण्णा भाऊ साठे देहभान विसरून सहभागी झाले. तळागाळातल्या सामान्य माणसाचे स्वप्न म्हणजे मराठी माणसाचे राज्य. हे पूर्ण करण्यासाठी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपली वाणी व लेखणी झिजवली.

## कष्टकऱ्यांचा आवाज

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत शाहीर आणि कलावंतांनी शहरी आणि ग्रामीण भागात मोठी लोकजागृती केली. उठाव केला. जनजागृतीसाठी तमाशा, लोकनाट्य, पोवाडे या माध्यमांचा वापर केला. अण्णा भाऊ साठे, द. ना. गव्हाणकर, अमर शेख, आत्माराम पाटील, पिराजीराव सरनाईक असे अनेक शाहीर डफाच्या तालावर गर्जत राहिले. शाहीर गजा भाऊ बेणी यांनी तर संयुक्त महाराष्ट्र झाल्याशिवाय लग्न नाही अशी घोषणाच केली होती. अण्णा भाऊ साठे तर 'इप्टा'चे राष्ट्रीय अध्यक्ष आणि जैविक बुद्धिवादी होते. अण्णा भाऊ साठे यांनी लेखणी, वाणी आणि डफाच्या जोरावर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत कष्टकऱ्यांचा आवाज बुलंद केला. ते राज्य आणि राज्याबाहेर प्रबोधनाचे वारे होऊन भिरभिरत राहिले. कम्युनिस्ट पक्षाने टिटवाळा येथे १९४४ ला शेतकरी परिषदेत पक्षाचा प्रचार आणि समाज प्रबोधनासाठी 'लाल बावटा' कलापथक स्थापन केले.

सांगली जिल्ह्यातील अण्णा भाऊ साठे, सोलापूर जिल्ह्यातील अमर शेख, कोल्हापूर जिल्ह्यातील द. ना. गव्हाणकर ही या 'लाल बावटा' कलापथकातील प्रमुख शाहीर मंडळी. श्रीपाद अमृत डांगे, आचार्य अत्रे, एस.एम.जोशी, बी.टी.रणदिवे आदी प्रमुख नेत्यांच्या सभा होण्याअगोदर या कलापथकाचा कार्यक्रम होई. नेते आली की, ही शाहीर मंडळी मिळेल त्या वाहनाने दुसऱ्या सभेच्या ठिकाणी रवाना होत. ध्वनिवर्धक असो किंवा नसो हजारो माणसांना साद घालीत. पंडित नेहरूंच्या रायगड दौऱ्याला विरोध करताना परिसरातील गावात आणि प्रत्यक्ष आंदोलनावेळी अण्णा भाऊ साठे आणि या सहकाऱ्यांचा डफ निनादत होता, तर वाणी गर्जत होती. शाहीर अमर शेखांनी नाशिकच्या डॉ. सुधीर फडके यांनी लिहिलेले, गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती हे गीत लोकप्रिय केले. शाहीर साबळेंनी तर आकाशवाणीवरील कार्यक्रमात महाराष्ट्र शब्द वापरला म्हणून आकाशवाणीने त्यांच्यावर बंदी आणली.

## 'लाल बावटा' कलापथक

१९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीच्या उमेदवारांना मिळालेल्या यशात या 'लाल बावटा' कलापथकाने केलेल्या वातावरणनिर्मितीचा वाटा होता. 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.' हे घोषवाक्य या शाहीर त्रिकुटाने शहरी व ग्रामीण भागात पोहचवले. अण्णा भाऊ साठे यांच्या 'माझी मैना' या गाण्याला द. ना. गव्हाणकर यांनी चाल दिली. ग.त्र्यं. माडखोलकर हे अमर शेखांना राष्ट्रीय शाहीर म्हणायचे. संयुक्त महाराष्ट्रासाठी दिल्लीत संसदेवर काढण्यात आलेल्या मोर्चात देखील हे लाल बावटा पथक अग्रभागी होते. रोझा देशपांडे यांच्या मते हे तिघेजण म्हणजे संयुक्त महाराष्ट्र समितीचा त्रिशूल होते. त्यांची गाणी आणि पोवाडे ऐकून महाराष्ट्र लढत राहिला. पोवाडा हे त्या काळात क्रांतीचे शस्त्र बनले होते. १९५० ते १९६० या दशकात लाल बावटा पथकाने पोलिसांची नजर चुकवत, बंदी हुकूम मोडत चळवळीचा प्रचार आणि प्रसार केला. सामान्य लोकांना कृतीप्रवण बनवून चळवळीत खेचून आणले.

या कलापथकाचे कॉम्रेड वा.वि.भट हे व्यवस्थापक होते. 'बंगालची हाक' हा पोवाडा तर थेट बंगालमध्ये सादर केला. या पोवाड्याचे बंगाली भाषेत भाषांतर झाले. समकालिनांनी अण्णा भाऊ साठे, गव्हाणकर, अमर शेख यांच्या अदाकारीने गाजलेल्या या 'लाला बावटा' कला पथकाचे कौतुक केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी कला पथकाच्या नागपूर येथील कार्यक्रमात जनतेच्या हितासाठी लढणाऱ्या शाहीर मंडळींचा गौरव केला. आचार्य अत्रे यांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित तयार केलेल्या चित्रपट प्रदर्शन प्रसंगी संत गाडगेबाबांनीदेखील शाहीरांच्या प्रबोधन कार्याचा गौरव केला. या लाल बावटा कला पथकाने मार्क्स, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा परिवर्तनवादी विचार शहर आणि गावगाड्यातील सामान्य लोकांपर्यंत पोहोचवला. चळवळीच्या माध्यमातून समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र होईल असा त्यांचा विश्वास होता. सामाजिक न्याय, समता, बंधुभाव ही मूल्ये रुजवताना सर्व प्रकारच्या विषमता आणि अन्यायाविरुद्ध अण्णा भाऊ साठे संघर्ष करत राहिले. अण्णा भाऊ साठेंच्या वाणीला आणि लेखणीला संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत

### लोकशाहीर म्हणून प्रसिद्ध

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे मूळचे सांगली जिल्ह्यातील वाटेगावचे. अवघा दीड दिवस शाळेत गेलेल्या अण्णांचे औपचारिक शिक्षण अत्यल्प होते. आपण आणि कुटुंबीयांच्या भुकेवर उपाय शोधण्यासाठी ते २२७ मैल पायी चालून माटुंगा लेबर कॅम्पमध्ये गिरणी कामगार चळवळ आणि श्रीपाद अमृत डांगे यांच्यासारख्या कम्युनिस्ट नेत्यांच्या संपर्कात आले. साम्यवाद्यांचे अभ्यासवर्ग आणि दुकानांवरील पाट्या आणि फलक वाचत ते लिहायला-वाचायला शिकले. अल्पशिक्षित अण्णा भाऊ साठे आपल्या वाणी व लेखणीच्या जोरावर संगीतरत्न, लोकशाहीर म्हणून देशभर प्रसिद्ध झाले.

समाजसुधारक, लोककवी, शाहीर म्हणून आपली ओळख ठळक करताना त्यांनी मार्क्सवादी व आंबेडकरवादी विचारधारेचा स्वीकार केला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाची सांस्कृतिक शाखा असलेल्या इंडियन पीपल्स थियटर असोशिएनमध्ये ते कार्यरत राहिले. त्यांनी १९५९ या वर्षी लिहिलेल्या 'फकिरा' या कादंबरीला १९६१ मध्ये राज्य सरकारचा उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला. ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीस अर्पण केली आहे. अण्णा भाऊ साठे यांनी कादंबऱ्या, लघुकथा संग्रह, पटकथा आणि पोवाडे लिहिले. त्यांच्या कथा कादंबऱ्यावर आधारित सात चित्रपट निघाले. त्यांच्या साहित्याचे २७ भाषांत भाषांतर झाले. ते रशियाला जाऊन आले. ते प्रवासवर्णन लिहिले.

बहर आला. चळवळीच्या प्रचारासाठी वगनाट्ये, पोवाडे, गाणी लिहिताना त्यांनी मराठी अस्मिता जागी केली. मुंबई शहरावर तर त्यांचे श्वासोच्छ्वासासारखे प्रेम होते. मुंबई त्यांचा प्राण होती, श्वास होती, निःश्वास होती. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर गण, पोवाडा लिहिला. महाराष्ट्रावरील आपले प्रेम व्यक्त करताना आणि मराठी परंपरा अधोरेखित करताना ते लिहून जातात,

'हे महाराष्ट्रा
ज्यांनी केली तुझी भक्ती झाली अजरामर कीर्ती
राजा शिवछत्रपती, टिळक, महात्मा फुले, ज्योती
आंबेडकर आले उदयाला पारतंत्र्य गेले विलयाला

त्यांनी 'महाराष्ट्राची परंपरा' हा सहा चौकांचा ऐतिहासिक पोवाडा लिहिला. मराठी भाषा, संस्कृती आणि इतिहासाचा गौरव करणारा हा पोवडा आजही मराठी मनावर रोमांच उभा करतो. त्यांच्या मते, मुंबई ही बहुजन कामगारांच्या तळहातावर, कष्टावर उभी आहे. 'अफाट नगरी, मुंबई भारी' नावाचे गीत त्यांनी लिहिले.' कथा मुंबईची' हे गाणे ही त्यांनी लिहिले.

## लोकशिक्षण व जनजागृती

अण्णा भाऊ साठेंनी घेतलेल्या भूमिकेमुळे त्यांना अनेकवेळा तुरुंगवास भोगावा लागला 'माझी मुंबई' हे त्यांचे लोकनाट्य चळवळीची प्रेरणा ठरले. तमाशावर शासकीय बंदी येताच त्यांनी तमाशाचे लोकनाट्यात रूपांतर केले. मनोरंजनातून लोकशिक्षण व जनजागृती करत त्यांनी संघर्ष केला. आपल्या गिरणी कामगार पोवड्यात ते कामगारांना आवाहन करतात,

'घे आण स्वातंत्र्याची
महाराष्ट्रास्तव लढण्याची
उपकार फेडूनी जन्मभूमीचे जाया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया'

छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा तर त्यांनी मास्को आकाशवाणीवर गायला. मुंबईबद्दल,

नाना भाषांची । अनंत जातीची
तूच मागशी । कशी हिला? या प्रश्नाला उत्तर देताना अण्णा भाऊ साठे लिहितात,

जशी गरुडाला पंख । आणि वाघाला नख ।
तशी ही मुंबई । मराठी मुलखाला'

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अण्णा भाऊ साठेंची, 'माझी मैना गावाकडे राहिली' ही छक्कड गाजली. वरकरणी ही लावणी पती-पत्नीमधील विरहकथा आहे असे वाटते. पण रूपकात्मक आहे. मैना म्हणजे बेळगाव कारवारचा अजूनही महाराष्ट्रात न आलेला प्रदेश. लावणीचा शेवट,

'आता वळू नका । रति पळू नका । कुणी चळू नका
बिनी मारायची अजून ऱ्हायली । माझ्या जिवनाची होतिया काहिली' सरळ सरळ बेळगांवसाठी एकजुटीने संघर्ष करू या असे आवाहन आहे. 'महाराष्ट्राची परंपरा' 'उठला मराठी देश' या पोवाड्यात' घडवी मऱ्हाठा या महाराष्ट्रा' ध्रुपद आहे. वसंत बापट, कुसुमाग्रज, ग. दि. माडगूळकर, सुरेश भट या कवींच्या जणू खांद्याला खांदा लावून अण्णा भाऊ साठे व शाहीर अमर शेख ही जोडगोळी संयुक्त महाराष्ट्रासाठी लढत होती. अण्णा भाऊ साठेंनी 'अफाट नगरी मुंबई भारी' 'उठला मराठी देश' 'कथा मुंबईची' 'धनी कोण या मुंबईला?' 'घडवी मऱ्हाठा या महाराष्ट्रा' 'महाराष्ट्र देशा आमच्या' 'महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळूनी काया' 'मुंबईची लावणी' 'संयुक्त महाराष्ट्र येतसे पाहा' अशी अनेक गीते लिहिली. 'माझी मैना'प्रमाणेच अण्णा भाऊ साठे यांचे 'माझी मुंबई अर्थात मुंबई कोणाची?' हे लोकनाट्य जणू आंदोलनाचे घोषवाक्य आणि प्रतीक बनले होते. बाळकू, अंतू, गणू, विष्णू ही मराठमोळी पात्रे मुनीमजी आणि लाडोबाबरोबर चर्चा करतात. छोट्या, छोट्या आणि खटकेबाज संवादातून आणि गीतातून हे वगनाट्य फुलत राहते. यातील विष्णू या पात्राची भूमिका अण्णा भाऊ साठे स्वतः करत. मैना आणि हे लोकनाट्य सादर करायला सरकारने बंदी घातली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मंत्र जणू थोडक्यात सांगताना अण्णा भाऊ साठे लिहितात, 'जग बदल घालूनी घाव, सांगून गेले मजला भीमराव..'

## ऐतिहासिक कार्य

अण्णा भाऊ साठे यांच्या पोवाडा सादरीकरण व लेखनामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला मोठी ऊर्जा मिळाली. मार्क्सवादी पक्षाचे ते सक्रिय कार्यकर्ते होते. शहर आणि ग्रामीण भागांपर्यंत संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा आशय आणि विचार पोहोचवण्याचे मोलाचे ऐतिहासिक कार्य अण्णा भाऊ साठेंनी, अमर शेख व गव्हाणकर या आपल्या सहकाऱ्यांच्या साथीने केले. त्यांच्यामुळे मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी अस्मिता याबद्दल व्यापक सामूहिक आत्मभान निर्माण झाले. सामान्य माणसे रस्त्यावर उतरली. कृतिप्रवण बनली. तुरुंगवास भोगायला तयार झाली. हसत हसत मरणाला सामोरी गेली. सामान्य कामगार आणि गोरगरीब व जनतेचा लढ्यात सक्रिय सहभाग राहिला. अर्थात ही वातावरणनिर्मिती करताना अण्णा भाऊ साठेंचे लेखन हे केवळ प्रचारकी नाही. भारतीय परंपरेत वैदिक आणि अवैदिक अशा दोन परंपरा आहेत. अण्णा भाऊ साठेंचे लेखन बुद्धांपासून कार्यरत असलेल्या अवैदिक परंपरेचे समर्थन करते. सामान्य माणसाला कळेल असे सामान्य माणसाच्या भाषेतील लेखन त्यांनी केले. 'मी फकिराच्या लुटीच्या पैशातून गुटी प्यायलेला कलावंत आहे' असे सांगणारे अण्णा भाऊ साठे व्यवस्थेविरुद्ध सातत्याने बंडखोरी करत होते. बहुजन आणि कामगारवर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करत होते. त्यांच्यावर कालमार्क्स, लेनिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीपाद अमृत डांगे यांचा वैचारिक प्रभाव होता. साहित्यरत्न, संगीतरत्न, लोकशाहीर या उपाध्या त्यांची मूल्यात्मक आणि वास्तववादी विचारधारा अधोरेखित करतात. संयुक्त महाराष्ट्राचा संघर्ष हा प्रादेशिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आहे, याची त्यांना जाणीव होती. 'समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र' हा समितीचा नारा होता. आपल्या पोटतिडिकीच्या पहाडी आवाजातून त्यांनी सरकार आणि व्यवस्थेला धारेवर धरले. थोडक्यात संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अण्णा भाऊ साठे हे मानवता धर्माचे गीत गात होते.


**(लेखक हे ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

**सामाजिकदृष्ट्या उपेक्षित, बहुजन, पीडितांच्या व्यथा वेदनांना मराठी साहित्यात प्रभावीपणे मांडण्याचे काम अण्णा भाऊ साठे यांनी केले आहे. सामान्य दलित माणूस हा त्यांच्या साहित्याचा विषय होता.**

# सत्यशोधक अण्णा भाऊ साठे

**डॉ. विजय चोरमारे**

अण्णा भाऊ साठे यांना नेमके काय विशेषण लावायचे असा अनेकांना प्रश्न पडतो. कुणी त्यांना लोकशाहीर म्हणते. कुणी साहित्य सम्राट म्हणते. कुणी साहित्यिक म्हणते. कुणी कॉम्रेड म्हणते. कुणी मातंगभूषण म्हणते. अनेक घटक आपापल्या सोयीचं विशेषण लावून अण्णा भाऊ साठे आपले असल्याचा दावा करतात. यातून त्यांचे अण्णा भाऊ साठे यांच्याविषयीचे प्रेम दिसून येत असले तरी आपण अण्णा भाऊ साठे यांना संकुचित करतोय हे त्यांच्या लक्षात येत नाही. कारण अण्णा भाऊ साठे अशा कोणत्याही एका विशेषणात बसणारे नव्हते. अवघा दीड दिवस शाळेत गेलेला आणि आयुष्यभर खस्ता खाल्लेला, जगण्यासाठी संघर्ष केलेला माणूस किती क्षेत्रांत उत्तुंग कामगिरी करू करतो, याचे उदाहरण म्हणून अण्णा भाऊ साठे यांच्याकडे पाहता येते. म्हणूनच सगळ्या विशेषणांच्या पलीकडे जाऊन अण्णा भाऊ साठे यांना सत्यशोधक म्हणणे अधिक सयुक्तिक ठरते.



## प्रतिभावंत साहित्यिक

अण्णा भाऊ साठे कादंबरीकार, कथाकार आणि कवी तसेच शाहीर होते. कथा - कादंबरी, नाटक याबरोबरबरीनेच त्यांनी लावण्या, पोवाडे, लोकनाट्ये रचली. शेतकरी, कामगार, मजूर आणि स्त्रिया हे घटक त्यांच्या साहित्यनिर्मितीच्या केंद्रस्थानी होते. त्यांच्या साहित्यातील नायकांकडे बघितले, तर त्याजागी खेड्यापाड्यातला, शहरी गरीब वस्त्यांतला दुबळा, नागवला गेलेला सामान्य माणूस असल्याचे दिसून येईल. त्यांच्या साहित्यातल्या स्त्रिया पुरुषांवर प्रेम करणाऱ्या असल्या तरी प्रसंगी पुरुषी वर्चस्वाचे जोखड झुगारून स्वतंत्रपणे उभ्या राहणाऱ्या आहेत. लढणाऱ्या आहेत. अशी स्वतंत्र बाजाची स्त्री साहित्याची नायिका उभी करणे, यातून अण्णा भाऊ साठे यांची जीवनदृष्टी दिसून येते. वास्तव हाच साहित्यनिर्मितीचा मूलाधार असला पाहिजे, त्यात कल्पनेला थारा असता कामा नये ही त्यांची साहित्यनिर्मितीमागील भूमिका होती. अण्णा भाऊ साठे हे समाजपरिवर्तनाचे शस्त्र हाती घेऊन लेखन करणारे साहित्यिक होते. सर्वसामान्य कष्टकरी, वंचित आणि धर्मव्यवस्थेने ज्यांचे माणूसपण नाकारले होते, असे सर्व घटक अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांच्या केंद्रस्थानी होते. अण्णा भाऊ साठे यांची बांधिलकी त्यांच्याशीच होती. अण्णा भाऊ साठे केवळ कसबी कलावंत नव्हते, किंवा साहित्यातून कलात्मक उंची गाठण्यासाठी कसरती करणारे साहित्यिक नव्हते. माणूस हा त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी होता आणि त्यांना माणसाविषयी प्रचंड आत्मीयता होती, आस्था होती. सामान्य माणसाच्या ठायी असणाऱ्या अचाट शक्तीबद्दल त्यांना खात्री वाटत होती, म्हणूनच ते 'ही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर तरली नसून ती कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे', असे १९५८च्या पहिल्या बहुजन साहित्य संमेलन उद्घाटनाच्या भाषणात म्हणाले होते. दोन मार्च १९५८ला झालेल्या या संमेलनाचे उद्घाटन आचार्य अत्रे यांच्या हस्ते होणार होते. आचार्य अत्रे यांचे येणे आयत्या वेळी रहित झाले. त्यामुळे उद्घाटनाची जबाबदारी अण्णा भाऊ साठे यांच्यावर आली. त्यावेळी केलेल्या भाषणातील त्यांच्या या विधानाने मराठी समाजाला एक क्रांतिसूत्र दिले. श्रमिक कष्टकऱ्यांच्या कष्टाची गाथा एका वाक्यात अण्णा भाऊ साठे यांनी रचली. या दुनियेची निर्मिती कुण्या स्वर्गातल्या देवाने केली नाही, तर ती माणसाने घडवली आहे, हे अण्णा भाऊ साठे मोठ्या आत्मविश्वासाने सांगत; त्यामागेही त्यांची तीच धारणा होती.

अण्णा भाऊ साठे इस्लामपूरजवळच्या वाटेगावचे. पुणे-कोल्हापूर महामार्गावर कराडच्या पुढे कासेगाव लागते. कोल्हापूरच्या दिशेने येताना कासेगावजवळ उजव्या हाताला वळले की, तो रस्ता वाटेगावला जातो. महामार्गापासून चार किलोमीटरच्या अंतरावर वाटेगाव आहे. शौर्याचा, पराक्रमाचा आणि स्वामीनिष्ठेचा वारसा लाभलेल्या मातंग म्हणजे मांग जातीत १ ऑगस्ट १९२० रोजी अण्णा भाऊ साठे यांचा जन्म झाला. १८ जुलै १९६९ रोजी मुंबईत त्यांचा मृत्यू झाला. तुकाराम हे त्यांचे मूळ नाव. भाऊ हे त्यांच्या वडिलांचे नाव, ते नाव अण्णा नावाशी जोडले गेले आणि ते पुढे अण्णा भाऊ या नावाने परिचित झाले. अण्णा भाऊ साठे अवघा दीड दिवस शाळेत गेले होते. अशा या लेखकाने ३७ कादंबऱ्या, १९ कथासंग्रह, १४ लोकनाट्ये, ११ पोवाडे, तीन नाटके, शेकडो गाणी, लावण्या-छकडी असे विपुल साहित्य निर्माण केले.

## वैचारिक घडण आणि कामगार चळवळ

अण्णा भाऊ साठे वाटेगावातून मुंबईत आल्यावर त्यांनी अनेक कष्टाची कामे केली. लहान पोऱ्या म्हणून कापड गिरणीत काम केले. १९३४ मध्ये मुंबईत लाल बावट्याच्या नेतृत्वाखाली जो ऐतिहासिक संप झाला, त्या संपात ते कामगार म्हणून सहभागी होते. त्या संपाच्या काळात शिवडीत कामगार व पोलिसांत जी झटापट, चकमक झाली त्याचे ते प्रत्यक्ष साक्षीदार होते. गिरणी कामगार लढ्यातील शहीद परशुराम जाधव यांच्या स्मृतिदिनी म्हणजे २३ एप्रिल १९३४ला तो संप सुरू झाला होता. परशुराम जाधवांचे पोस्टर गिरणी गेटवर लावले होते. त्यातून अण्णा भाऊ साठे कामगार चळवळीकडे आकर्षित झाले. १९३५-३६च्या काळात धारावीजवळील 'माटुंगा लेबर कॅम्प' या

कामगारांच्या झोपडपट्टीवजा वस्तीत राहायला गेले. त्यावेळी त्यांचा कम्युनिस्ट चळवळीशी संबंध आला. बांधकाम कामगार, महापालिका कामगार, रेल्वे कामगार झोपड्या करून तेथे राहत असत. तेव्हा तेथील बांधकाम कामगारांना संघटित करून युनियन बांधण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील महाड चवदार तळ्याच्या लढ्याचे प्रमुख संघटक कॉ. आर. बी. मोरे करीत होते. त्यांच्या आणि त्यांच्यासोबत युनियनचे काम करणाऱ्या कॉ. के. एम. साळवी यांच्या संपर्कात अण्णा भाऊ साठे आले. त्या काळात कामगार चळवळीतील कार्यकर्त्यांची वैचारिक जागृती वाढवण्यासाठी कॉ. आर. बी. मोरे, कॉ. बी. टी. रणदिवे हे कम्युनिस्ट पक्षातर्फे कामगार अभ्यासवर्ग (स्टडी सर्कल) घेत असत. अण्णाभाऊही त्या अभ्यासवर्गाला हजेरी लावू लागले. त्यांनी रशियन क्रांतीचा इतिहास, लेनिन चरित्र, मॅक्झिम गॉर्कीची 'आई' कादंबरी आदींचे वाचन केले. त्यातूनच अण्णा भाऊ साठे यांची राजकीय-सामाजिक वैचारिक घडण होत गेली. कॉ. आर. बी. मोरेंच्या मार्गदर्शनाखाली कॉ. के. एम. साळवींच्या सहकार्याने अण्णा भाऊ साठे यांनी माटुंगा लेबर कॅम्पमध्ये 'दलित युवक संघ' या तरुणांच्या संघटनेची स्थापना केली. बेरोजगार तरुणांना संघटित करून त्यांना राजकीय-सामाजिक चळवळीत सक्रिय करण्याचा प्रयत्न केला. कम्युनिस्ट पक्षाच्या, कामगार चळवळीच्या लढ्यात सक्रियपणे सहभाग घेण्यास तिथूनच त्यांची सुरुवात झाली. १९३६-३७च्या दरम्यान अण्णाभाऊ कम्युनिस्ट पक्षाचे अधिकृत सभासद बनले व पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते म्हणून काम करू लागले. कम्युनिस्ट पक्षातील लेबर कॅम्पमधील कार्यकर्त्यांच्या आग्रहावरून त्यांनी तेव्हाच्या लेबर कॅम्पमधील मच्छरांवर पहिले गाणे लिहिले. तेव्हा लेबर कॅम्पमध्ये राहणारे कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते कॉ. शंकर नारायण पगारे यांच्या पुढाकाराने अण्णा भाऊ साठे यांना घेऊन कम्युनिस्टांचे कलापथक उभे राहिले. तो काळ राजकीय स्वातंत्र्याने प्रेरित झालेला होता. त्यामुळे १९३८ ते १९४२ या काळात अण्णा भाऊ साठे यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याबरोबर काम केले. त्यामुळे १९४२च्या आंदोलनात अंगावर वॉरंट घेऊनच ते परत मुंबईला आले. शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर आणि अण्णा भाऊ साठे यांनी मिळून १९४४ साली लाल बावटा कलापथक सुरू केले. शाहीर अमर शेख यांचा पहाडी आवाज, गव्हाणकरांचा अभिनय आणि अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरी रचना या माध्यमातून सारा महाराष्ट्र त्यांनी पिंजून काढला. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील अण्णा भाऊ साठे यांचे योगदान त्यामुळेच मोठे मानले जाते.

## लोककलेतून मांडणी

लालबावटा कलापथकातील कार्यक्रमासाठी अण्णा भाऊंनी शाहिरीचा पारंपरिक बाज स्वीकारला, पण तिचे अंतरंग आमूलाग्र बदलले. त्यांच्या शाहिरीत आधुनिकता होती. सत्यशोधक जलसे, आंबेडकरी जलसे, राष्ट्रसेवा दलाची कलापथके या परंपरेतील त्यांची शाहिरी होती. प्रयोगरूप लोककलेची सुरुवात गण गाऊन केली जात असे. अण्णा भाऊ साठे यांनी ती प्रथा बंद केली आणि त्याजागी मायभूमी, हुतात्मे, शूरवीर, महापुरुष यांचे नमन करून त्यांचे स्तुतिगान सुरू केले. पारंपरिक तमाशात गणानंतर गौळण सादर केली जाई. 'लालबावटा'ने गौळणीला फाटा दिला, अण्णा भाऊ साठे यांनी पारंपरिक लावणीचा आशयही बदलला. पारंपरिक शृंगारिक लावणीला अण्णा भाऊंनी सामाजिक आशय दिला. ती समतेचा विचार मांडू लागली. 'मुंबईची लावणी' हे त्याचे जिवंत उदाहरण. 'माझी मैना गावावर राहिली, माझ्या जिवाची होतीयो काहिली' ही त्यांची लावणी लोकप्रिय आहे. मुंबईला जाताना आपल्या कारभारणीचा निरोप घेताना होणारी मानसिक घालमेल जशी या लावणीतून प्रकट झाली, त्याचप्रमाणे बेळगाव, हुबळी, धारवाड, बिदर, भालकी, कारवार हा भाग महाराष्ट्रापासून वेगळा झाला, याची खंत त्यांनी या लावणीमधून व्यक्त केली आहे. पारंपरिक तमाशात वग असतो, तशी अण्णा भाऊ साठे यांनी लोकनाट्ये लिहिली. लोकनाट्य ही संज्ञा सर्वप्रथम अण्णा भाऊंनीच वापरली. त्याअर्थाने विचार केला, तर अण्णा भाऊ साठे यांच्या निधनानंतरच्या गेल्या ५० वर्षांमध्ये या प्रमुख लोकप्रकारांना काही नवी जाणीव देण्याचे प्रयत्न अजिबात झाले नाहीत.

## गावगाड्याबाहेरील लेखक

लहानपणी अण्णा भाऊ साठे यांनी वाटेगावाच्या परिसरातील अन्याय अत्याचाराच्या, इंग्रजांच्या अमानुष छळाच्या घटना प्रत्यक्ष पाहिल्या, ऐकल्या होत्या. इंग्रजांच्या विरोधात बेरड-मांग-रामोशी यांनी केलेल्या संघर्षकथा त्यांच्या कानावर सतत पडत होत्या. धनदांडग्यांकडून गरीब दुबळ्या लोकांची होत असलेली पिळवणूक ते पाहत होते. शेतावर राबणाऱ्या, मोलमजुरी करणाऱ्या स्त्रियांचे गावगाड्यात होत असलेले शोषण ते बघत होते. गावाच्या राजकारणात गोरगरिबांची होणारी कुचंबणा आणि पिळवणूक ते पाहत होते. आणि हीच लेखक म्हणून भावी आयुष्यातील त्यांची सामग्री ठरली. अण्णा भाऊ साठे यांनी गावगाड्यातील सगळे लेखक म्हणून कवेत घेतलेच, परंतु गावगाड्याबाहेरचे भटक्या विमुक्तांचे जगणेही त्यांनी मराठी साहित्यात आणले. गारुडी, माकडवाले, गोपाळ, कोल्हाटी अशा कितीतरी घटकांचे जगणे त्यांनी साहित्यात आणले.


## कार्यकर्तृत्वाचा जागर

अण्णा भाऊ साठे साहित्यिक होते आणि थेट समाजात, चळवळीत, आंदोलनात वावरत होते. त्यामुळे त्यांचे साहित्य आणि जगणे यात फारसे अंतर नव्हते. किंबहुना साहित्यिकांनी कोणत्याही प्रश्नावर भूमिका घ्यायची असते म्हणजे काय करायचे असते, ते अण्णा भाऊ साठे यांच्या कारकिर्दीकडे पाहून लक्षात येते. अण्णा भाऊ साठे प्रचलित शिक्षण व्यवस्थेच्या संस्कारांपासून लांब होते त्यामुळे सुशिक्षितांचा बनचुकेपणा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आला नव्हता. कातडी बचावूपणा आला नव्हता. पलायनवादी भूमिका आली नव्हती. म्हणूच कोणतीही गोष्ट ते झोकून करत होते. समरसून करत होते. त्याचमुळे त्यांच्या जन्मानंतर १०० वर्षे उलटून गेल्यावर आणि मृत्यूनंतर ५० वर्षे उलटून गेल्यावरही त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा जागर केला जातो.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

**भारतात १९वे शतक हे प्रबोधनाचे शतक मानले जाते. भाऊ महाजन, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, आगरकर, कर्वे, महात्मा जोतिराव फुले अशा किती तरी समाजसुधारकांनी प्रबोधकांची भूमिका पार पाडली. लोकहितवादी म्हणतात, ‘लोकांस त्यांची वास्तविक स्थिती कशी आहे ती कळावी, त्यांनी सुधारावे, त्यास इहलोकी सुखवृद्धी व्हावी आपले बहुत काळापासून दृढग्रह झाले आहेत. त्यापैकी काही अविचाराने व काही मूर्खपणाने जडलेले आहेत ते कमी व्हावेत, किंवा नाहीसे व्हावेत, इतक्याच हेतूने मी यथामतीने व स्वइच्छेने वेतनावाचून श्रम केले आहेत.’ यावरून प्रबोधन कशासाठी असते हे समजून येते. २०व्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ही भूमिका पार पाडली. याच भूमिकेतून अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य वावरत होते. त्यांच्या साहित्यातील प्रबोधनाची नेमकी दिशा समजून घेणे आवश्यक आहे.**

# प्रबोधनाची दिशा



**प्रा. डॉ. गिरीश मोरे**

अण्णा भाऊ साठे हे आंतरराष्ट्रीय लेखक होते. त्यांचे साहित्य महाराष्ट्रासह भारत आणि जगभर पोहोचले आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या सुख-दुःखांवर त्यांनी लिहिले म्हणून ते मराठी लेखक ठरतात. भारतातील समस्या त्यांनी साहित्यात मांडल्या म्हणून ते भारतीय लेखक ठरतात. त्यांचे साहित्य रशियनसह अनेक भाषांत गेले, त्यांनी भारताबाहेरील लोकांचे जीवन साहित्यात मांडले. त्यामुळे ते आंतरराष्ट्रीय लेखक ठरतात.

१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे अण्णा भाऊ साठे यांचा जन्म झाला. ११व्या वर्षी त्यांनी वडिलांसोबत वाटेगाव ते मुंबई असा पायी प्रवास केला. बालकामगार म्हणून काम केले. मुंबईत मार्तंड खंडोबा भगत यांच्याबरोबर डोक्यावर पेटी घेऊन कपडे विकत फिरले. नातेवाईक ज्ञानूच्या साहाय्याने वाचायला शिकले. दुकानावरच्या पाट्या वाचल्या. गिरणीत काम केले. गाणे म्हणत म्हणत गाणी आणि पोवाडे रचले. कथा, कविता, कादंबऱ्या आणि लोकनाट्ये लिहिली. रशियाला जाऊन आले. १८ जुलै १९६९ रोजी त्यांनी जगाचा निरोप घेतला. जेमतेम ४९ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी साहित्याच्या माध्यमातून प्रबोधनाचे कार्य केले.

## साहित्यातील शिकवण

साधारणतः १९४१-४२ पासून अण्णा भाऊ साठे लिहीत होते. हा काळ पारतंत्र्याचा होता. स्वकीय आणि परकीयांच्या गुलामीत माणसे जगत होती. कामगार आणि स्त्रियांचे शोषण होत होते. देशाला स्वातंत्र्य मिळाले तरीही माणूस समस्यामुक्त नव्हता. या काळातही अण्णा भाऊ साठे लिहीत होते. लेखणी आणि वाणीच्या आधारे ते लोकांना जागृत करत होते. त्यांच्या साहित्यात व्यक्त झालेली शिकवण समजून घेतली पाहिजे.

## व्यापक दृष्टी

मानवाचा एकूणच व्यवहार हा स्वार्थी आणि कप्पेबंद आहे. संकुचितपणा वाढत चालला आहे. वेगवेगळे वर्ग, समाजातील प्रस्थापित गट परस्परांवर आघात करत आहेत. एकमेकांचे शोषण करत आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जर्मनीने रशियावर हल्ला केला. हिटलरची हुकूमशाही वाढत होती. युरोपमधल्या रशियाला त्रास होतोय, जपानची शहरे उद्ध्वस्त होत आहेत, अशा वेळी आपण मात्र सुरक्षित आहोत ही संकुचित भूमिका अनेक देश स्वीकारत होते. अण्णा भाऊ साठे ही संकुचित प्रवृत्ती भेदून’ स्टॅलिनग्राडचा पोवाडा’ लिहितात.

हिटलरच्या नाझी फौजा जुलूम करतात तेव्हा रशियन लाल सेना प्रतिकार करते. स्टॅलिनग्राड हे शहर आपल्या शौर्याने आणि पराक्रमाने वाचवते. अण्णा भाऊ साठे या विजयी झुंजीचे वर्णन करताना म्हणतात,

*‘धावून जाई नाझीवर । रशियाचा लाल झुंजार ।*
*प्रतिक्रांतीचा भस्मासूर । गारद कराया पार ।’*

‘नानकीन नगरापुढे’, ‘बर्लिनचा पोवाडा’ या रचनांमध्येही अण्णा भाऊ साठे यांनी आंतरराष्ट्रीय प्रश्न मांडले आहेत. हे पोवाडे माणसांना शिकवतात की, हुकूमशाही संपली पाहिजे, एकाधिकार संपला पाहिजे. सबंध विश्वातील माणूस हा एकमेकांचा सखा-सोबती आहे, त्यांचे दुःख आपले आहे, ही विश्वबंधुत्वाची प्रेरणा हे पोवाडे देतात. ही व्यापक दृष्टी त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत आढळते.

तत्कालीन साहित्यव्यवहार हा कप्पेबंद होता. मराठी साहित्यात भटक्या विमुक्त, कामगार बहुजन यांचे जीवन आढळत नव्हते. स्त्री हीसुद्धा माणूस आहे, ती केवळ उपभोगाची वस्तू नाही याविषयी लिहिले जात नव्हते. अण्णा भाऊ साठे यांनी अतिशय व्यापक होऊन, जात, धर्म, लिंग आणि प्रदेश यांच्या मर्यादा ओलांडून साहित्यात समाजजीवन मांडले. त्यांच्या साहित्यात बहुजन, भटके विमुक्त, कामगार, शेतकरी, अठरापगड जाती जमातीची माणसे, उच्चवर्णीय स्त्रिया आणि पुरुष अशा व्यक्तींना स्थान मिळाले आहे.

बंगालमध्ये दुष्काळ पडला होता. अन्नपाण्यावाचून माणसे मरत होती. त्यांच्या मदतीला चला हे सांगण्यासाठी अण्णा भाऊ साठे यांनी ‘बंगालची हाक’ हा पोवाडा लिहिला. हिंदू-मुस्लिमांची दंगल ही देशाला घातक आहे, हे सांगण्यासाठी ‘पंजाब-दिल्लीचा दंगा’ हा पोवाडा लिहिला. गोवामुक्तीचा विचार मांडण्यासाठी ‘गोव्याकडे चला’ हा पोवाडा लिहिला. यातून त्यांची व्यापक दृष्टी लक्षात येते.

महाराष्ट्र, महाराष्ट्रातील सर्व माणसे आणि मराठी भाषा याविषयी अण्णा भाऊ साठे यांना अपार अभिमान होता. महाराष्ट्र हा मराठी भाषिकांचा, संत महंतांचा, ज्ञानवंतांचा,

## महिलांचा सन्मान

भारतासह जगभरात स्त्रीला दुय्यम लेखले गेले होते. १७७६ मध्ये फ्रान्समधील सोफी जर्मन या स्त्रीला गणिताची आवड होती. ती स्त्री आहे म्हणून एका संस्थेत तिला प्रवेश मिळाला नव्हता. भारतातील वास्तव यापेक्षा भयंकर होते. स्त्रीने शिक्षण घेणे हे पाप समजले जात होते. आई होऊन मुलांचे संगोपन करणे एवढाच तिला अधिकार होता. निर्णयप्रक्रियेत तिला कुठेच स्थान नव्हते. अण्णा भाऊ साठे यांनी साहित्यात स्त्रीला सन्मानाचे स्थान दिले.

अण्णा भाऊ साठे यांची 'आवडी' (१९६३) या कादंबरीतील आवडी ही सामाजिक बंधनाविरुद्ध बंड करते. तिचा जन्म गावात मात्तबर असलेल्या रघू चौगुल्याच्या घरात होतो. तिचे लग्न बोरगावचा भगवान पाटील आपल्या मुलाबरोबर लावून देतो. आपल्या नवऱ्याला फेफरं येते हे लग्नानंतर आवडीला कळते. आपली फसवणूक झाल्याचे तिच्या लक्षात येते. यातून ती सुटका करून घेते. गावकामगार म्हणून घरी येणाऱ्या धनाजी रामोशावर ती प्रेम करते. ती त्याच्या घरात घुसते. तोही तिच्यावर मनापासून प्रेम करतो. आपली फसवणूक होताच त्याविरुद्ध बंड करणारी आवडी अण्णा भाऊ साठे यांनी चित्रित केली आहे.

'चित्रा' (१९५१) या कादंबरीतील चित्रा वेश्या जीवन नाकारून कामगार चळवळीत काम करणाऱ्या मित्राबरोबर लग्न करते. 'वारणेच्या खोऱ्यात' (१९५१) मधील मंगला देशद्रोही नागोजीबरोबर ठरलेला विवाह नाकारून देशावर प्रेम करणाऱ्या हिंदुरावांबरोबर लग्न करते. 'वैजयंता' (१९५९) मधील वैजयंता तमाशा कलावंताचे जीवन नाकारून उमाबरोबर लग्न करते. 'बरबाद्या कंजारी' या कथेतील निल्ली रोगी नवरा मरताच वैधव्याचे जीवन नाकारून हैदऱ्याबरोबर पळून जाते. 'आबी' कादंबरीतील आबी दरोडेखोराबरोबर झालेला विवाह नाकारून माहेरी येते.

यावरून लक्षात येते की, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्रिया परंपरेने लादलेले जीवन नाकारणाऱ्या आहेत. जात आणि धर्माची खोटी बंधने झुगारून देणाऱ्या आहेत. अशावेळी संघर्ष करण्यास त्या मागेपुढे पाहत नाहीत. त्या सन्मानाचे जीवन जगू पाहणाऱ्या आहेत. आपल्या चारित्र्याचे रक्षण करणाऱ्या आहेत. पुरुषी व्यवस्था नाकारणाऱ्या आहेत. त्यामुळे अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे स्त्रियांना सन्मान देण्याची शिकवण देते.

नररत्नांचा, मावळ्यांचा, मराठी मनाचा आहे. इथल्या पंचगंगा, कोयना, कृष्णा, वारणा, गोदावरी या नद्या महाराष्ट्राला शांत करतात, त्याची तहान भागवतात. असे असले तरी हे राज्य आमचे आहे असा संकुचित विचार करणाऱ्यांना ते म्हणतात,

*'ही अवनी आदिवाशांची । कोळी भिल्लांची । मांग रामोशांची ।*
*कैक जातींची प्राणाहुनी प्यार । परंपरा ज्यांची असे अपार ।'*

म्हणजे कोणा एका समूहाने महाराष्ट्र भूमीवर हक्क सांगू नये, या भूमीतील प्रत्येकास जगण्याचा अधिकार आहे, हे व्यापकत्व त्यांनी दाखवून दिले. याच पोवाड्यात त्यांनी मराठी भाषेवरचे प्रेम व्यक्त केले आहे. संस्कृत भाषेच्या ज्ञानवंतांनी अन्याय करून मराठी भाषेला दडपून टाकले आहे, तिला कमजोर केले आहे. तिला कोणीही हीन मानू नये. तिच्यातून इतिहास, पुराणे आणि वेद कळले पाहिजेत असे त्यांना वाटते. त्यामुळे ज्ञानेश्वरांनी भगवद्गीता मराठीत आणली हा मराठी भाषेविषयीचा अभिमान ते व्यक्त करतात.

मराठी भाषा आणि मराठी माणसांचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. अठरापगड जाती जमातीच्या माणसांचा मिळून महाराष्ट्र बनला आहे, असे सांगितले. बंगालच्या दुष्काळात मदतीला जाण्याचे आवाहन केले. गोवामुक्तीचा विचार मांडला. हिंदू - मुस्लीम दंगल टाळण्यास सांगितले. स्टॅलिनग्राड, नानकिन आणि बर्लिन येथील समस्या मांडून हुकूमशाही प्रवृत्तीचा निषेध केला. यातून अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे व्यापक दृष्टी धारण करण्याची शिकवण देत होते हे लक्षात येते.

## अंधश्रद्धेतून बाहेर पडण्याची शिकवण

आज अंधश्रद्धा नाही असे छातीठोकपणे सांगता येत नाही. शिक्षण सर्वदूर पसरूनही अंधश्रद्धा बाळगली जाते. अण्णा भाऊ साठे यांच्या काळात तर ती अधिक होती. पाप-पुण्याची धारणा होती. भुताखेतांवर विश्वास होता. कर्मकांड पाळले जात होते. अण्णा भाऊ साठे यांनी कथा, कादंबऱ्या आणि कविता लिहून लोकांना अंधश्रद्धेतून बाहेर पडण्याची शिकवण दिली.

कोरोनासारख्या महामारीत अनेक माणसे मृत्युमुखी पडली. यामागे ईश्वरी कोप आहे असे कित्येकांना वाटत होते. त्यामागचे वैज्ञानिक कारण कळल्यामुळे उपचार सुरू झाले आणि संकट टळले. अण्णा भाऊंच्या काळातही प्लेगसारखी महामारी आली होती. या पार्श्वभूमीवर अण्णा भाऊंनी 'मरीआईचा गाडा' ही कथा लिहिली.

गावात प्लेगची साथ येते. माणसे मरू लागतात. मरीआईच्या कोपामुळे ती गावात शिरली आहे असे गावाला वाटते. मरीआईचा गाडा बनवून तो वेशीबाहेर सोडण्याचा निर्णय लोक घेतात. त्यामुळे महामारी संपेल, असा लोकांचा अंधविश्वास असतो. या प्रथेला नाना पाटील विरोध करतात. मरीआईमुळे रोगराई येत नाही, तर ती अस्वच्छतेमुळे येते, त्यासाठी गावात स्वच्छता केली पाहिजे, रोग्याला दवाखान्यात नेले पाहिजे असा विचार ते मांडतात. या कामात ते स्वतः पुढाकार घेतात. लोक ऐकतात आणि मरीआईचा गाडा सोडण्याची प्रथा बंद होते.

पूर्वी गुन्हा सिद्ध करण्यासाठी किंवा निर्दोषमुक्त होण्यासाठी उकळत्या तेलातून हाताने पैसा बाहेर काढावा लागत असे. हात भाजला तर गुन्हेगार आणि नाही भाजला, तर निर्दोष मुक्तता अशी अंधश्रद्धा होती. या पार्श्वभूमीवर अण्णा भाऊ साठे 'डोळे' ही कथा लिहितात. या कथेतील राधेवर अनैतिक वर्तनाचा आरोप होतो. स्वतःचे पावित्र्य सिद्ध करण्यासाठी तिला उकळत्या तेलातून पैसा बाहेर काढण्यास सांगितले जाते. यावर राधा म्हणते, 'मी पापी आहे असे म्हणून तो पैसा तुम्हीच काढा. जर तुमचा हात जळाला तर मी पापी.' राधाची ही बंडखोरी म्हणजे अंधप्रथेविरुद्धचे बंड आहे.

बंगालला दुष्काळ पडला तेव्हा हा दुष्काळ म्हणजे देवाचा कोप आहे असे लोकांना वाटत होते. 'बंगालची हाक' हा पोवाडा लिहून

अण्णा भाऊ साठे म्हणतात,

'सावरून धरा बंगालला । देवाचा कोप या सोडा कल्पनेला ।

'शिव्या देत नोकरशाहीला । नका बसू व्यर्थ या वेळा ।'

यावरून दैवी कोप, मरीआईचा कोप, देवीचा रोग अशा किती तरी भ्रामक समजुतींना अण्णा भाऊ साठे यांनी साहित्यातून विरोध केला आहे.

## व्यवस्थेला प्रश्न विचारण्याची शिकवण

अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य सभोवतालच्या व्यवस्थेला प्रश्न विचारून त्यावर उत्तर शोधते. 'मी माणूस असूनही मला इतरांप्रमाणे स्वातंत्र्य का नाही?', 'मी गुन्हेगार नसूनही मला हजेरी का द्यावी लागते?', 'चोरी न करताही मला शिक्षा का मिळते?', 'कष्ट करूनही कामगारांना उपाशी का राहावे लागते?', 'आपण सगळे माणूस असूनही माणसेच माणसांचे शोषण का करतात?', 'स्त्री ही पुरुषांप्रमाणे माणूस असूनही तिला सन्मानाची वागणूक का मिळत नाही?' असे किती तरी प्रश्न उपस्थित करणारे साहित्य अण्णा भाऊ साठे यांनी लिहिले आहे.

'फकिरा' (१९५९) कादंबरीतील फकिराच्या जवळील माणसांना इंग्रजी सत्ता आणि स्थानिक वतनदार अन्यायकारक वागणूक देतात. गुन्हेगार नसताना तीन तीन वेळा हजेरी द्यावी लागते. या दोघांच्या पारतंत्र्यातून मुक्त होण्यासाठी फकिरा संघर्ष करतो. 'वारणेचा वाघ' (१९६८) कादंबरीत इंग्रजी सैन्यात असलेल्या सत्तूचा अपमान रॉबर्ट हा इंग्रज अधिकारी करतो. स्वाभिमानी सत्तू राजीनामा देऊन बाहेर पडतो. मथाजी चौगुले आपल्या शेतात गरोदर सईला मारत असतो. समज देऊनही तो ऐकत नाही हे पाहून सत्तू त्याला मारतो. 'बंडवाला' कथेतील तात्या मांग अन्यायाने जमीन हडपणाऱ्या इनामदाराबरोबर संघर्ष करतो. 'बरबाद्या कंजारी' जातपंचायतीने केलेल्या न्यायनिवाड्यावर प्रश्न उपस्थित करतो. 'उपकाराची परतफेड' या कथेत अनेक प्रश्न उपस्थित करून त्यातून बाहेर पडतात. दुसऱ्याने केलेल्या चोरीचा निळू मांगावर आरोप होतो. खरा गुन्हेगार शोधून तो गुन्हेगार होतो. शिक्षा भोगून बाहेर आलेला निळू म्हणतो, 'मी सरळ माणसासारखं वागणं, माणसासारखं जगणं.'

व्यवस्थेला प्रश्न विचारणे हाच गुन्हा असतो. प्रश्न नाही विचारले तर अन्याय सहन करावा लागतो. शोषितांचे जीवन जगावे लागते. अशा वेळी आपण माणूस आहोत हेच विसरावे लागते. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील प्रत्येक व्यक्तिरेखा व्यवस्थेला प्रश्न विचारते. त्यावरील उपाय शोधण्यासाठी संघर्ष करते. मृत्यूला न घाबरता व्यवस्थेला प्रश्न विचारणारी माणसे वाचकांपुढे उभे करणारे अण्णा भाऊ साठे प्रबोधकाच्या भूमिकेत वावरत होते.

## परिवर्तनाचे पुरस्कर्ते

परिवर्तन हा निसर्गसृष्टीचा आणि समाजसृष्टीचा गुणधर्म आहे. विशिष्ट व्यवस्था आणि अवस्था चिरकाळ टिकत नसते. अन्यायकारक आणि शोषण करणारी व्यवस्था काही काळाने बदल असते. असे असले तरी स्थितिशील व्यवस्था कायम राहावी, असा प्रयत्न सतत सुरू असतो. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य परिवर्तनाचा पुरस्कार करते.

५ मार्च १९६४ रोजी अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या 'वैर' या कादंबरीला लिहिलेली प्रस्तावना परिवर्तनाला सामोरे जाण्याची शिकवण देते. ते म्हणतात, 'आपण सतत लिहीत राहावे, जुन्या चालीरीती दूर कराव्या आणि जुन्या पण लोप पावलेल्या प्रगत प्रथांना पुन्हा पुढं आणावं. नवमहाराष्ट्रात प्रेम, सलोखा यांची वाढ व्हावी, जनता सुखी, संपन्न व्हावी आणि महाराष्ट्र राज्यात विषमता नष्ट झालेली नि समाजसत्तावादाचा अरुणोदय झालेला आपण पाहावा, असे दृढ घेऊन मी लिहितो.'

भारतात स्वातंत्र्याची चळवळ सुरू होती. या चळवळीचे प्रतिबिंब अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यांत पडलेले आहे. त्यातून ब्रिटिश सत्ता संपली पाहिजे, हा विचार पुढे येतो. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळते, याचे अण्णा भाऊ साठे साक्षीदार होते. परकियांची सत्ता संपली तरी धार्मिक सत्ता कायम होती. त्यातून जातीय विषमता वाढत होती. त्यात बदल झाला पाहिजे, असा विचार अण्णा भाऊ करत होते. शेठ, सावकार, धनिक, व्यापारी, कारखानदार हे कामगारांचे शोषण करत होते. यातही बदल झाला पाहिजे, असे त्यांना वाटत होते. 'जग बदल घालुनी घाव' या कवितेत त्यांनी परिवर्तनाचा विचार मांडला आहे. 'तमाशा' हा कलाप्रकार अश्लील आहे असे समजून त्यावर बंदी घातली, तेव्हा अण्णा भाऊ साठे यांनी तमाशाला 'लोकनाट्य' या कलाप्रकारात रूपांतरित केले. तमाशात गण म्हणताना. अण्णा भाऊ साठे यांनी त्याऐवजी मातृभूमीला, राष्ट्रवीरांना, देशभक्तांना, हुतात्म्यांना वंदन करणे सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर , सेनापती बापट, क्रांतिसिंह नाना पाटील अशांना ते वंदन करतात. अशा प्रकारे राज्य, समाज आणि साहित्य व्यवहार यात परिवर्तन घडवू पाहणारे अण्णा भाऊ साठे हे लेखक होते.

अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य आजही शिकवण देते. जगातील माणूस हा सुखी आणि समाधानी झाला पाहिजे. त्यासाठी समता प्रस्थापित झाली पाहिजे. स्त्री - पुरुष समतेचा पुरस्कार केला पाहिजे. शोषणविरहित समाज निर्माण झाला पाहिजे. बहुजन, कामगार, शेतकरी, आदिवासी, भटके विमुक्त अशा कोणाचेच शोषण होऊ नये, असा विचार त्यांच्या साहित्यात येतो. अण्णा भाऊ भूकेचा प्रश्न मांडतात त्याचप्रमाणे स्वाभिमानाचा विचारही मांडतात. प्रतिकूल परिस्थितीपुढे लाचार न होता संघर्ष केला पाहिजे, संकटांवर मात केली पाहिजे, अंधश्रद्धेला दूर केले पाहिजे, जुन्या कालबाह्य रूढी संपवल्या पाहिजे, वैज्ञानिकतेचा आधार घेतला पाहिजे, अशा अनेक अंगांनी अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य समाजमनाला शिकवते. त्यांच्या साहित्यातील प्रबोधनाची ही दिशा समजून घेतली तर अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतात.

## संदर्भ


१. गायकवाड आसाराम (१९९६) : लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णा भाऊ साठे संदर्भ ग्रंथ, झेप प्रकाशन, नाशिक
२. डांगळे अर्जुन व इतर (१९९८) : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय, म.रा.सा. सं. मंडळ, मुंबई
३. मोरे गिरीश (२०१३) : परिवर्तनाचा जागर, निर्मिती संवाद, कोल्हापूर.



(लेखक, राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रुकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.)

**वाङ्मयीन गुणवत्तेबरोबरच श्रमिकांचे प्रतिनिधित्व करून जगाच्या वेशीवर त्यांच्या समस्या मांडणारे अण्णा भाऊ साठे हे जर्मन, झेक, रशियन आदी भाषांमध्येही आंतरराष्ट्रीय दर्जाचे महान मानवतावादी लेखक म्हणून जगप्रसिद्ध झालेले आहेत. माणूस, माणुसकी आणि मानवतावाद हीच अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची खरी त्रिसूत्री असून स्त्रीचे शील, पुरुषाचा अभिमान आणि देशाचे स्वातंत्र्य हा त्यांच्या साहित्याचा मध्यवर्ती कणा आहे.**

# मानवतावादी लेखक

**प्रा. डॉ. शरद गायकवाड**

ज्ञानाची, शिक्षणाची आणि लेखणीची कोणतीही परंपरा नसणाऱ्या कष्टकरी मातंग समाजात अण्णा भाऊ साठे यांचा जन्म झाला. तत्कालीन जातिव्यवस्था आणि स्पृश्या-अस्पृश्यतेच्या दाहकतेचे चटके सहन करतच ते लहानाचे मोठे झाले. रूढार्थाने शाळेच्या वर्गात नव्हे, तर वर्गाबाहेरील व्हरांड्यात अवघे दीड दिवसांचे शिक्षण त्यांच्या वाट्याला आले. वाटेगाव ते मुंबई अनवाणी पायाने सलग चालत जाऊन हरप्रकारची कामे केली. पुढे गिरणी कामगार बनले. मुंबईतीलच एका नातेवाईकांकडून अक्षरओळख करून घेऊन महत्प्रयासाने अण्णा भाऊ साठे साक्षर बनले. मराठीतील साहित्य वाचनाबरोबरच पाश्चात्य साहित्य संस्कृतीचा मराठीतील अनुवाद वाचून प्रगल्भ बनले. इ.स. १९३२ ते १९४२ हा तो प्रचंड कष्टाने साक्षर होऊन विद्याव्यासंग वाढविण्याचा महत्त्वाचा काळ होता.

अण्णा भाऊ साठे यांचे मूळ नाव 'तुकाराम' असे होते. त्यांनी बारा बलुतेदार, भटके-विमुक्त, आदिवासी, शेतकरी, कामगर अशा कष्टकरी, श्रमजीवींच्या रक्त, अश्रू आणि घामावर आधारित साहित्य लिहून एका अर्थाने 'बहुजनगाथा' लिहिली. विश्वव्यापी जनगणा, तुज करूनी वंदना ! अशाप्रकारे विश्वाला कवेत घेऊन पारंपरिक गणामध्ये आमूलाग्र बदल करून देव-देवतांना वंदन न करता क्रांतिकारक,




समाजसुधारक, स्वराज्य संस्थापक, महापुरुष आणि स्वातंत्र्य सैनिकांवर क्रांतिकारी गणरचना केली. मराठीतला 'तमाशा' त्याच्या रंगा-ढंगामध्ये, रचनातंत्रामध्ये आमूलाग्र बदल करून 'लोकनाट्य' असे 'तमाशा'चे नामांतर त्यांनी केले.

गणाप्रमाणे, लोकनाट्याप्रमाणेच 'लावणी' रचनेमध्येही ऐतिहासिक स्वरूपाचा बदल केला. बेळगाव, निपाणी, कारवार, डांग, उंबरगाव या मराठी भाषिकांच्या व्यथावेदना मांडणारी कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमाप्रश्नावर त्यांनी सामाजिक विषयावर आधारित रूपकात्मक छक्कड वजा लावणी लिहून लावणीला अजरामर केले.


अण्णा भाऊ साठे हे जीवनवादी भूमिका घेऊन साहित्यक्षेत्रात स्वत:ची स्वतंत्र मुद्रा उमटवत राहिले. उच्चवर्णीय समाजाला गावकुसाबाहेरच्या बहुजनांचे, भटके-विमुक्तांच्या व्यथा-वेदनांचे दर्शन त्यांनी अतिशय सशक्तपणे प्रथमच घडवले. गण, गवळण, लावणी, छक्कड, कटाव, पोवाडा यांसारख्या पद्यवाङ्मयाबरोबरच त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, लोकनाट्य, प्रवासवर्णन, स्तंभलेखन, चित्रपट परीक्षण, ग्रंथ परीक्षण आणि प्रस्तावना यांसारख्या विविध वाङ्मय प्रकारांमधून विपुल प्रमाणात गद्यलेखनही केले.

१९४२ ते १९६९ या अवघ्या २७ वर्षांच्या लेखनकाळात अण्णा भाऊ साठे यांनी जवळजवळ ७७ ग्रंथांची निर्मिती केली. गेली ७० वर्षे महाराष्ट्रातील मराठी वाचकांमध्ये अण्णा भाऊ साठे हे लोकप्रिय लेखक आहेतच, त्याचप्रमाणे कन्नड, पंजाबी, तामीळ, तेलुगू, गुजराती यांसारख्या इतर भारतीय भाषांमध्येही ते तितक्याच आवडीने वाचले जातात.

वाङ्मयीन गुणवत्तेबरोबरच श्रमिकांचे प्रतिनिधित्व करून जगाच्या वेशीवर त्यांच्या समस्या मांडणारे अण्णा भाऊ साठे हे जर्मन, झेक, रशियन आदी भाषांमध्येही आंतरराष्ट्रीय दर्जाचे महान मानवतावादी लेखक म्हणून जगप्रसिद्ध झालेले आहेत. माणूस, माणुसकी आणि मानवतावाद हीच अण्णा भाऊ साठे

यांच्या साहित्याची खरी त्रिसूत्री असून स्त्रीचे शील, पुरुषाचा अभिमान आणि देशाचे स्वातंत्र्य हा त्यांच्या साहित्याचा मध्यवर्ती कणा आहे.

इ.स. १९४४ मध्ये 'लाल बावटा' कलापथकाची स्थापना करून अण्णा भाऊ साठे यांनी शाहीर अमरशेख, शाहीर द. ना. गव्हाणकर इ. सहकारी कलावंतांसोबत शाहिरी कार्यक्रम करून स्वातंत्र्य चळवळ, कामगार चळवळ आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ गतिमान करून महाराष्ट्राच्या हृदयसिंहासनावर स्वतःची स्वतंत्र मुद्रा उमटवली.



अण्णा भाऊ साठे यांनी कथा, कविता, कादंबरी, नाटक, लोकनाट्य, लावणी, पोवाडा, पटकथा, प्रवासवर्णन, स्तंभलेखन, चित्रपट समीक्षा अशा सर्वच वाङ्मयप्रकारात विपुल साहित्य निर्मिती केली. अवघ्या ४९ वर्षांच्या आयुष्यातील फक्त २७ वर्षांच्या लेखन कालखंडात त्यांनी अनेक ग्रंथांची निर्मिती केली. जगभरातल्या २७ देशांमध्ये त्यांच्या साहित्याचे अनुवाद प्रकाशित झाले. महाराष्ट्राबाहेर तामीळ, तेलुगू, गुजराती, पंजाबी, कन्नड अशा भारतीय भाषांमध्ये त्यांचे अनुवाद प्रकाशित झाले.

रशियाचे महान मानवतावादी लेखक 'मॅक्झिम गॉर्की' यांना अण्णा भाऊ साठे यांनी आपले लेखनगुरू मानलेले होते. न्याय, समता, स्वातंत्र्य आणि विश्वबंधुत्व या मानवी मूल्यांच्या संरक्षण आणि संवर्धनाचे कार्य अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्याद्वारे केले. अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, कर्मकांड आणि भेदा-भेद याविरुद्ध ते लढत राहिले. देव, दैव, अध्यात्म, कर्मकांड आणि जातिभेद, वर्णभेदाला नाकारून बहुजन समाजामध्ये विज्ञानवाद, विवेकवाद रुजवण्याबरोबरच नव्या प्रागतिक, पुरोगामी विचारांचे बीजारोपण करून समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी अण्णा भाऊ साठे प्रयत्नशील राहिले. आत्मा-परमात्मा, स्वर्ग-नरक अशा कल्पनाविश्वात न रमता वास्तववादी साहित्य त्यांनी निर्माण केले.

मी का लिहितो? या प्रश्नाच्या अनुषंगाने अण्णा भाऊ साठे यांनी स्वतःचा स्वतंत्र साहित्यविषयक दृष्टिकोन विविध साहित्यकृतींच्या प्रस्तावना वजा मनोगततातून स्पष्ट केलेला आहे. 'वारणेच्या खोऱ्यात' मध्ये ते म्हणतात, 'जनतेचे विशाल जीवन, तिची जगण्याची धडपड किंवा संघर्ष, त्याच जनतेत वावरणारे उदात्त विचार हे सारे आपल्या लिखाणातून मांडावे या मोहाने प्रेरित होऊन मी लिहितो.' आपण का लिहितो, याची कारणमीमांसा यातून स्पष्ट झाल्याचे दिसते. 'हा देश सुखी, समृद्ध नि सभ्य व्हावा, इथे समता (समानता) नांदावी, या महाराष्ट्रभूमीचे नंदनवन व्हावे, अशी मला रोज स्वप्न पडत असतात. ती स्वप्न पाहत मी लिहीत असतो.' 'वैजयंता' कादंबरीच्या मनोगतातील अण्णा भाऊ साठे यांचे हे उद्‌गार लेखकाच्या स्वप्नातील, लेखकाला अपेक्षित असलेल्या समाजनिर्मितीचे प्रतिबिंब अधोरेखित करतात.

शिक्षणाचा आणि ज्ञानाचा कोणताही वारसा नसलेल्या कुटुंबात जन्माला येऊन, अण्णा भाऊ साठे यांनी अत्यल्प शिक्षण असतानाही जे साहित्यिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी योगदान दिले ते ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. चार भिंतींबाहेरच्या जगाच्या उघड्या शाळेत अनुभव नावाच्या गुरूकडून अण्णा भाऊ साठे यांनी जे आत्मसात केले त्याच्यावरच त्यांनी गगनाला गवसणी घालणारे कार्यकर्तृत्व सिद्ध केले. सातारी, कोल्हापुरी बोलीभाषा वापरून अण्णा भाऊ साठे यांनी गावगाडा, गावकुसाबाहेरचे पालावरचे विश्व मराठी साहित्यात सर्वप्रथम सक्षमपणे चित्रित केले.

महात्मा गांधीजींची स्वातंत्र्य चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शोषणमुक्तीची आंबेडकरी चळवळ, मुंबईतील कम्युनिस्टांची कामगार चळवळ, समाजवादी नेत्यांची समाजवादी चळवळ, शेतकरी-कामगार चळवळ आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची चळवळ या सर्व पार्श्वभूमीवर अण्णा भाऊ साठे यांची साहित्यनिर्मिती समकालीन, समाजवास्तवाला अधोरेखित करणारी आहे. या सर्व चळवळींना प्रेरणादायी व दिशादर्शक आहे.

अण्णा भाऊंनी मराठी साहित्याच्या आशा-आकांक्षांच्या कक्षा रूंदावल्या. मराठी साहित्य अधिक सशक्तपणे मांडून सर्वार्थाने समृद्ध केले. मराठी साहित्याचा मध्यमवर्गीय, कल्पनारंजनात आत्ममग्न असलेला केंद्रबिंदू बदलवला. पारंपरिक शाहिरी वाङ्मयात आमूलाग्र बदल करून समकालीन सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारी शाहिरी अण्णा भाऊ साठे यांनी लिहिली आणि गायिलीसुद्धा. गोवामुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, हैद्राबाद मुक्ती संग्राम, स्वातंत्र्य चळवळ आणि शेतकरी-कामगारांची चळवळ याबरोबरच आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी अण्णा भाऊंनी आपली वाणी अन् लेखणी सक्षमपणे सार्थकी लावली. अण्णा भाऊ साठे वाटेगाव ते रशिया (मॉस्को) पर्यंत लोकप्रिय होण्याचे गमक त्यांच्या क्रांतिकारी जग बदलू पाहणाऱ्या लेखणीत आहे.

(लेखक हे महावीर महाविद्यालय, कोल्हापूर, येथे मराठी विभागाचे प्रमुख आहेत.)

**लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाची स्थापना ११ जुलै १९८५ रोजी झाली आहे. महाराष्ट्रामध्ये मागासवर्गीयांपैकी संख्येने मोठ्या प्रमाणात असलेला मातंग समाज व त्याच्या १२ पोट जाती यांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास करून त्यांना दारिद्र्यरेषेच्या वर आणणे हा या महामंडळाच्या स्थापनेचा मुख्य उद्देश आहे.**

# आधार योजनांचा !

**शैलजा पाटील**

महामंडळास विशेष केंद्रीय अर्थसाहाय्य अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून केंद्र शासनाच्या मार्गदर्शकतत्त्वानुसार खालील योजना राबवण्यात येतात.

## अनुदान योजना

विशेष केंद्रीय अर्थसाहाय्य योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून अनुदान योजना राबविण्यात येते. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये तीन लाखापर्यंत आहे, अशा कुटुंबातील अर्जदारांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रकल्प मर्यादा असलेल्या व्यवसायासाठी बँकेच्या साहाय्याने कर्ज उपलब्ध करून दिले जाते. एकूण मंजूर प्रकल्प रकमेमध्ये ५०% किंवा जास्तीत जास्त १० हजार रुपये यापैकी जी कमी असेल ती रक्कम महामंडळामार्फत लाभार्थीस अनुदान म्हणून दिली जाते. उर्वरित रक्कम बँकेकडून कर्जाच्या रूपात वितरित करण्यात येते.

## प्रशिक्षण योजना

विशेष केंद्रीय अर्थसाहाय्य योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या एकूण निधीच्या १०% रक्कम ही प्रशिक्षण योजनेवर खर्च करण्यात येते. मातंग समाजातील इयत्ता चौथीपासून पुढे शिक्षण घेतलेल्या १८ ते ३५ वयोगटातील युवक/युवतींना वाहन चालक, वेल्डिंग, मोटर मॅकनिकल, शिवणकाम, ब्युटीपार्लर, फिटर, रेडीओ/टीव्ही दुरुस्ती, सुतारकाम इ. व्यावसायिक प्रशिक्षण शासन मान्य संस्थांमार्फत दिले जाते. ज्यामुळे युवक/युवतींना स्वयंरोजगार मिळण्यास मदत होते.



राज्य शासनामार्फत महामंडळास भागभांडवली अंशदान निधी प्राप्त होत असतो. या प्राप्त निधीतून खालील योजना राबवण्यात येतात.

## बीजभांडवल योजना

प्रकल्प मर्यादा रुपये ५०,००१ ते ५,००,००० पर्यंतच्या मंजूर कर्ज प्रकरणांमध्ये रुपये १०,००० अनुदान वगळता उर्वरित कर्जामध्ये ५ टक्के अर्जदाराचा सहभाग आवश्यक आहे. महामंडळातर्फे २० टक्के कर्ज (रुपये १०,००० अनुदानासह) दिले जाते व उर्वरित ७५ टक्के कर्ज बँकेचे असते. महामंडळाचे कर्ज द.सा.द.शे. ४ टक्के व्याजासह महामंडळाकडे परतफेड करावयाचे असते.

तसेच राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्तीय विकास महामंडळ (एनएसएफडीसी) दिल्ली यांच्याकडून मंजूर होणाऱ्या विविध योजनेंतर्गत सुमारे २०% कर्ज रकमेचा हिस्सा महामंडळाच्या भागभांडवलाच्या निधीतून लाभार्थीस वितरित केला जातो.

## थेट कर्ज योजना

थेट कर्ज योजनेची कर्ज मर्यादा २५ हजारावरून १ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. या योजनेमध्ये महामंडळाचे भांगभाडवल निधी ८५ हजार रुपये ,अनुदान निधी दहा हजार रुपये व लाभार्थीचा सहभाग रक्कम पाच हजार रुपये असे एकूण १ लाख रुपये कर्ज द.सा.द.शे. ४% व्याज दराने लाभार्थींना वितरित करण्यात येते. हे कर्ज लाभार्थीकडून ६० समान हप्त्यांमध्ये वसूल करण्यात येते.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना

मातंग समाजातील प्रती वर्षी इयत्ता १० वी १२ वी, पदवी व पदविका व पदव्युत्तर परीक्षेत कमीतकमी ६०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थी व

विद्यार्थिनींची जिल्हानिहाय प्राप्त गुणाच्या टक्केवारीनुसार निवड केली जाते व उपलब्ध निधीच्या मर्यादेत शिष्यवृत्ती एकदाच पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहनपर दिली जाते. ही योजना मा. मुख्यमंत्री निधीतून महामंडळास मिळालेल्या २० लाख निधीच्या मिळणाऱ्या व्याजातून प्रतिवर्षी राबवण्यात येते. शिष्यवृत्ती - १) १०वी - रुपये १,०००/- २) १२ वी- रुपये १,५००/- ३) पदवी व पदविका - रुपये २,०००/- ४) पदव्युत्तर - रुपये २,५००/-

## राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्तीय विकास महामंडळाच्या योजना

### मुदत कर्ज योजना

या योजनेंतर्गत विविध व्यवसायांकरिता एनएसएफडीसीमार्फत ५ लाखांपर्यंत असलेल्या व्यवसायांकरिता मुदत कर्ज मंजूर केले जाते. या कर्ज रकमेमध्ये ७५% हिस्सा हा एनएसएफडीसी महामंडळाचा असतो. २०% हिस्सा महामंडळाचे भागभांडवल निधीतून (दहा हजार रुपये अनुदानासह) देण्यात येतो. उर्वरित ५% रक्कम ही लाभार्थीची असते. ही कर्जाची परतफेड जास्तीत जास्त ५ वर्ष असते. एनएसएफडीसीच्या रकमेवर द.सा.द.शे. ६% व महामंडळाच्या रकमेवर द.सा.द.शे. ४% व्याज आकारण्यात येते.

### लघुऋण वित्त योजना

एनएसएफडीसी योजनेंतर्गत लघुऋण वित्त योजना २०००-०१ पासून राबवण्यात येते. या योजनेंतर्गत प्रति लाभार्थी एनएसएफडीसीचे मुदत कर्ज ४० हजार रुपये व महामंडळाचे अनुदान १० हजार रुपये असे एकूण ५० हजार रुपयांच्या मर्यादेत लघु उद्योगांमध्ये लाभ देण्यात येतो.

### महिला समृद्धी योजना

ही योजना २००४-०५ पासून महामंडळामार्फत राबवण्यात येत आहे. ही योजना एनएसएफडीसीकडून प्राप्त होणाऱ्या निधीतून राबवण्यात येते. या योजनेंतर्गत प्रति लाभार्थी एनएसएफडीसीचे मुदत कर्ज ४० हजार रुपये व महामंडळाचे अनुदान १० हजार रुपये असे एकूण ५० हजार रुपयांच्या मर्यादेत लाभ देण्यात येतो.

### शैक्षणिक कर्ज योजना

मातंग समाजातील युवक-युवतींना एनएसएफडीसी योजनेंतर्गत देशात व परदेशात उच्च शिक्षण घेण्याकरिता एनएसएफडीसीअंतर्गत शैक्षणिक कर्ज योजना राबवण्यात येते. देशांतर्गत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना २० लाख रुपये व परदेशांतर्गत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ३० लाख रुपये कर्ज मंजूर केले



जाते. या कर्जाची परतफेड शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यांपासून अथवा नोकरी लागल्यापासून करावयाची असते.

## महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याकरिता आवश्यक पात्रता

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदाराचे वय १८ वर्षे पूर्ण असावे व ५० वर्षांपेक्षा जास्त नसावे.
३. अर्जदार हा मातंग किंवा तत्सम १२ पोटजातीतील असावा.
४. अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव/ प्रशिक्षण घेतलेले असावे.
५. राज्य शासनाच्या व केंद्रीय महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याकरिता शहरी/ ग्रामीण भागातील अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न तीन लाख रुपयांपर्यंत असावे.
६. अर्जदाराने इतर कोणत्याही शासकीय योजनांचा किंवा महामंडळाच्या योजनांचा लाभ घेतलेला नसावा.
७. महामंडळाने वेळोवेळी घालून दिलेल्या शर्ती व अटी अर्जदारावर बंधनकारक राहतील.

### अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

- अर्जदाराचा जातीचा दाखला (सक्षम अधिकारी यांनी दिलेला जातीचा दाखला.)
- अर्जदाराच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा दाखला (सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा दाखला)
- महामंडळाच्या योजनेचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदाराच्या बाबतीत नुकत्याच काढलेल्या पासपोर्ट साईज फोटोच्या तीन प्रती.
- अर्जदाराचा शैक्षणिक दाखला.
- रेशन कार्ड व आधार कार्डच्या झेरॉक्स प्रती (मोबाईल नंबरसह)
- वाहन खरेदी करण्यासाठी वाहन चालवण्याचा परवाना.
- ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा असेल त्या जागेच्या उपलब्धतेचा पुरावा (उदा. भाडे पावती, करारपत्र किंवा मालकी हक्काचा पुरावा)
- व्यवसायासंबंधी असलेल्या अनुभवाचा दाखला/ तांत्रिक प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र
- व्यवसायासंबंधी प्रकल्प अहवाल
- व्यवसायासाठी खरेदी करावयाच्या मालाचे/साहित्याचे/वाहनाचे कोटेशन.
- प्रतिज्ञापत्र (स्टॅम्प पेपरवर)

### अर्ज करण्याची पद्धत

१. अर्जाचा नमुना सर्व जिल्हा कार्यालयांमध्ये विनामूल्य उपलब्ध आहे.
२. विहित नमुन्यातील अर्ज भरून तीन प्रतीत संपूर्ण कागदपत्रांसह संबंधित जिल्हा कार्यालयात जमा करावा.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**राज्य मंत्रिमंडळाच्या ४ जुलै २०२३ रोजीच्या बैठकीत ऊर्जा, नियोजन, जलसंपदा, उद्योग, विधि व न्याय, महसूल, कृषी, पदुम आदी विभागांचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...**

# कल्याणकारी निर्णय

## नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना गती

नवीकरणीय ऊर्जा आणि हरित हायड्रोजन प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्याच्या हरित हायड्रोजन धोरणास मान्यता



देण्यात आली. असे धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी ८ हजार ५६२ कोटी रुपये खर्चासदेखील मान्यता देण्यात आली.

## परदेशातील उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्ती

राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्तीसाठी सयाजीराव गायकवाड-सारथी शिष्यवृत्ती योजनेस मान्यता देण्यात आली. या योजनेतून दरवर्षी ७५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येईल.

## वळण योजनेस मान्यता

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक तालुक्यातील कळमुस्ते आणि दिंडोरी तालुक्यातील चिमणपाडा येथील प्रवाही वळण योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

## अधिसंख्य पदांना मान्यता

नागपूर येथील शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्सच्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी ३५ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. या कर्मचाऱ्यांना कोणतीही वेतन थकबाकी पूर्वलक्षी प्रभावाने मिळणार नाही. यासाठी १ कोटी १७ लाख ३ हजार ४६८ रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. हे मुद्रणालय राज्य शासनाच्या विदर्भ विकास महामंडळाकडे सोपवण्यात आले होते. मात्र महामंडळाची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन १९९४ मध्ये ते शासकीय मुद्रण व प्रकाशन संचालनालयाकडे हस्तांतरित करण्यात आले होते.

## न्यायमूर्तींना सेवानिवृत्तीनंतरचे लाभ

मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती, न्यायमूर्ती किंवा त्यांचे हयात असलेले पती किंवा पत्नी यांना घरकाम, वाहनचालक तसेच दूरध्वनी खर्चाचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## कबुलायतदार गावकर पद्धतीत जमीन

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील मौजे आंबोली आणि गेळे या गावातील शेतकऱ्यांना कबुलायतदार गावकर पद्धतीत जमीन वाटप करण्यास मान्यता देण्यात आली. कबुलायतदार गावकर पद्धत महाराष्ट्रात अन्य कोणत्याही ठिकाणी अस्तित्वात नाही. त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल नियम १९७१ मधील नियम क्र.५२ मधील तरतूद शिथिल करण्यात आली आहे. आंबोली येथे ६२९-२४.४१ हेक्टर आर हे क्षेत्र प्रवर्ग १ मधील पात्र कुटुंबांना त्यांच्या घराखालील क्षेत्रासह, शेतजमीन शेतसारा आकारून समप्रमाणात वाटप करण्यात येईल. तसेच प्रवर्ग-२ मधील कुटुंबांना घराखालील जास्तीत जास्त १५० चौ.मीटर क्षेत्र शासनाच्या प्रचलित धोरणानुसार वाटप करण्यात येईल. तसेच मौजे गेळे येथे २६०-२५.७० हेक्टर आर क्षेत्र पात्र कुटुंबांना समप्रणात वाटप करण्यात येईल. मौजे आंबोली व गेळे गावात खासगी वने असा शेरा असलेल्या जमिनीबाबत वन विभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्या जमिनीचे वाटप करण्यात येईल.

## कृषी सुविधा केंद्र

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत नागपूर येथील कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या केंद्रासाठी २२७ कोटी ४६ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या संदर्भात अर्थसंकल्पीय भाषणात उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली होती.

## मत्स्यबीज, कोळंबीबीज संवर्धन केंद्र

राज्यातील मत्स्यबीज, कोळंबीबीज उत्पादन व संवर्धन केंद्र यांच्या भाडेपट्टी कालावधीत वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयानुसार विभागाकडील ७



केंद्रे वगळता भाडेपट्ट्याने देण्यात आलेली व नव्याने भाड्याने देण्यात येणाऱ्या मत्स्यबीज, कोळंबीबीज केंद्रांचा भाडेपट्टी कालावधी आता १५ ऐवजी २५ वर्षे करण्यात येईल.

**– टीम लोकराज्य**



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

# योजना कल्याणकारी सर्वसामान्यांच्या दारी!



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री




## अंमलबजावणी वेगवान

## अभियानाची वैशिष्ट्ये

प्रत्येक जिल्ह्यात किमान ७५००० लाभार्थ्यांना एकाच छताखाली लाभ देण्यात येणार

शासकीय निर्धारित शुल्कात २०० हून अधिक योजनांचा लाभ, कमीतकमी कागदपत्रे आणि जलद मंजुरी

पहिल्यांदाच सर्व प्रशासन 'हर घर दस्तक' च्या माध्यमातून प्रत्येकाला योजनांची माहिती देणार



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

www.mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR


R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month


# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ

### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय **lokrajya2011@gmail.com** या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.




### अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**दयानंद कांबळे**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : जयश्री भोज